सोलापूर तरुण भारत

आसमंत



भारत आणि अमेरिकेचे उत्तम संबंध असताना, आयात शुल्कवाढ, आगामी व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर या संबंधांमध्ये काहीशी कटुता निर्माण झालेली दिसते. त्यामुळे हे संबंध आणखीन चिघळायचे नसतील, तर दोन्ही देशांना त्यादृष्टीने वेळीच व्यापक पाऊले उचलावी लागतील.

# मस्करीची कुस्करी होऊ देऊ नका!

लक्ष्यवेध

प्रतिनिधी

अमेरिका आणि भारत यांच्यात निर्माण झालेल्या तणावामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यादरम्यान होऊ पाहत असलेल्या व्यापारी करारात अमेरिकेला अपेक्षित सवलती न दिल्याने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतावर रागावले आहेत. त्यांच्या सवयीनुसार त्यांनी 'ट्रुथ' समाजमाध्यमावर भारताविरुद्ध गरळ ओकायला सुरुवात केली आहे. व्यापारी मतभेदांना वैयक्तिक मानापमानाची फोडणी लागली आहे. सुरुवातीला भारताविरुद्ध २५ टक्के अधिक 'ब्रिस' गटातील देश म्हणून अतिरिक्त दहा टक्के आयातकर लावल्यानंतर ट्रम्प यांनी दि. ४ ऑगस्ट रोजी घोषित केले की, भारत केवळ रशियन तेल मोठ्या प्रमाणात खरेदी करत नाही, तर ते खरेदी केलेले बरेचसे तेल खुल्या बाजारात मोठ्या नफ्यासाठी विकत आहेत.

रशियन युद्धयंत्रणेमुळे युक्रेनमधील किती लोक मारले जात आहेत, याची त्यांना पर्वा नाही. यामुळे, मी भारताने अमेरिकेला दिलेला कर मोठ्या प्रमाणात वाढवणार आहे. हा कर किती असेल, ते अजून त्यांना स्पष्ट नसले, तरी चीन किंवा ब्राझीलच्या उदाहरणाकडे बघून तो ५० ते १०० टक्के झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. जगातील सर्वांत जुन्या आणि सर्वांत मोठ्या लोकशाहीच्या प्रेमकहाणीत असे वळण येईल, असे कोणालाही वाटले नव्हते. आजवर भारताने आपला संयम ढळू न देता ट्रम्प यांच्या 'अरे ला का रे' करणे टाळले होते.

गेल्यावर्षी भारत आणि अमेरिका यांच्यातील एकूण द्विपक्षीय व्यापार सुमारे १२९.२ अब्ज डॉलर्स होता. यामध्ये भारताने अमेरिकेला ८७.४ अब्ज डॉलर्सची निर्यात केली, तर अमेरिकेने भारतात ४१.८ अब्ज डॉलर्सची निर्यात केली. या व्यापारात अमेरिकेची तूट ४५.७ अब्ज डॉलर्स इतकी होती. नेमकी हीच तूट ट्रम्प यांच्या डोळ्यांत सलत आहे. पण, ती कमी करण्यासाठी अमेरिका भारताला खनिज तेल, नैसर्गिक वायू, शस्त्रास्त्रे आणि कृषी मालाखेरीज अन्य काही विकू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सेवा क्षेत्र वगळले, तर अमेरिकेच्या निर्यातीतील कृषी मालाचा वाटा ८० टक्के आहे. त्यामुळे भारताने आपले कृषी क्षेत्र आयातीसाठी खुले करावे, असा ट्रम्प यांचा आग्रह आहे. यात वाद नाही की, राजकीय कारणांमुळे गेली अनेक दशके आपण कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञान, देशी आणि विदेशी भांडवल आणि पुरवठा साखळ्यांपासून दूर ठेवले आहे. देशांतर्गत गरज भागल्यानंतरच आपण कृषी मालाच्या निर्यातीचा विचार करतो. पण, दुसरीकडे भारताच्या १४० कोटी लोकसंख्येला आधार देण्याचे काम हे क्षेत्र करते. उत्पादन आणि सेवा क्षेत्रामध्ये कोट्यवधी लोकांसाठी रोजगार पुरवणे अवघड असल्यामुळे कृषी क्षेत्रात जाणीवपूर्वक अकार्यक्षमता ठेवून गरजेपेक्षा कितीतरी पट लोकांना किमान पोट भरेल, इतका रोजगार पुरवता येतो. भारतात कोट्यवधी शेतकरी असून, त्यांची सरासरी जमीनधारणा दोन हेटरपेक्षा कमी आहे. त्यामुळे भारत अमेरिकेच्या शेतमालाला आपल्या बाजारपेठेचे दरवाजे सताड उघडणार नाही, याची अमेरिकेलाही कल्पना आहेच. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर पहिल्या दशकात भारताने अण्वस्त्र चाचणी केल्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांनी तळ गाठला होता. पण, एकीकडे अण्वस्त्र चाचणी, दुसरीकडे कारगिल युद्धामध्ये संयम न सोडता मिळवलेला विजय आणि जागतिक पटलावर माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात भारत करत असलेली दमदार कामगिरी पाहून, अमेरिकेचे भारताविषयी धोरण बदलू लागले. चीनच्या वाढत्या प्रभावाला भारत वेसण घालू शकतो. तसेच, अमेरिकेची सैन्यदले संपूर्ण जगभर सुरक्षा पुरवू शकत नसल्यामुळे खासकरून हिंद महासागर क्षेत्रामध्ये भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. आज अमेरिका जरी भारताचा संरक्षण क्षेत्रातील सर्वांत मोठा भागीदार झाला असला, तरी भारताच्या सैन्यदलातील प्रमुख रणगाडे, युद्धनौका आणि विमाने ही रशियन बनावटीची असल्यामुळे पुढील काही वर्षे भारत आणि रशिया यांच्यामध्ये संरक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संबंध असणार, हे अमेरिकेने मान्य केले आहे.

आज अमेरिकेत स्थित भारतीयांची संख्या ५० लाखांच्या घरात गेली आहे. ट्रम्प निवडून येईपर्यंत दरवर्षी एक लाखांहून अधिक भारतीय अमेरिकेत शिक्षणासाठी जात होते आणि त्यापैकी बरेचसे पुढील काही वर्षे अमेरिकेतच स्थायिक होत होते. त्यामुळे भविष्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध आणखी सुदृढ होणार आहेत, ही वस्तुस्थिती. त्यामुळे बिल लिंटन, जॉर्ज डब्ल्यू बुश-२, बराक ओबामा ते जो बायडन या रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक पक्षांच्या अध्यक्षांनी भारतासोबतच्या संबंधांमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. स्वतः ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या टर्ममध्ये वादळी सुरुवातीनंतर भारत आणि अमेरिका संबंध एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले होते. (पान ४ वर)

आकलन

तेजस परब



# भारत दक्षिण दिग्विजयाकडे!

**भारत-फिलीपिन्स दृढ संबंधांच्या पंच्याहत्तरीच्या निमित्ताने, पूर्वी एशिया-पॅसिफिक प्रदेशाला आता 'इंडो-पॅसिफिक प्रदेश' म्हणून प्राप्त झालेली प्रादेशिक ओळख, हा आशियाई क्षेत्रात दबदबा निर्माण करू पाहणार्या भारताचे पहिले पाऊल म्हणावे लागेल. फिलीपिन्स हा दक्षिण आशियातील एक महत्त्वाचा देश. रचनात्मक विकास, अर्थकारण आणि सांस्कृतिक धाग्यांनी भारताशी जोडलेला एक भूभाग. तसेच, आर्थिक विकासदराच्या शर्यतीतही भारताप्रमाणेच झपाट्याने विकास करणारा एक देश. ११.३ कोटी लोकसंख्येचा हा देश शेकडो बेटांवर वसलेला असला, तरीही तीन लाख चौरस किमी इतका विस्तार असलेले द. आशियातील हे महत्त्वाचे राष्ट्र. आर्थिकदृष्ट्या जगात ३२वा, तर आशियात नवव्या स्थानी असलेल्या या देशाने भारताशी कायम मैत्री जपली.**

उत्तरेला चीनशी कायम संघर्ष करणारा तैवान, पश्चिमेला व्हिएतनाम पूर्वेला अथांग असा फिलीपिन्सचा समुद्र आणि दक्षिणेला इंडोनेशिया, पापुआ न्यू गिनी अशा देशांच्या सागरी सीमा लाभलेल्या या देशाचे भौगोलिक महत्त्व भारत जाणून आहे. याच अनुषंगाने भारताने फिलीपिन्सशी मैत्रीचे संबंध अधिक दृढ केले. आपल्या शेजारील ड्रॅगनची वळवळ शांत करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जाऊ शकते. फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनेंड मार्कोस सध्या भारत दौऱ्यावर आहेत. त्यांनीच 'आशिया-पॅसिफिक' ऐवजी 'इंडो-पॅसिफिक' असा शब्दप्रयोग रुढ केला होता. याचाच अर्थ या संपूर्ण आशियाई राष्ट्रांच्या यादीत भारताचे स्थान प्रमुख आहेच. शिवाय भारत त्यांचा रक्षणकर्ताही आहे, असा संदेश जागतिक पटलावर स्पष्टपणे जातो.

भारत-फिलीपिन्स संबंधांच्या नव्या अध्यायाची सुरुवात होण्याच्या दृष्टीने संरक्षण करारांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. दि. ५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रपती भवनात फिलीपिन्सच्या राष्ट्राध्यक्षांचे स्वागत केले. भारत-फिलीपिन्स संबंधांची ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी दोन्ही देश आपल्या रणनीतिक आणि आर्थिक संबंध मजबूत करण्याच्या प्रयत्नात आहेत. रशियाकडून आयात होणाऱ्या तेलाच्या मुद्द्यावरुन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात आयातशुल्क लादले आहे. चीन पूर्वीपासूनच भारताविरोधात पाकिस्तानच्या मदतीला धावून येतो. या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताला आशिया आणि आफ्रिकन देशांपुढे एक पर्याय म्हणून उभे राहणे गरजेचे आहे. या छोट्या-छोट्या देशांची मैत्रीच भारतासाठी महत्त्वाची ठरणार आहे. मार्कोस यांचे पिताश्री भारताचा दौरा करणारे फिलीपिन्सचे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले होते. आता त्यांचेच पुत्र फिलीफिन्समध्ये सत्तेत आहेत. त्यामुळे भारताशी त्यांचे एक परंपरागत भावनिक नातेही आहेच. भारताने फिलीपिन्सला अनेक व्यापार निर्बंधांतून मुक्त केले आहे. मुळात फिलीपिन्सचे प्रमुख खाद्य तांदूळ. फिलीपिन्सहून तांदूळ मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. भारताला २०२४ साली एकूण २० हजार टन तांदूळ निर्यात करण्यात आला. दोन्ही देशांचा व्यापार एकूण ३.३ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला. मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळापासून हा व्यापार ६३ टक्क्यांपर्यंत वृद्धिंगत झाला. यात फार्मा कंपन्यांनी बाजी मारली. एकूण निर्यातीच्या १६ टक्के ही फार्मा कंपन्यांनीच व्यापली आहे. याशिवाय इंजिनिअरिंग उत्पादने, वाहनांचे सुटे भाग, रसायने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंचाही समावेश आहे.

भारत-फिलीपिन्स सांस्कृतिक संबंधांची किनार लक्षात घेता, तेथील पर्यटकांना भारतात येण्यासाठी व्हिसामुक्त करण्यात आले आहे. यंदाच्या वर्षी थेट विमानसेवाही सुरू करण्यात येणार आहे, ती अखंड सुरू राहील, यासाठीही भारत प्रयत्नशील असणार आहे. त्यामुळे दोन्ही देशांतील पर्यटन वाढण्याची शयता आहे. यानंतर सर्वांत महत्त्वाचा मुद्दा ज्यासाठी भारताने फिलीपिन्सला दिलेली मोकळीक महत्त्वाची ठरते, ती म्हणजे सागरी सुरक्षा.

चीनला कोंडीत पकडण्यासाठी फिलीपिन्सची भूमी केव्हाही उत्तम. त्यामुळे भारत-फिलीपिन्सच्या दोन्ही नेत्यांनी संरक्षण आणि सागरी सहयोगावर अधिकचे लक्ष केंद्रित केले. 'मेक इन इंडिया' या आग्रही योजनेचे सर्वांत मोठे यश म्हणजे, हा भारत-फिलीपिन्स क्षेपणास्त्र करार. दि. २८ जानेवारी २०२२ रोजी या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या असून, अंदाजे एकूण ३ हजार, १३१ कोटी रुपयांचा हा करार आहे. त्यापैकी एप्रिल २०२४ रोजी 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रे पुरवली होती. भारतीय वायुसेनेच्या 'सी-१७ ग्लोबमास्टर' विमानद्वारे ही क्षेपणास्त्रे पाठविण्यात आली होती. 'ब्रह्मोस' विकत घेणारा फिलीपिन्स हा पहिला देश. दोन्ही देशांच्या नौदलाचा युद्धाभ्यास सराव सुरू असतो. द. चिनी समुद्रात चीनकडून होणाऱ्या कुरापतींना चाप लावण्यासाठी हा मुद्दाही महत्त्वाचा ठरणार आहे. शिवाय इंडो-पॅसिफिक क्षेत्रात दबदबा निर्माण करण्यासाठी, दोन्ही देशांना सागरी सीमांवर करडी नजर ठेवणे आणि नैसर्गिक संकटांवर मात करण्यासाठीही यानिमित्ताने मदत होईल.

दोन्ही देशांचा अंतराळ क्षेत्रातील सहकार्यावरही भर आहे. कृषी क्षेत्रातील सुधारांवर भर देता येईल. दोन्ही देशांमध्ये होणारा व्यापार लक्षात घेत, भारताने मुक्त व्यापार करारही महत्त्वाचा आहे. 'कोरोना' काळातही भारताने या देशाशी मैत्री निभावली होती. 'व्हॅसिन मैत्री' अंतर्गत भारताने या देशालाही संकटकाळात मदतीचा हात दिला. अनेक फिलीपिन्सचे अनेक विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी वास्तव्यास आहेत. आयटी, विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रांकडे त्यांचा कल दिसून येतो. भारतातून जगभरात पसरलेला बुद्ध धर्म हा फिलीपिन्ससाठीही तितकाच महत्त्वाचा. त्यामुळे या देशाशी भारताचे सांस्कृतिक आणि धार्मिक नातेही तितकेच दृढ. चीन तिबेट आणि तिबेटी बौद्ध सर्वोच्च धर्मगुरू दलाई लामा यांच्यासोबत चीन करत असलेल्या व्यवहाराने फिलीपिन्ससुद्धा अनभिज्ञ नाही. (पान ४ वर)

# उथळ राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयाने फटकारले!

**निवडणुकांमध्ये, संसदेत आणि न्यायालयातही वारंवार केलेल्या आपल्या असत्य दाव्यांवरुन तोंडघशी पडल्यानंतरही, राहुल गांधींचा उथळपणा कायम आहे. २०२२ साली राहुल गांधींनी भारत-चीन सीमावादासारख्या संवेदनशील विषयावर जे वादग्रस्त वक्तव्य केले होते, त्याविरोधातील दाखल खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने त्यांना काल चांगलेच फटकारले आहे.**

नोंद

दत्ता पंचवाघ

लोकसभेतील विरोधी पक्षनेते, काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी हे त्यांच्या उथळ बोलण्याबद्दल सर्वपरिचित आहेत. राहुल गांधी यांनी २०२२ साली संवेदनशील अशा भारत-चीन सीमा वादासंदर्भात जे भाष्य केले, त्यावरून सर्वोच्च न्यायालयाने त्यांना चांगलेच फटकारले! चीनने भारताचा प्रदेश ताब्यात घेतला असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला होता. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने, चीनने दोन हजार किमी एवढी जमीन हडप केली, असे आपणास कसे काय माहिती आहे? आपण कोणत्या आधारावर असा दावा करीत आहात, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना विचारला. एका फौजदारी अब्रुनुकसानीच्या दाव्याच्या सुनावणी दरम्यान भारत-चीन सीमा वादासंदर्भात असे 'अवैध' आणि 'बिनबुडाचे आरोप' आपण कसे काय करू शकता, असा प्रश्न उपस्थित करून सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांच्या वक्तव्याबद्दल आपली तीव्र नाराजी व्यक्त केली.

२०२० साली झालेला गलवान संघर्ष आणि भारतीय लष्कर यांच्याबद्दल राहुल गांधी यांनी जी शेरेबाजी केली होती, त्याबद्दल न्यायालयाने राहुल गांधी यांना चांगलेच फटकारले! राहुल गांधी यांनी आपल्या 'भारत जोडो' यात्रेदरम्यान दि. १६ डिसेंबर २०२२ रोजी भारत-चीन यांच्या सैन्यात झालेल्या चकमकी संदर्भात भाष्य केले होते. चिनी सैन्याने भारतीय सैनिकांना काठीने झोडपून काढले, असे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते. त्यावरून संतप्त प्रतिक्रिया उमटली होती. चीनने भारताचा मोठा भूभाग बळकावल्याचा जो दावा राहुल गांधी यांनी केला होता, त्यावरून सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. ए. जी. मसिह यांनी त्यांना फटकारले. गांधी यांचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांना न्यायालयाने प्रश्न केला की, चीनने दोन हजार चौरस किमी एवढा भारतीय भूभाग ताब्यात घेतला असल्याचे आपणास कसे काय माहीत झाले? त्याबद्दलचे काही ठोस पुरावे आपणाकडे आहेत का? अशी विचारणा न्यायालयाने सिंघवी यांच्याकडे केली. ही विचारणा करतानाच, आपण खरे भारतीय असाल, तर आपण असे वक्तव्य केले नसते, असा शेराही न्या. दत्ता यांनी मारला. सिंघवी यांनी पक्षकाराचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. पारदर्शकता असायला हवी आणि कोणतीही माहिती दडवून ठेवली जाता कामा नये, या हेतूने असे वक्तव्य केल्याचे सिंघवी यांनी न्यायालयास सांगितले. (पान ४ वर)




# युद्ध वार्ताहर अर्नी पाईल

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

अगदी काटेकोरपणे बोलायचे तर महाभारतामधला संजय हा जगातला पहिला युद्ध वार्ताहर म्हणावा लागेल. राजा धृतराष्ट्राला कुरुक्षेत्राच्या रणांगणावरची प्रत्येक घटना, प्रत्येक हालचाल तो 'लाईव्ह' सांगत होता. पण ही द्वापार युगातील घटना झाली. कलियुगातील इतिहास काळात आशिया खंडातले आणि युरोप खंडातले राजे, सेनापती यांच्या युद्धांची वर्णने काव्य, नाटक, ताम्रपट आणि शिलालेख यामधून आढळतात. ही पराक्रम काव्ये रचणारे आणि गाणारे भाट, चारण लोक किंवा नाटके लिहिणारे कवी हे स्वतः काही युद्धावर जाणारे नव्हते किंवा नसावेत. पण युद्धावरून परतलेल्या लोकांना भेटून, त्यांच्याकडून माहिती घेऊन ते आपली काव्ये, नाटके रचित असावेत, असा तर्क करता येतो.

मुसलमान बादशहांच्या पदरी तवारिखनवीस असत. तवारिख म्हणजे ऐतिहासिक वृत्तांत. तवारिख लिहिणारा तो 'तवारिखनवीस.' मात्र ही काव्ये, नाटके आणि तवारिखा या अतिशयोक्त, स्तुतिपवर वृत्तांतांनी भरलेल्या आढळतात. त्यात वस्तुनिष्ठ वृत्तांतापेक्षा आपला राजा, सेनापती, बादशहा यांची अतिशयोक्त स्तुती केलेली दिसते. पण यात आश्चर्य काही नाही. ते कवी आपल्या राजाची, आपल्या मालकाची स्तुती करणारच. आजचे 'चाय-बिस्कुट पत्रकार' तरी काय वेगळे करतात? असो. तर आपण आता इतिहास काळाकडून आधुनिक काळाकडे आणि त्यातल्या बातमीदारीकडे बघूया. आधुनिक काळातले पहिले छापील वृत्तपत्र सन १६०५ साली जर्मनीमध्ये स्ट्रासबर्ग येथे छापले गेले. 'अकाऊंट ऑफ ऑल डिस्टिंग्विश्ड ॲण्ड कोमेमोरेबल न्यूज' अशा या लांबलचक नावाच्या वृत्तपत्राचा संपादक होता जोहान कॅरोलस नावाचा इसम. हे वृत्तपत्र दैनिक नसून साप्ताहिक होते. सहज मनात येते की, सन १६०५ साली आपल्याकडे काय चालले होते? तर त्यावर्षी अत्यंत धूर्त, पाताळयंत्री आणि कपटी असा अकबर बादशहा मेला आणि त्याचा व्यसनी, लंपट मुलगा-जहांगीर गादीवर आला. इकडे महाराष्ट्रात निजामशाही राजवट चालू होती. पण त्याचवर्षी अखिल भारतवर्षाच्या, अखिल हिंदू समाजाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत शुभसूचक अशी एक घटना घडली. निजामशहाचे दोन सरदार मालोजी भोसले आणि लखूजी जाधव यांची मुले अनुक्रमे शहाजी भोसले- वय सुमारे ११ आणि जिजाबाई जाधव- वय सुमारे ५ यांचा विवाह झाला.


अर्नी पाईल

समजा, आपल्याकडे त्यावेळी वृत्तपत्रे असती, तर त्यांनी वरील दोन घटना कशा 'कव्हर' केल्या असत्या? असो. प्रत्यक्षात आपल्याकडे पहिले वृत्तपत्र सुरू व्हायला आणखी पावणे दोनशे वर्षे उलटावी लागली. सन १७८० साली जेम्स ऑगस्टस हिकी या इसमाने कोलकात्यामध्ये 'बेंगॉल गॅझेट' हे वृत्तपत्र सुरू केले. हे भारतातले आधुनिक काळातले पहिले छापील वृत्तपत्र होय. पण आपल्याकडेच नव्हे, तर युरोप आणि अमेरिकेतही वृत्तपत्रांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि तसाच खप सुरू झाला तो सन १८३० पासून. कारण त्यावर्षी नवी, वेगाने छपाई करू शकणारी मुद्रण यंत्रे बाजारात आली. वृत्तपत्र उत्पादन हा एक व्यवसाय बनला. पाश्चिमात्य जगात प्रत्येक देशात, प्रत्येक शहरात नवनवीन वृत्तपत्रे निघू लागली. तोपर्यंत संपादक आणि त्याचे एखाद-दोन सहायक एवढाच कर्मचारी वर्ग पुरेसा असे. आता संपादन वेगळे, बाहेरून बातम्या पाठवणारे वेगळे, त्या बातम्यांचे व्यवस्थित वृत्तांकन करणारे वेगळे, असा कार्यविस्तार विभागणी आपोआपच होत गेली.

लंडनचे सुप्रसिद्ध 'द टाईम्स' हे वृत्तपत्र मुळात १७८५ साली अन्य नावाने सुरू झाले. ते पुढे १७८८ साली 'टाईम्स' या नावाने निघू लागले. सन १८५० साली प्रशिया आणि डेन्मार्क यांच्यात एक युद्ध झाले. लंडन टाईम्सचा संपादक जॉन डिलेन याच्या डोक्यात आले, हे युद्ध 'कव्हर' करायला एखादा खास वार्ताहरच का पाठवू नये? त्याने विल्यम हॉवर्ड रसेल या २३ वर्षांच्या तरुण बातमीदाराला प्रत्यक्ष रणभूमीवर पाठवले.

रसेलने पाठवलेल्या बातम्या संपादक डिलेनला आणि मग टाईम्सच्या वाचकांनाही आवडल्या. नंतर १८५४ साली क्रीमियामध्ये रशिया विरुद्ध तुर्कस्तान-फ्रान्स-इंग्लंड यांच्यात युद्ध सुरू झाले. हेच ते प्रसिद्ध 'क्रीमियन युद्ध.' जॉन डिलेनने ते कव्हर करायला पुन्हा रसेललाच पाठवले आणि पत्रकारितेत 'युद्ध वार्ताहर-वॉर करस्पॉण्डण्ट' या नव्या संकल्पनेचा जन्म झाला. क्रीमियन युद्धाची विल्यम रसेलने पाठवलेली वार्तापत्रे फारच गाजली. त्यामुळे अर्थातच पुढे १८५७ साली भारतात जेव्हा ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध क्रांतियुद्ध सुरू झाले, तेव्हा रसेललाच भारतात पाठवण्यात आले. त्यामुळे भारतीय नसला तरी भारतातल्या युद्धांचे प्रत्यक्ष रणभूमीवर हजर राहून वार्तांकन करणारा पहिला युद्ध वार्ताहर विल्यम रसेलच ठरतो.

**आता आपण अमेरिकेकडे वळू या.**

इंडियाना हा अमेरिकेचा एक प्रांत आहे. तिथल्या व्हर्मिलियन नामक परगण्यात डाना या अगदी लहानशा खेड्यात एका सामान्य शेतकरी कुटुंबात अर्नेस्ट ऊर्फ अर्नी पाईल याचा जन्म झाला. त्याचे आई-वडील जेमतेम आठवी शिकलेले होते. अर्नीला शेती करण्यात स्वारस्य नव्हते. त्याला सैनिक बनायचे होते नि खूप प्रवास करायचा होता. तो अमेरिकन नौदलात भरती झाला.

युरोपात महायुद्ध सुरू होते. पण... पण... अर्नीचे प्रशिक्षण सुरू असतानाच महायुद्ध संपले. नौदलातून बरखास्त झालेला अर्नी घरी परतला आणि पत्रकारिता शिकण्यासाठी इंडियाना विद्यापीठात दाखल झाला. इंडियाना विद्यापीठाच्या बेसबॉल संघातून जपानचा दौरा करण्याची संधी अर्नीला मिळाली.

पॅसिफिक महासागरातून जपानकडे जाता-येताना हाँगकाँग, शांघाय, मनीला इत्यादी मोठी शहरे पाहण्याची संधी अर्नीला मिळाली. त्याच्या अत्यंत खुमासदार प्रवास वृत्तांत लेखनाची बीजे याच प्रवासात रुजली. पुढे तो प्रथम इंडियानामधल्या 'डेली हेराल्ड'मध्ये आणि नंतर राजधानी वॉशिंग्टनमधल्या 'द वॉशिंग्टन डेली न्यूज' या वृत्तपत्रात रुजू झाला. ते १९२३ साल होते. १९२५ साली अर्नीने जेराल्डिन ऊर्फ जेरी सीबोल्डस् हिच्याशी लग्न केले आणि पुढची १५ वर्षे म्हणजे १९४० पर्यंत नवरा-बायकोने संपूर्ण अमेरिका खंड म्हणजे उत्तर अमेरिका, मध्य अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेत मोटारने नि विमानाने १ लाख मैल किंवा १ लाख ६० हजार किमी प्रवास केला. या त्याच्या अफाट प्रवासाच्या वृत्तांताचा त्याचा स्तंभ आठवड्यातले सहा दिवस छापून यायचा आणि त्यावर वाचकांच्या उड्या पडायच्या.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर ते कव्हर करायला अर्नी लंडनला पोचला. जुलै १९४० ते ऑक्टोबर १९४० असे पावणेचार महिने जर्मन वायुदलाने ब्रिटनवर बेसुमार बॉम्बवर्षाव करून ब्रिटनला युद्धातून उखडून काढण्याचा निकराचा प्रयत्न केला. यालाच 'बॅटल ऑफ ब्रिटन' असे म्हणतात. नेमका त्यावेळी अर्नी लंडनमध्ये होता. कोणत्याही वार्ताहरासाठी ही पर्वणीच होती.



अर्नी पाईलची युद्ध वार्तापत्रे जवळपास प्रत्येक अमेरिकन माणूस वाचत असे. राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांची पत्नी एलेनॉर रुझवेल्ट ही सुद्धा 'माय डे' नावाचा एक वृत्तपत्रीय स्तंभ लिहीत असे. त्यात ती अर्नी पाईलच्या वार्तापत्रांचा आवर्जून उल्लेख करीत असे.

साहजिकच १९४२ मधल्या उत्तर आफ्रिकेतल्या जर्मन जनरल रोमेल विरुद्धच्या दोस्त राष्ट्रांच्या मोहिमेच्या वृत्तांकनासाठी अर्नीलाच पाठवण्यात आले. अर्नीची वार्तापत्रे आणि त्याचे सर्वांशी खेळीमेळीने वागणे, यामुळे अगदी सामान्य रायफलमनपासून ते जनरल ओमार ब्रॅडली, जनरल आयसेनहॉवर अशा सर्वोच्च सेनापतीपर्यंत संपूर्ण अमेरिकन सैन्यात अर्नी सगळ्यांचा लाडका झाला. त्याला सर्वत्र मुक्तद्वार असे. जून १९४४ मध्ये दोस्त सैन्याने फ्रान्समध्ये नॉर्मंडी या समुद्रकिनाऱ्यावर प्रचंड सैन्य उतरवून फ्रान्स जर्मनांच्या ताब्यातून मुक्त करायला सुरुवात केली. अर्नी पाईलने या प्रसंगावर लिहिलेले वार्तापत्र युद्ध वार्तांकनाचा एक आदर्श नमुना मानले जाते. लोकांनी ते पुन्हा पुन्हा वाचले.

१९४५ साली अमेरिकेने जपानी आरमाराविरुद्ध जबरदस्त प्रतिचढाई सुरू केली. दुसऱ्या महायुद्धातली ही सर्वांत भीषण आरमारी लढाई मानली जाते. 'बॅटल ऑफ ओकिनावा' म्हणून ती प्रसिद्ध आहे. ती कव्हर करायला अर्थात अर्नी पाईल होताच. पण ही पाईलची शेवटची कामगिरी ठरली.

अमेरिकन नौदलाने 'ले शिमा' नावाचे बेट जिंकले. ते बघायला लेफ्टनंट कर्नल जोसेफ कूलीज याच्यासह अर्नी पाईल बेटावर उतरून हिंडत असताना लपून बसलेल्या एका जपानी सैनिकाने मशीनगन चालवली आणि अर्नी पाईल ठार झाला. अमेरिकन नौदलाने संपूर्ण सैनिकी इतमामाने त्याचे दफन केले. नुकतेच राष्ट्राध्यक्षपदी आलेल्या हॅरी ट्रूमनसकट संपूर्ण अमेरिकेने त्याला श्रद्धांजली वाहिली. या वेळेपर्यंत त्याच्या लेखनाची वाचकप्रियता एवढी वाढली होती की, त्याचा सिंडीकेटेड स्तंभ अमेरिकेतली ४०० दैनिके आणि ३०० साप्ताहिके छापत होती. त्याच्या निवडक लेखांचे पाच संग्रह प्रसिद्ध झालेले असून आजही ते लोकप्रिय आहेत.

अवघे ४५ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या अर्नी पाईलचा जन्म ३ ऑगस्ट १९०० या दिवशीचा म्हणजे त्याच्या जन्माला यंदा १२५ वर्षे होत आहेत. शेतकऱ्यांची मुले अशी सुद्धा असतात. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# उशिराचे सुख

सुखात्म
डॉ. अविनाश मोहरील

एका माणसाला एकदा लकी ड्रॉमध्ये एक बक्षीस मिळाले. सहजच काही विशेष न करता त्याला ते मिळाल्याने फार आनंद झाला. ते बक्षीस म्हणजे त्याला त्याच्या परिवारासोबत एका अत्यंत देखण्या चित्रपटगृहामध्ये हवा तो चित्रपट बघण्याच्या पासेस. ज्या क्लासच्या पासेस त्याला मिळाल्या होत्या त्यामध्ये एका व्यक्तीचे तिकीट ४५० रुपये होते. त्यामुळे घरातल्या चार जणांकरिता या पासेस म्हणजे पर्वणीच होती.

मध्यमवर्गीय परिवार असणारा तो माणूस ज्याला एरवी स्वत:चे पैसे खर्च करून अशा क्लासमध्ये चित्रपट बघणे जमले नसते. त्यामुळे त्याला व त्याच्या परिवाराला फार आनंद झाला. त्या पासेस वापरण्याची मर्यादा मात्र सहा महिन्यांची होती. सहा महिन्यांच्या काळात त्यांचा वापर करायचा होता. त्यामुळे त्याने ठरविले कीश अनायसे पासेस मिळाल्या आहेत तर आपण एखादा चांगला चित्रपट बघितला पाहिजे. चांगल्या चित्रपटाची तो वाट बघू लागला. दोन-तीन महिने निघून गेले; त्याला हवा तसा चांगला चित्रपट लागलाच नाही. मग त्याच्या परिवारातील लोकांनी चौथ्या महिन्यात एक चांगला चित्रपट लागलाय असे सांगितले. तो म्हणाला, यापेक्षाही चांगला चित्रपट लागेल. म्हणून पुन्हा वेळ गेला. शेवटी असे करता करता पासेसचा कालावधी संपायला एकच आठवडा राहिला.

आता मात्र त्या वापरल्या नाही तर त्यांची संधी जाणार होती. म्हणून जो आहे तो चित्रपट त्यांनी बघितला. तो अतिशय वाईट होता. एकंदरीत चांगला चित्रपट बघायला मिळेल व त्यामधून भरपूर आनंद मिळेल या नादात त्यांना एक अतिशय वाईट चित्रपट बघावा लागला. सुख प्राप्त करण्याचे लांबविल्यामुळे, सुख प्राप्त करायला उशीर केल्यामुळे चार महिन्यांपूर्वी लागलेला बऱ्यापैकी चित्रपटदेखील त्याने गमावला. या मानसिकतेच्या सवयीला मानसशास्त्रामध्ये 'डिलेड ग्रॅटिफिकेशन' असे म्हणतात. उशिराचे सुख.



मानवी स्वभावाचे विविध पैलू असतात. त्यापैकी अनेकांमध्ये आढळणारा पैलू असतो डिलेड ग्रॅटिफिकेशन. सुख प्राप्त करण्यासाठी वाट बघणे. काही प्रमाणात या मनोवृत्तीच्या लोकांची सवय चांगली असते. साधारणपणे कोणत्याही बाबतीत धीर ठेवणारी ही मंडळी असतात. अगदी नवा ड्रेस विकत आणल्यावर त्वरित न वापरता तो काही महिने ठेवून त्यानंतर वापरणे; जेणेकरून बचत होऊ शकते, असा विचार साधारणपणे ही मंडळी करतात. मुळात सुख मिळविण्यासाठी त्यांची वाट बघण्याची तयारी असते. त्यांच्या मनाची अशी काहीशी ठेवण असते की, आता लगेच जर एखाद्या गोष्टीचे सुख प्राप्त होत असेल तर काही दिवस वाट बघितल्याने आणखी जास्त चांगल्या प्रकारे व त्यापेक्षाही मोठे सुख अनुभवता येईल, असा या मंडळींचा विचार असतो. त्यामुळे यांना वाट बघणे जमते व त्या वाट बघितल्यामुळे कधी कधी त्यांचा फायदाही होतो. तसा फायदा झाला की, त्यांचा त्यांच्या डिलेड ग्रॅटिफिकेशन सवयीवर विश्वास बसतो आणि ते त्याच पद्धतीने वागू लागतात. या लोकांमध्ये आणखी एक प्रकार असतो. ही मंडळी दैववादी किंवा भाग्याचा विचार करणारी असते. सुखाची वाट बघत असताना कधी कधी त्या पद्धतीचे सुख त्यांना हुलकावणी देते त्यामुळे ही मंडळी नाराज होते. परंतु दैववादी असल्याने आपल्या नशिबात हे सुख नाही म्हणून त्यांची स्वत:ला समजावण्याची एक स्वतंत्र प्रक्रिया यांच्या मनात कार्यरत असते व म्हणूनच ही मंडळी सुखी राहू शकते किंवा तडजोडी स्वीकारू शकते. याच्या अगदी उलट मनोवृत्ती असलेली मंडळीही असते. त्यांच्यात डिलेड ग्रॅटिफिकेशन अजिबात नसते.

अर्जंट ग्रॅटिफिकेशन या प्रकारात जी मंडळी मोडते ती त्वरित व आलेला क्षण लगेच साजरा करणारी असते. वरचेच उदाहरण द्यायचे झाल्यास, नवा ड्रेस विकत घेतल्यावर त्याच दिवशी तो घालून फिरून येणे हा प्रकार या मंडळींमध्ये असतो. यांना वाट बघायला जमतच नाही. आताच जे सुख मिळतंय त्याचा आनंद घ्यायचा. 'कल किसने देखा है' अशी या मंडळींची सवय असते. वरील मंडळींच्या तुलनेत ही मंडळी जास्त उत्साही, जास्त लोकप्रिय व भरभरून जगणारी असते. त्यांचे सुख प्राप्त करण्याचे प्रमाणदेखील जास्त असते. अशा मंडळींना कधी कधी भविष्याचा वेध घेता येत नाही व व्यावहारिक पातळीवर ती सर्व बरेच वेळा अपयशी ठरतात. त्याचं सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे यांच्याकडे धीर नसतो. आलेला सुखाचा क्षण कशाचीही पर्वा न करता मनापासून जगायचा ही त्यांची भावना असते.

संगीत लागले असेल तर ही मंडळी त्वरित नाचणे सुरू करतील. धमाल नाचून घेतील, कुणी काय म्हणेल याची अजिबात पर्वा न करता. आधीच्या वर्गवारीतला व्यक्ती वाट बघेल, कधी मला चांगल्या गाण्यावर किंवा योग्य परिस्थितीमध्ये, टीका करणार नाहीत अशा लोकांच्या उपस्थितीत मी नाचीन. दोन्ही बाबतीत फायदे-तोटे आहेत. हा वाट बघणारा कदाचित वाटच बघत राहील आणि पुढे संधीच मिळणार नाही. तर, जो नाचला त्याला टीका सहन करावी लागेल. मुळात या दोन मनोवृत्ती तयार होण्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे सुखाच्या संकल्पनाच वेगवेगळ्या असतात आणि व्यक्तिपरत्वे त्या बदलत जातात. या दोन्ही प्रवृत्तीचा एकत्रितपणे विचार केल्यास या दोन्हीचा मध्य काढून जगणारी व्यक्ती सध्याच्या काळात यशस्वी जीवन जगू शकते. याकरिता सुखाच्या वर्गवारी केल्या तर ते जास्त फायद्याचे राहू शकते.

डिलेड ग्रॅटिफिकेशनची सवय असणाऱ्या मंडळींप्रमाणे भविष्याचा विचार डोक्यात ठेवून आणि भविष्यातील सुखाची चिंता करून काही बाबतीत वर्तमानात बंधने पाळण्याची गरज आहे. विशेषत: पैसा खर्च करण्याच्या बाबतीत ती काळजी गरजेची आहे. पुढे काही करताच येणार नाही आणि म्हणून 'कल किसने देखा है' या धुंदीत आज जे आहे ते उधळून टाकायचे व मग 'कल अगर देखने की जरूरत पडी तो, रडत बसायचे' हा प्रकार बरोबर नाही. छोट्या छोट्या गोष्टींमध्येही वाट बघत बसून जगण्याचा आनंद व सुख लांबणीवर टाकणे हे देखील साफ चुकीचे आहे. डिलेड ग्रॅटिफिकेशनवाले तसेही करतात. अगदी पावसात चिंब भिजताना अजून चांगला पाऊस येऊ देत, बघणारे फार लोक नसू देत, फार जोराचा किंवा फारच तुरळक पाऊस नको. मध्यम स्वरूपाचा पडेल तेव्हा मी भिजीन असे म्हटले तर भिजणे राहूनच जाणार हे नक्की. डिलेड ग्रॅटिफिकेशनवाले क्षणांच्या सुखापेक्षा त्यामुळे काही अडचण तर निर्माण होणार नाही या भयापोटी सुखाचा भरभरून आनंद घेऊ शकत नाही. याउलट अर्जंट ग्रॅटिफिकेशनवाले अकारण धाडस करून अडचणीत सापडतात.

एकंदरीत या दोन्ही मनोवृत्तींचा मध्य साधल्यास आपल्याला अतिशय आनंदी जीवन जगता येऊ शकते. मुसळधार पावसाच्या दिवसात जिवाची चिंता करीत कारच्या काचा बंद ठेवून, ७० ते ८० च्या स्पीडमध्ये गाडी ठेवत, गाडीमध्ये कुठेही न थांबवता निमूटपणे गाडी चालवत व गाडीत बसलेल्या आपल्या आवडत्या व्यक्तीस शांतपणे व गप्प बसायला लावून प्रवास करता येतो व तो सुखरूप पूर्ण होऊ शकतोच. पुढे कधीतरी कमी पाऊस असताना बढीया मजा करत जाऊयात याची वाट बघत किंवा कार बाजूला ठेवून मुसळधार पाऊस पडत असताना जिवाची फार चिंता न करता, त्याच क्षणी आपल्या आवडत्या व्यक्तीस मोटरसायकलवर बसवून पावसात पावसाचे तुषार अंगावर झेलत चिंब चिंब होत प्रवासाला जायचे. निर्णय प्रत्येकाचा व्यक्तिगत आहे. डिलेड ग्रॅटिफिकेशन आणि अर्जंट ग्रॅटिफिकेशन याचा मध्य काढून जगल्यास सुखच सुख आहे.

# सद्भावना गुणक-२

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर

ऋग्वेदानं आपल्याला 'अज्ञात विषयांना प्रकट करणारे, प्रगतीला अखंडित ठेवणारे, दुर्दम्य असे कल्याणकारी विचार अबाधितपणे चहूबाजूंनी आमच्याकडे येत राहोत आणि रक्षण करण्यास सदैव सज्ज असलेले देवता प्रतिदिन आमच्या वृद्धीसाठी तत्पर राहो.' हा सद्भावनामूलक विचार दिला. त्याचीच पुढची पायरी म्हणजे आपल्या हातून जे काही घडावं ते शाश्वत म्हणजे दीर्घ काळ टिकणारं असावं, त्याचा फायदा सर्वत्र होऊन अवघा समाज विकसित व्हावा हा अंतरप्रवाहही त्यात आहे. परिपूर्णता, निर्विकल्पता आणि त्रिकालाबाधिता या तीन गुणांच्या संतुलित मेळातून साधलेल्या अक्षय्यतेची आस भारतीय गुणसूत्रात गुंफलेली आहे. उदाहरणार्थ यावत् चंद्र दिवाकरौ लोकप्रिय असण्याचा वरप्राप्त महर्षी वाल्मीकिविरचित रामायण, महर्षी व्यासांच्या महाभारत आणि अठरा पुराणांपासून, पाणिनीरचित व्याकरण, भरतमुनीरचित नाट्यशास्त्र आणि वराहमिहिरकृत बृहत्संहितेपर्यंत दीर्घकाळ टिकणाऱ्या ग्रंथ रचना.

सांचीच्या स्तुपापासून वेरूळच्या कैलास लेणं, तंजावूर बृहदीश्वर मंदिर, हळेबीडू चन्नकेशव मंदिरापर्यंतच्या वास्तुरचना याच माळेत गोवता येतील. असाच एक प्राचीन मंत्र आपल्या नित्यपूजेत म्हणण्याचा प्रघात आहे. साधारणत: रोगी आसन्नमरण असेल तर हा मंत्र म्हणण्याचा सल्ला दिला जातो. म्हणून त्याला महामृत्युंजय मंत्र म्हणतात -

'त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिम् पुष्टिवर्धनम् । उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात् ।।' शुक्ल यजुर्वेद, माध्यंदिन संहिता, अध्याय ६, सूक्त ६०। अर्थ - सुगंधानं आमचं जीवन पुष्ट करणाऱ्या त्र्यंबका (तीन नेत्र असलेल्या)चं आम्ही यजन म्हणजे पूजन करतो. ज्याप्रमाणे वाळकं (काकडी वर्गातील वेलीचं फळ) सहजतेनं (वेलीपासून) विलग होतं त्याच सहजतेनं (आम्हाला) मृत्यूच्या बंधनातून मुक्तता हवी अमरत्वापासून नको. या दोन ओळीत पोषण, विकास, उत्कर्ष, संवर्धन, अभ्युदय या सर्व संकल्पनांसाठी एकच शब्द योजला आहे 'सुगंधी'. त्यामागची कारणमीमांसा अशी -

मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासूनच नाकाला सुखावणारे ते सुवास किंवा परिमल आणि असह्य होणारे ते दुर्गंध, ही जाणीव स्पष्ट होती. असे नैसर्गिक सुवास फुलांच्या रूपात आढळतात. वनस्पतींच्या सगळ्या प्रजाती विकासाचा विशिष्ट टप्पा गाठल्यानंतरच फुलावर येतात. त्यासाठी त्यांचं पोषण आणि संवर्धन होणं अत्यावश्यक आहे.

या उलट ज्या वस्तूत नासणं, सडणं ही विघटनाची प्रक्रिया होत असते त्यातून सर्वत्र दुर्गंधी पसरते. संवर्धन आणि विघटन या दोन्ही प्रक्रिया परस्पर भिन्न असल्या तरी निसर्गाचं अभिन्न अंग आहेत. यातूनच प्रेरणा घेऊन पोषण, विकास, उत्कर्ष, संवर्धन, अभ्युदय हे सगळं कमीत कमी शब्दांत एकत्रितपणे मांडण्यासाठी 'सुगंधिं' हा शब्द योजण्यात आला. यात कुठेही विध्वंस, विनाश, नाश इत्यादी शब्द नाहीत. उलट आस आहे ती अमरत्वाची, नित्यनिरंतरतेची. हा सगळा विचारच सकारात्मकता आणि रचनात्मकतेवर आधारलेला आहे.

यानंतरची पायरी आहे ती झरा सतत वाहता हवा आणि माणूस सतत शिकता हवा या संस्काराची. विद्यार्थिवृत्ती अंगीकारावी असं आपली संस्कृती आपल्याला शिकवते. शिक्षण म्हटलं की एक शिकवणारा आणि एक शिकणारा अशी जोडीच अपेक्षित आहे. शिकवणारा तो शिक्षक (गुरू) आणि शिकणारा तो शिष्य. शिष्याला शिकवण्याच्या प्रक्रियेत शिक्षकदेखील पुन्हा एकदा तो विषय शिकत असतो. त्याला त्यातलं मर्म अधिकाधिक चांगल्या प्रकारे उलगडत जातं. एकूण शिकवण्या शिकण्याची ही प्रक्रिया दोघांचाही लाभ घडवून आणते.

गुरु-शिष्यात संवाद, समन्वय, सामंजस्य, साहचर्य आणि सहकार्य या पंच 'स'कारांचा समागम असावा तरच शिकण्या शिकवण्याची प्रक्रिया पूर्ण होते. त्यासाठी तैत्तरीय उपनिषदातला हा मंत्र अतिशय समर्पक आहे - 'सह नाववतु। ... मा विद्विषावहै ।।१९।।' या विषयी आपण याच स्तंभातील गुरवे नमः या लेखात एका पैलूवर प्रकाश टाकला आहेच. त्यातलाच दुसरा पैलू म्हणजे आम्ही दोघांनी मिळवलेल्या विद्या तेजस्वी व्हाव्यात आणि आमच्यात कोणत्याही प्रकारची विद्वेषाची भावना नसावी ही सदिच्छा!

महाकुंभ : सद्भावनेचा महाकोश



या पृथ्वीवर नांदून गेलेल्या प्राचीन संस्कृतीत किंवा सध्या मोठा जनाधार असलेल्या अब्राहमी परंपरेतील ज्यू-ख्रिश्चन आणि इस्लाम या तीनही एकग्रंथीय विचारधारेत अशा प्रकारचे वाक्य सापडत नाही. त्यामुळे ही प्रार्थना एकमेवाद्वितीय अशीच आहे. याच सद्भावनेचा आधुनिक आविष्कार म्हणजे भारतीय बनावटीची कोरोना लस आपल्या पंतप्रधानांनी इतर गरजू देशांना विनामूल्य उपलब्ध करून दिली. जागतिक पटलावर आपत्कालीन मदतीचा पहिला हात भारताचा पोहोचतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात मोदींनी 'तेजस्वि नावधीतमस्तु। मा विद्विषावहै।।' या संस्काराचाच परिपोष असलेलं धोरण राबवण्यास सुरुवात केलेली आहे.

खगोलात गुरू ग्रहाला सूर्याभोवतीच्या बाराराशींतून एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी पृथ्वीग्रहावरच्या बारा वर्षांचा काळ लागतो. गेल्या कित्येक सहस्रकांपासून गुरू-सूर्य आणि चंद्राच्या विशिष्ट खगोलीय स्थानानुसार दर तीन वर्षांनी हरिद्वार, प्रयाग, उज्जैन आणि त्र्यंबकेश्वर या चार ठिकाणी कुंभमेळ्ययाचं आयोजन होत असतं. हा एक अनुपम सोहळा आहे. कोणीही बाध्य (कम्पलसरी) न करता किंवा कोणी आमंत्रित (इनव्हाईट) न करता अथवा त्यासाठी कोणतीही रक्कम मिळत नसतानादेखील प्रचंड संख्येनं कुंभमेळ्याात सहभागी होणारे भाविक कशाच्या ओढीनं तिथे पोहचतात?

याचं उत्तर आहे- वैशिष्ट्यपूर्ण खगोलीय आणि भौगोलिक स्थितीत संपूर्ण विश्वातून येणारे दुर्दम्य आणि अबाधित कल्याणकारी विचार मन आणि बुद्धीत धारण करण्यासाठी. त्यातूनच सात्त्विक सदिच्छा, सद्भावना गुणका (गुडविल कोशंट) चं भरण- पोषण - संवर्धन करण्यासाठी. ही भावना शाश्वत राहो, तिला अमृतत्त्व प्राप्त करो आणि विश्वाचं कल्याण होवो हीच प्रार्थना करण्यासाठी. यातून सामूहिक सात्त्विक सद्भावनेच्या महाकोशाचं पुनर्भरण (री-चार्ज) करण्यात येतं. सनातनी लोक पावित्र्य (गंगा), ज्ञान (सरस्वती) आणि समर्पण (यमुना) अशा अद्भुत त्रिवेणी संगमात न्हाऊन निघत 'विश्व कल्याणाचा' वैयक्तिक सद्भावना गुणक वाढवतात. प्रत्येक सनातनी व्यक्तीला हा सद्भावना गुणक आनुवंशिक स्मृती (जेनेटिकल मेमरी) म्हणून मिळालेला आहे. संस्कार म्हणून त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच हा भारतीय संस्कार जोपासणं आपलं प्रथम कर्तव्य आहे.

## यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# जीवनाचे मूल्य किती?



**१.** मोहनने वेगवेगळे धंदे केलेत पण कुणीही त्याला काही धोके सांगितलेत की घाबरून लगेच तो धंदा बंद करीत असे. अनेकवेळा असे झाल्यावर तो खूपच निराश झाला. कुणीतरी त्याला एका मोठ्या साधूची माहिती दिली व ते नक्कीच तुला योग्य मार्गदर्शन करतील असे सांगितले. तो त्या साधूजवळ पोहोचला व त्यांना नमस्कार करून म्हणाला, ''देवाने मला असे निरुपयोगी जीवन का दिले?'' साधूने त्याला सांगितले, तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील.

साधूने त्याला मुठीत मावेल असा मोठा चमकदार लाल दगड दिला व सांगितले की, हा दगड कुठेच विकायचा नाही. फक्त वेगवेगळ्या दुकानात जाऊन त्याची किती किंमत विचारून शेवटी तो दगड न विकता परत आणायचा. मोहन तो दगड मुठीत घेऊन निघाला. आधी टरबूज विकणाऱ्याला किंमत विचारली. टरबूज विक्रेता म्हणाला, या दगडाचे मी तुला पाच टरबूज देईन. तेव्हा मला हा दगड विकायचा नाही असे म्हणून तो तिथून पुढे एका भाजी विक्रेत्याकडे गेला. तो भाजी विक्रेता म्हणाला, तुला या दगडाची किंमत म्हणून मी दोन पोते बटाटे व दोन पोते कांदे देईन.

सोनाराने त्या लाल दगडाची परीक्षा करून मी तुला या दगडाचे ३० लाख रुपये देईन असे सांगितले. पण साधूच्या सूचनेनुसार मला हा दगड विकायचा नाही म्हणून निघताना ''चल तुला याचे एक करोड रुपये देतो'' असा सोनार म्हणाला. पण मोहन तिथून निघाला व शेवटी हिरे विकणाऱ्या मोठ्या व्यापाऱ्याकडे गेला व त्याला तो लाल दगड दाखवून याची काय किंमत आहे असे विचारले.


हिऱ्याचा व्यापारी म्हणाला, हा अनमोल हिरा आहे. पृथ्वी दिली तरीही याची किंमत त्यापेक्षा जास्तच असेल. त्याचा अनुभव ऐकून साधूने त्याला समजाविले, अरे, तू सुद्धा असाच पृथ्वीमोलाचा आहेस. मात्र तुझी किंमत ओळखायला खरा पारखी हवा. तो पारखी आपणच व्हावं लागतं. पण तू स्वतःच तुझी किंमत ओळखली नाही तर दुसरा कुणीही तुझी खरी किमत सांगू शकणार नाही.

**२.** एकदा एका लोहाराने खूप मेहनत घेऊन एका राजाला एक अप्रतिम तलवार बनवून भेट दिली. त्या तलवारीला हवा तसा आकर्षक आकार आणण्यासाठी त्याने कोळशाच्या भट्टीवर तापवून खूप मेहनत घेतली. म्हणून राजाने खुश होऊन लोहाराला चंदनाची बाग भेट दिली. लोहाराला चंदनाच्या झाडांच्या किमतीची माहिती नव्हती. पण कोळशाचे महत्त्व पटले होते. त्यामुळे त्याने त्या झाडांना कापून त्यांचा कोळसा करून विकला. हळूहळू संपूर्ण बाग रिकामी झाली.

एक दिवस असेच राजा त्याच्या घराजवळून जात होता. राजाला वाटले लोहार आता खूप श्रीमंत झाला असेल. परंतु त्याची प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यावर लोहार अजूनही आधीसारखाच गरीब आहे असे पाहून राजाला आश्चर्य वाटले. सत्य समजल्यानंतर राजाने त्याला विचारले, तुझ्याकडे त्या बागेतील झाडाचे एखादे लाकूड शिल्लक आहे का? तेव्हा लोहारने कुऱ्हाडीचा दांडा दाखविला.

राजाने त्याला तो दांडा घेऊन चंदनाच्या व्यापाऱ्याकडे पाठवले. तेव्हा त्या छोट्याशा तुकड्याचे त्याला खूप पैसे मिळाले. आपली चूक लक्षात आल्यावर लोहार खूप रडू लागला. त्याने राजाला अजून एक चंदनाच्या झाडांचीच बाग पुन्हा देण्याची विनंती केली. तेव्हा राजा म्हटला ''अशी अमूल्य भेट वारंवार देता येत नाही.'' तसेही ज्या गोष्टी सहज मिळतात त्यांची आपल्याला किमत नसते. तुम्ही जन्म घेता त्या घरी किंवा शहरात किंवा नोकरीच्या ठिकाणी आधीपासूनच काही उत्तम प्रतीची संसाधने उपलब्ध असतील तर त्यांच्या खऱ्या किमतीची कल्पना नसल्यामुळे व ती संसाधने सहज आपसूकच प्राप्त झाल्यामुळे त्या संसाधनांचे महत्त्व कळतच नाही.

लौकिकदृष्ट्या एचएमटी ही मूळ तीन प्रकारची संसाधने आहेत. जो ही संसाधने योग्यरीत्या वापरतो व जीवन सार्थकी लावतो तोच खरा यशस्वी ठरतो. त्यात एच म्हणजे ह्यूमन रिसोर्स म्हणजे आपण स्वतः, कुठलीही व्यक्ती किंवा (मानव संसाधन) आपण जन्म घेतो त्या घरातील आजी-आजोबा, आई-वडील किंवा इतर कुटुंबीय, शाळेतील उत्तम अनुभवी शिक्षक, एम म्हणजे मनी किंवा मटेरियल म्हणजे घरातील सुखसोई, संपत्ती, व टी म्हणजे टाईम म्हणजे वेळ.




एमआरएस याचा अर्थ एम- मनी, आर- रिस्पेक्ट, एस- सॅटिसफॅक्शन

एकदा गेलेली वेळ पुन्हा येत नाही. या संसाधनाचे महत्त्व ओळखूनच त्यांचा नीट सदुपयोग करण्याची गरज असते.

सतत स्वतःला मनोरंजन केंद्रित ठेवल्यामुळे मनाला व शरीराला त्याचीच सवय होते व सुखलोलुपता वाढते. शिवाय तन-मन-धन यांचे महत्त्व व किंमत कळतच नाही. पण एकदा या तिन्ही गोष्टींचा ऱ्हास झाल्यावर त्या पुन्हा प्राप्त करण्यासाठी शक्ती व सातत्य कमी पडते. शिवाय मेहनत करण्याची सवयच नसल्यामुळे जेव्हा प्रत्यक्ष गरज पडते तेव्हा माणूस थकून जातो व स्पर्धेत मागे पडतो.

**तात्पर्य ? :** मन आणि शरीर वापरून आपण आपले आयुष्य जगतो. पण प्रत्यक्षात मानवी जीवनाच्या मूल्यांचे महत्त्व आपल्याला जीवनाचे शेवटचे श्वास चालू असताना समजतं. पण... त्यावेळेस उशीर झालेला असतो. क्षुल्लक गोष्टीबद्दल नाराज होण्याची गरज नसते, कारण आपला 'एकत्र प्रवास' खूपच छोटा असतो. आपण म्हणतो, देवा, मला अजून थोड़ा वेळ दे, परंतु त्यावेळी वेळ मिळणे अशक्य असते. मानवी जीवन अनमोल आहे. असे जीवन परत मिळत नसते. तेव्हा आपल्या जीवनाचा सदुपयोग करून ते सार्थकी लावावे हेच संतांनी सांगितलंय.

**जीवनाबद्दल बोलताना कबीरजी म्हणतात...**
आछे दिन पाछे गए, हरि से किया न हेत । अब पछताए होत क्या, चिड़िया चुग गयी खेत ।।
अर्थ - जसे पक्ष्यांनी शेतातील सगळे धान्य फस्त केल्यावर पक्ष्यांच्या मागे धावून किंवा पश्चात्ताप करून ते धान्य परत मिळणार नाही. तसेच जेव्हा जीवनात चांगले दिवस होते तेव्हा कधी देवाचे नाव घेतले नाही, ना त्याचे स्मरण केले आणि आता वेळ गेल्यावर पश्चात्ताप करून काय फायदा?

आता थांबतोय... : लेखासोबत फोनक्रमांक असल्यामुळे वाचकांनी कॉल व मेसेज करून आणि अनेकांनी प्रत्यक्ष भेटून चार वर्षे व चार महिने या कालावधीत शेकडो प्रतिक्रिया दिल्यात. त्यात वयाने ज्येष्ठ अशा ९५ वयातील वाचकांचा सुद्धा समावेश होता.

विविध प्रतिक्रियांनुसार कुणाला प्रेरणा तर कुणाला दिशा मिळाली, भीती कमी झाली, आत्मविश्वास वाढला, समस्या व शंका निवारण झाले, नोकरी-धंद्यासाठी उत्तेजन मिळाले, उत्साह वाढला, भक्ती, शक्ती वाढली, मन शांत झाले, समाधान व नवीन शिकायला मिळाले..!

शिक्षकांना, प्रशिक्षकांना विद्यार्थ्यांना सांगायला माहिती व गोष्टी मिळाल्यात. त्यामुळे बहुसंख्य वाचकांनी या लेखांचे संकलन करून पुस्तक प्रकाशित करण्याचा आग्रह केला. ज्यांना ''कशासाठी? यशासाठी!'' लेखांचे संकलन पुस्तकरूपात हवे असेल त्यांनी व्हॉट्सॲप मेसेजद्वारे कळवावे ही विनंती.

तरुण भारतचे आभार : मी काही तसा लेखक नाही. पण नागपूर तरुण भारतचे माजी संपादक गजानन निमदेव (आता, ''राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ'') यांनी अनुमती दिल्याने उत्साहाने लेख लिहिलेत. ''कशासाठी? यशासाठी!'' असे शीर्षक घेऊन ४ एप्रिल २०२१ पासून सुरू झालेल्या या मालिकेत सॉफ्ट स्किल्स, जीवन व व्यवस्थापन कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, करीअर मार्गदर्शन, अध्यात्म, योगशास्त्र, मानसशास्त्र, आयुर्वेद, आरोग्य, भारतीय सण-संस्कृती, पालकत्व, कुटुंबप्रबोधन, देशभक्ती, सामाजिक सुरक्षितता वगैरे विषयांशी संबंधित लेखन केले. हा लेख धरून एकूण २२२ लेख झालेत.

या लेखमालेला वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. तसेच 'तरुण भारत- सोलापूरने' देखील ही लेखमाला प्रकाशित केली. तेव्हा संपूर्ण तरुण भारत परिवाराचे मी मनापासून आभार मानतो.

हा या स्तंभातील शेवटचा लेख. सर्वांना धन्यवाद. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## ठाव दे केशवा । चरणासी ।।

देखिले म्या डोळा । मंगल चरण ।।
रूप ते सगुण । कैवल्याचे ।।१।।

चंदन कस्तुरी । शोभे भाळावरी ।।
तुळस मंजिरी । रुळे गळा ।।२।।

विटेवरी उभा । देव भक्तांसाठी ।।
चंद्रभागे तटी । परब्रह्म ।।३।।

मना लागे ओढ । देह हा पंढरी ।।
चैतन्याची वारी । श्वास झाला ।।४।।

आता कैसी आस । उरली न देवा ।।
ठाव दे केशवा । चरणासी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## श्रावणसरी

श्रावणाच्या सरी झरल्या । आल्या माझ्या दारी ।।धृ।।
वीज चमके लखलखिती । गरजत घन बरसती ।।
श्रावण आला रे । श्रावण आला रे ।।
श्रावणाच्या सरी झरल्या । आल्या माझ्या दारी ।।१।।
मदोन्मत्त आल्या सरी । दादूरा बोले किरी-किरी ।।
श्रावण आला रे । श्रावण आला रे ।।
श्रावणाच्या सरी झरल्या । आल्या माझ्या दारी ।।२।।
घनशाम झाली । कडकडूनी वीज आली ।।
पाऊस आला रे । पाऊस आला रे ।।
श्रावणाच्या सरी झरल्या । आल्या माझ्या दारी ।।३।।
मोती झरले मेघांतून । वारा वाहे झाडांतून ।।
अमृतवर्षा रे । अमृतवर्षा रे ।।
श्रावणाच्या सरी झरल्या । आल्या माझ्या दारी ।।४।।
राग गायनी मल्हारा । मनवा आनंदे स्वरधारा ।।
संगीत धारा रे । मल्हार धारा रे ।।
श्रावणाच्या सरी झरल्या । आल्या माझ्या दारी ।।५।।

डॉ. मिलिंद इंदूरकर

## उपेक्षा

चांगली कामे करून देखील
वाट्याला येत राहिली निंदा
श्रेय येती फुकाचे बाकीचे
कारण त्यांची आहे सलगी बघा
न्याय दरबारी परमेश्वराच्या
मला कधी मिळेल का!
दळतो आंधळा आयुष्यभर नुसता
पण बघा पीठ खात राहतो कुत्रा
पण हा कायदा तरी कसला डोंबलाचा!
नशिबाला दोष द्यायचा आपल्या

अशोक जोशी

## कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# रामायण समजून घेताना

**रा**मायण एक शाश्वत प्रेमकथा आहे. अनेक नद्यांचा संगम व्हावा तशा श्रीरामाच्या सर्व माता आणि पत्नी सीतामाई रघुनंदन नावाच्या अथांग सागरात विलीन झाल्या आहेत. या नद्यांची भाषा वेगवेगळी असेल पण ओढ मात्र एकच आहे. दशरथ राजाच्या प्रमुख तीन राण्या म्हणजे कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी. देवतांनी भगवान विष्णूला विनंती केली की त्यांनी पृथ्वीलोकावर जन्म घेऊन रावणाचा वध करावा, तेव्हा देवतांनीसुद्धा या तीन राण्यांचा उल्लेख केला आहे. ऱ्ही, श्री आणि कीर्ती अशी त्यांची नावे आहेत. पहिली 'ऱ्ही' कौसल्या म्हणजे मर्यादा आणि शालीनतेचा अद्‌भुत संगम, दुसरी 'श्री' म्हणजे सुमित्रा, जी बुद्धी आणि धर्माचा अद्‌भुत संगम आहे. तिसरी 'कीर्ती' म्हणजे कैकेयी जी मान, प्रतिष्ठा आणि यशाचा त्रिवेणी संगम आहे.

लग्नाला बरीच वर्षे झाली तरी संतती नसल्यामुळे राजा दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञ केला. खिरीच्या प्रसादाचा अर्धा भाग त्याने महाराणी कौसल्येला दिला. कारण यज्ञाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी पतीबरोबर यज्ञासाठी दीक्षा महाराणी कौसल्येनेच घेतली होती. कैकेयी आवडती राणी असूनही यज्ञदेवतेचा तो प्रसाद राजाने तीन राण्यांमध्ये समसमान वाटला नाही हे विशेष. इक्ष्वाकू वंशात सर्वांत मोठा मुलगा सिंहासनावर येतो ही गोष्ट लक्षात घेऊन खिरीचा सर्वांत मोठा भाग त्याने पट्टराणी कौसल्येला दिला असावा.

दशरथ राजाच्या प्रत्येक राणीला अपत्यप्राप्ती झाली. त्यातले सर्वांत मोठे अपत्य म्हणजे रघुकुल दीपक श्रीराम. रामायणात श्रीराम कथेचे केंद्रबिंदू आहेत. केंद्रबिंदू जरी असले तरी त्यांच्या माता आणि पत्नीशिवाय ते श्रीराम होऊ शकले नसते आणि रामायण घडले नसते. त्यामुळे श्रीरामाचे स्मरण करायचे असेल तर सर्वप्रथम त्यांच्या आयुष्यातल्या स्त्रीशक्तीचे स्मरण केले पाहिजे. वनवासी जाण्यासाठी निरोप घेताना रामाने कौसल्या आईचे आशीर्वाद मागितले. तेव्हाचा कौसल्येचा शोक तिच्या वैवाहिक आयुष्यावर प्रकाश टाकणारा आहे. पतीकडून सुख मिळाले नाही आणि तिचे स्थान कैकेयीच्या दासीसारखे राहिले असे तिने म्हटले आहे. मुलगा राज्य करेल तेव्हा सुख मिळेल असे तिला वाटले होते. राम-सीतेला वल्कलांमध्ये बघून तिला हुंदका फुटतो. पण राजा दशरथ अतिदुःखाने खाली कोसळतो तेव्हा मात्र ती स्वतःचे दुःख बाजूला ठेवते आणि दशरथाला आधार देते. रामवियोगामुळे कौसल्या दुःखाने कोसळली आहे तरी पट्टराणीची शालीनता तिने कधीच सोडली नाही.

भरताने तिला 'धर्मपरायणा' असे म्हटले आहे. पण तिने रामाला वनवासी जावे लागले म्हणून भरतावरही संशय घेतला. पण भरत करुण विलाप करतो आणि ती भरताला प्रेमाने जवळ ओढून घेते. त्याच्याबरोबर रामाला आणण्यासाठी अरण्यात जाते. ते दोघेही भरद्वाज ऋषींच्या आश्रमात रात्रभर राहतात तेव्हा भरत कौसल्येची ओळख करून देतो, दुःखाने आणि उपवासांनी ज्या अत्यंत अशक्त आणि दुःखी दिसत आहेत त्या माझ्या ज्येष्ठ माता कौसल्या आहेत.

कौसल्या दुःखाने कोलमडली पण राजधर्माला कधी विसरली नाही. तिला पती-वियोग झाला. तिच्या पुत्राला वनवास पत्करावा लागला. पण ती रामाला सांगते, 'धर्मज्ञ इति धर्मिष्ठ धर्मं चरितमिच्छसि।' हे पुत्रा, तू धर्माप्रमाणे आचरण कर.

श्रीराम जेव्हा पुन्हा अयोध्येला येतात, तेव्हा पुत्रवियोगाने निस्तेज झालेल्या महाराणी कौसल्येचे करुण वर्णन वाल्मीकिंनी केले आहे. ऊर्मिला आणि सुमित्रा ही सासू- सुनेची जोडी रामायणाची खोलवर रुजलेली वेदना आहे. सुमित्रा राजा दशरथाची मधली राणी आहे. पुत्रकामेष्टी यज्ञाच्या वेळी दशरथाने सुमित्रेला दोनदा वेगवेगळ्या भागात प्रसाद दिला आणि त्यामुळे तिला दोन मुले झाली असावीत. संपूर्ण रामायणात तिचा दशरथासोबत एकदाही संवाद नाही. पण जेव्हा कैकेयीने भरताचे राज्य आणि रामाला वनवास या दोन गोष्टींची वचने मागितली तेव्हा दशरथाने प्रचंड आक्रोश केला. तो म्हणतो, राज्याभिषेक करण्याऐवजी मी रामाला वनवासाला धाडले तर सुमित्रा केवढी दुःखी कष्टी होईल! हा तिचा विश्वासघात असेल.

राम तिचा मुलगा नसतानाही सुमित्रेचे तिचा मुलगा लक्ष्मणापेक्षा रामावर जास्त प्रेम होते असे यातून दिसते. वनवासाला जाताना जेव्हा लक्ष्मण तिच्या पाया पडायला येतो तेव्हा तिच्या ओजस्वी वाणीने आणि विचाराने थक्क व्हायला होतं. ती म्हणते, **'रामं दशरथं विध्दि मां विध्दि जनकात्मजाम्। अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात यथासुखम्।।'** (अयोध्या कांड ४०/९) खरे तर राम हा सुमित्रेचा मुलगा नाही. पण लक्ष्मणाला ती अरण्यात जाण्यापासून अडवत नाही. लक्ष्मणाला ती म्हणते, हे पुत्रा, तुझा पिता आता राम आहे आणि जनकपुत्री सीता तुझी आई आहे. आणि ते अरण्य म्हणजे तुझी अयोध्या आहे.



वनवासाला जाण्याच्या वेळी फक्त एकटी सुमित्रा धीरोदात्तपणे राम- लक्ष्मणाच्या बाजूने उभी आहे. लक्ष्मणालाही जावे लागत आहे याचा कांगावा तिने कौसल्येजवळ केला नाही. तिने रडून आक्रोश करणाऱ्या कौसल्येला दिलासाच दिला आहे. या प्रसंगात तिचे कणखर व्यक्तिमत्त्व उठून दिसते आणि रामप्रति तिचा वात्सल्यभाव बघून मन उचंबळून येते. कैकेयीच्या मनात खरंतर रामाबद्दल भरताएवढेच प्रेम होते.

मंथरेने रामाच्या राज्यरोहणाची बातमी दिली तेव्हा आनंदाने ती सर्वांना भेटवस्तू वाटू लागली. पण या आनंदाच्या क्षणी मंथरेने तिचे कान भरले आणि रामायण घडले. एका क्षणाला नकारात्मक विचार सकारात्मक विचारांवर वेगान आक्रमण करताना दिसतात आणि नकारात्मक विचारांचा विजय होतो आणि हाच विजय जास्त सोपा होता. यानंतरचे कैकेयीचे व्यक्तिमत्त्व अतिशय क्रूर वाटते. तिने स्वतः सीतेसाठी वल्कले आणली. रामाने वनवासास दंडकारण्यासारख्या निबिड अरण्यातच जावे अशी स्पष्ट सूचना केली.

राजा दशरथाचा सारथी सुमंत म्हणतो की, मुलगी नेहमी आईचे संस्कार घेते आणि कैकेयीची आईदेखील अत्यंत दुराग्रही होती. कैकेयीचे वडील अश्वपती यांना पशुपक्ष्यांच्या भाषांचे ज्ञान होते. त्यांच्या गुरूंनी त्यांना एक अट टाकली होती की ही गोष्ट कोणालाही सांगायची नाही. एकदा बागेतल्या झाडावर बोलणाऱ्या पक्ष्यांचे बोलणे ऐकून ते खुदकन हसले. कैकेयीच्या आईने हसण्याचे कारण जाणून घेण्याचा हट्ट धरला. जर राजाने सांगितले असते तर त्याचे मरण अटळ होते. गुरूने त्याला सल्ला दिला, जी पत्नी हट्टापायी तुझ्या मृत्यूचीही पर्वा करीत नाही तिच्यापासून दूर गेलेलेच बरे.

कैकेयीच्या स्वभावाच्या दोन्ही बाजू ठळकपणे दिसून येतात. एक बाजू श्रीरामावर निरतिशय प्रेम करते आणि दुसरी बाजू तेवढाच द्वेष करते. प्रत्येक मानवी स्वभावाला शिखर आणि तळ दोन्ही असते हेच सनातन सत्य कैकेयीच्या व्यक्तिरेखेतून दिसते. सीतेचे व्यक्तिमत्त्व वनवासकाळात खुलत गेले. 'जेथे राघव तेथे सीता' ही उक्ती खरी असली तरी सीतेचे व्यक्तिमत्त्व प्रखर स्वाभिमानी होते. प्रसंगी सीतामाईने श्रीरामाचीदेखील कानउघाडणी करायला कमी केले नाही. जेव्हा श्रीराम सीतामाईला सांगतात की त्यांच्या अनुपस्थितीत सर्वांबरोबर कसे वागावे तेव्हा ती अतिशय तिखट प्रतिक्रिया देते. मला इथे ठेवून वनवासाला जाण्याचे तुमचे बोलणे हास्यास्पद आहे. इथे मी कोणाबरोबर कसे वागावे याची शिकवण मला माझ्या आई-वडिलांनी चांगली दिली आहे. तेव्हा तुम्ही मला काही सांगण्याची गरज नाही.

सीतेने केलेले भाषण केवढे कठोर आहे! हे राम, पुरुषरूप धारण करणारा आणि वस्तुतः स्त्री असलेला जामात मिळविल्याने माझ्या मिथिलाधिपती पिता जनकराजाला काय बरे वाटेल? रामाचे ठिकाणी जे उत्कृष्ट तेज आहे ते या प्रकाशित होणाऱ्या सूर्यामध्ये नाही असे जर फिरून हे लोक कधी अज्ञानाने म्हणू लागले तर ते असत्य आहे असे मी समजेल. काय म्हणून आपण खिन्न झाला आहात व आपणाला भय तरी कोठून प्राप्त झाले आहे की ज्यामुळे फक्त आपणावरच अवलंबून असलेल्या माझा त्याग करण्यास आपण उद्युक्त झाला आहात? अर्थात श्रीरामाला असे बोलणे त्याच्यावर असलेल्या प्रेमामुळे आणि अभिमानामुळेच आलेले आहे. पण सीतामाईचे संभाषणचातुर्य बघून निश्चितच यज्ञज्वाला द्रौपदीची आठवण येते. फक्त स्त्रीच्या आयुष्याबद्दलचे नाही तर मानवी आयुष्यातील अत्यंत करुण प्रसंग महाकवी वाल्मीकिंनी रामसीतेच्या व्यक्तिरेखेतून उभे केले आहेत. अनेक वर्षांच्या वनवासानंतर आणि घनघोर महायुद्धानंतर सीता आता परिस्थितीचा प्रतिकार करीत नाही. अग्निदिव्य करताना तिने कोणाचीही याचना केली नाही.

गयावया केली नाही. पण स्वतःचे प्रखर निष्कलंक चारित्र्य तिने जणू हातावर तोलून धरले आहे. स्वतःच्या संपूर्ण सत्त्वाचे तेज:पुंज दर्शन तिने जगाला घडविले आहे. श्रीरामाला तिचे निष्कलंक चारित्र्य दाखवून देण्याची गरज सीतामाईला खरोखरीच नव्हती. पण समाजासाठी मात्र ती एक निकड होती. अग्निदेवाला उद्देशून ती म्हणते, जर माझे चारित्र्य संपूर्णपणे निष्कलंक असेल, मनाने, वाचेने, कर्माने मी कधीही रामांच्या इच्छेविरुद्ध गेली नसेन; सूर्य चंद्र, वायू, पृथ्वी, दिवस, रात्र आणि दाही दिशांना जर माझे शुद्ध चारित्र्य माहीत असेल; तर हे अग्नी देवा, माझं रक्षण करा!

सीतामाईच्या प्रखर आव्हानासमोर अग्नीही नमला. श्रीरामाची रावणासोबतची लढाई बाह्य लढाई होती. पण सीतेचे अग्निदिव्य पार करण्याची त्याची लढाई आंतरिक होती. इक्ष्वाकू कुळावर कोणी बोट ठेवू नये यासाठी केलेला तो अग्निहोम होता. श्रीरामाच्या गाभाऱ्यात स्त्रीशक्तीच्या रूपात कौसल्या, सुमित्रा, कैकेयी, सीतामाई नंदादीपाप्रमाणे तेवत आहेत. हजारो वर्षे झाली. युगामागून युगे गेली. पण श्रीराम भक्तीची, श्रीराम प्रीतीची ही तेजोमय ज्योत गाभाऱ्यात अखंडपणे तेवत आहे.

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# पर्यावरणाची ऋतुगंधित जडणघडण

**पर्यावरण म्हणजे सर्व जैविक अजैविक घटक समाविष्ट करून आपल्या सभोवती उभा असलेला भोवताल असा विचार केला की मग मातीच्या पहिल्या पावसाच्या वासात आपल्याला पर्यावरण सापडतं. कोवळ्या उन्हाच्या लखलखीत सड्यावरून फिरताना जेव्हा एक रानजाई हळूच आपल्या मनगटाला स्पर्श करते, तेव्हा आपण ऋतूंमध्ये वावरणारं आपलं बिंब पाहतो. आणि मग हे पर्यावरण म्हणजे केवळ हवा, पाणी, माती नव्हे- तर हे ऋतूंच्या उगमातून प्रकटलेलं सांस्कृतिक, आध्यात्मिक, अगदी अंगावर चढणारं जीवनसत्त्व आहे असे आपल्याला वाटू लागते. गावकुसात, डोंगरमाथ्यावर, नागमोडी रानवाटांमध्ये ते अधिक बोलकं, जिवंत असतं. शहरात ते खिडकीच्या गजाआडून बाहेर डोकावत असतं. त्याचं नाव म्हणजे पर्यावरण होय.**



ऋतू आणि पर्यावरण हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे मला वाटते. म्हणजे पहा रानवेलीचा पहिला गंध घेऊन येणारा चैतन्यमय वसंत म्हणजे 'ऋतूनां कुसुमाकर' तो येतो कळ्यांना फुलवायला. झाडांच्या शेंड्यावर नवपालवीच्या हसऱ्या छटा डोलवण्यासाठी, वाऱ्यात बहरलेली कोवळी गंधरेषा, आणि पक्ष्यांच्या चिवचिवाटात वसंतचं 'क्वचित मधुमास' म्हणून गाणं सुरू होतं. नगावखेड्यात, या ऋतूत वडाच्या फांद्यांवर बसलेले पोपट, पिसाळलेल्या काटेरी बाभळीवर उमलणारी सोनकीची पिवळी फुलं, ओढ्यावर बसलेली दुभती गुरं आणि त्या गुरांच्या भोवती दुधाळ ओठांवर जीभ फिरवून फेसाळत्या अमृताची गोडी सजीव असल्याची खात्री देणारी कधी निवांत बसलेली तर कधी शेपटी तुमचा उंचावून वाऱ्याशी स्पर्धा करणारी वासर हे सगळं वसंतात बहरून आलेलं ऋतूभरलं गाणं म्हणतं असतं.

खेडेगावातील चैतन्यमय पर्यावरणाचा शोध शहरात घ्यायचा म्हटलं तर वसंताचा शोध बाल्कनीतल्या गुलाबाच्या कुंडीत, किंवा एखाद्या ऑफिसच्या काचेतून दिसणाऱ्या टॅबेबुईच्या गुलाबी फुलांत घ्यावा लागतो. दर्या खोऱ्यात डोंगर उतारावर जेव्हा वसंताचा तांबडा लाल टेंभा पेटलेला असतो तेव्हा आजच्या काळातील शहरातील वसंत कुलर किंवा एसीच्या हवेमध्ये बंदिस्त होऊन चार भिंतीत नाचत असतो.

**पर्यावरणाच एक उन्हात घामटलेलं ऋतू:-** नाट्य म्हणजे ग्रीष्मातला तप्त अनुभव. पण या उन्हातूनच पेरणीसाठी जमीन तयार होते, आणि आपल्या अंगणात कैऱ्यांचे ढीग पडतात. पर्यावरण आपला समतोल कसा साधायचा ते स्वतःच ठरवून असतो, म्हणजे ग्रीष्मातल्या उन्हावर उतारा म्हणून ऋतुचक्राच्या पुढच्या पानावर लिहिलेला असतो तो पावसाळा, झाडांच्या नाडीतून येणारा निनाद ऐकल्यानंतर ढगांच्या गडगडाटात आणि विजेच्या चकाकणाऱ्या उजेडात पावसाच्या पहिल्या सरींनी नांगरलेल्या शेतात जेव्हा बियांचं हसू उमलतं, तेव्हा पर्यावरण ओलं होतं. ही ओल माणसाच्या काळजात खोलवर रुजली जाते. गावात, पावसाळा म्हणजे सृष्टीचं नवसंजीवन. कधी बैलजोडी शेतात उतरते, कधी ढगांच्या आवाजात ढोलकी हरवते, आणि संध्याकाळी बैलांना गोंजारणाऱ्या झोपाळ्यावर ओव्या ऐकू येतात. अशावेळी शहरात, हा ऋतू कधी कधी अडकलेली बस, चिखलाची वाट, आणि गरम चहा हाच पर्यावरणाचा स्वाद ठरतो.

पर्यावरणातील वेल्हाळ अशा रूपाचे अप्रूप जो ऋतू घेऊन येतो तो म्हणजे शरद : चांदण्यांची शुभ्र प्रार्थना जशी सुरू होते तसा आकाशाचा गाभारा खुलतो. चांदण्यांच्या अंगणात चंद्र पूर्णबिंब होतो, आणि गावात भातकापणीच्या तयारीचे सडे पडतात. सड्यावर दाणे टाकणाऱ्या बायका, हळुवार गप्पा, आणि नवरात्रात देवीला वाहिलेली शुद्ध ओवाळणी- हे सगळं पर्यावरण एक गोड पारंपरिक कोरस होतो. पर्यावरणाशी बांधिलकी सांगत वर्षभर एकमेकांचा सहवास प्रेमाचा राहावा म्हणून जे सोनं म्हणून दिल्या जात तोही निसर्गाचा एक घटक ते म्हणजे आपट्याचं पान. पर्यावरणाची आणखी एकजीव असल्यासारखी दोन रूपे म्हणजे हेमंत आणि शिशिर ही ऋतूंची शांत समाधी, हेमंत आणि शिशिर या जोडगळीचे नाव घेताना मला उगाचच नकुल आणि सहदेव या दोन पांडवांचे नाव आठवतात म्हणजे म्हटलं तर पांडव नाहीतर व्यासांनी जर महाभारताचे पुनर्लेखन करावे असे ठरवले तर या दोघांना आणखी कोणते गुण बहाल करावे याचा विचार एकदा तरी करावाच लागेल. तसा हेमंत म्हणजे थोडीशी थंडी आणि बहरलेल्या रानफुलांचा एक हळवा उत्सव. गावाकडे, गहू लोंबतो, भात सुकतो, आणि लहान मुले शेकोटीभोवती गोष्टी ऐकतात. आणि शिशिरात तर पिंपळ-आंबा आपली पाने सोडतो. झाडं वस्त्रहरण करत नाहीत, ती संन्यास घेतात. शहरात, ही थंडी ब्लँकेटच्या आत चहा घेऊन टीव्ही पाहण्यापुरती मर्यादित होते. पर्यावरण आणि ऋतू यांचा अनेक जमाती मधील संस्कृतीमध्ये उत्सव रंगतो. विदर्भातील कोरकू, गोंड, भिल्ल यांचं ऋतूंशी असलेलं नातं प्रगल्भ, ऋतूगर्भित आहे. पावसाळ्यात 'हरियाली उत्सव', वसंतात बोंडल्याच्या जागरणी, हिवाळ्यात 'मांडव पूजा' आणि उन्हाळ्यात 'आंब्याच्या देवतेला' केली जाणारी अर्घ्यपूजा- हे सर्व पर्यावरणाशी संवादाचे उत्सव आहेत.

महाराष्ट्रात, श्रावणात स्त्रिया रानात झोक्यावर बसून गाणी म्हणतात. तर पंजाबात, लोहडीला अग्नीभोवती फिरताना ऋतूंच्या बदलाला अभिवादन केलं जातं. केरळमध्ये, ओणम हा शरद ऋतूचा सण आहे. या सणाला पृथ्वीच्या संतुलनाचे प्रतीक समजले जाते. उत्तराखंडात, 'हिवाळी भट' ऋतूनुसार गावे बदलतात. अगदी पक्ष्यांसारखे. एकंदरीत पर्यावरण म्हणजे ऋतूंचं घड्याळ आहे. त्यात वेळेला वास असतो, स्वरूप असतं, आणि स्मृतींची नोंद असते. प्रत्येक ऋतू आपल्याला काही शिकवतो- वसंत बहर शिकवतो, ग्रीष्म सहनशीलता, पावसाळा समर्पण, शरद शुद्धता, हेमंत शांतता, आणि शिशिर विरक्ती. या ऋतूंत आपण पुन्हा पुन्हा जन्मतो, जगतो आणि उरतोही. त्यामुळे पर्यावरण वाचवायचं असेल, तर आपल्या ऋतूंना पुन्हा आपल्या जीवनात स्थान द्यायला हवं. उघड्या अंगणात, ओल्या मातीवर आणि कोवळ्या आठवणीत. कारण प्रत्येक ऋतू ही निसर्गाची एक स्वतंत्र कविता असते. आजी आजोबाच्या कथांमधून उतरलेला पाऊस म्हणजे नांगरलेल्या शेतीतील पहिला थेंब होता. बालपणीचा पाऊस पैशाला खोटं ठरवून जायचा. तेव्हा दूरदूरच्या आभाळात आलेला काळा डोंगरही गावकरी ओळखायचे, विहिरी आणि नद्या जिवंत होत्या. आंब्याच्या पानांवरून थेंब खाली टपटप पडायचे. शाळेतून सुट्टी मिळाली की तुम्ही आम्ही ओल्या शेतात चिंच फोडायला धावायचो. आजचा पाऊस मात्र शहरात चिखलाची सांडलेली रंगीतपिंजण वाटतो. कधी येतो, कधी जातो आणि मध्येच एखादा तडाखा देऊन जातो. डोंगर नाहिसे झाले, किड्यांची गती बदलली. मुंग्या सरळ रेषेत चालत नाहीत आणि मधमाश्यांनीही बस्तानं गुंडाळली आहेत. आपण म्हणतो पाऊस फसवा झाला आहे. खरे तर आपणच पावसाला फसवलं आहे त्याचं मुक्कामाचं ठिकाणच नष्ट केलं आहे.

कधीकाळी चांदण्यांच्या रात्रींमध्ये दीप लावल्यासारखा प्रकाश असायचा. फुलांची गंध संपन्नता इतकी तीव्र असे की, दाराशी बसलेले बाया बापु रात्रीच्या चांदण्यात उगवलेल्या जाई-जुईंच्या गंधातून रात्र ओढायचे. चंद्रालाही त्या वेळी काजळ भरलेलं डोळं असावं, असं वाटायचं. कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री दूध उकळताना आजी 'दूधात चंद्र उतरलाय' असं म्हणायची. त्या रात्री गावातले सर्व घर बाहेर पडायचे, अंगणात, गच्चीत, देवळाच्या पटांगणात. प्रौढांच्या चेहऱ्यावर क्षणभर तरुणाई दिसायची. पुढे त्या रात्रीच्या आकाशात गाण्यांची मैफल भरायची. कोजागिरीचा गारवा आणि चांदवा एसीमध्ये बंद झाला प्रदूषणाने तारकांचे आकार झाकोळले आहेत. आणि आपण... मोबाईलच्या स्क्रिनवर चंद्र पाहतोय, अशावेळी सहज आठवतं की काही वर्षांपूर्वी संत्र्याच्या झाडांतून मृदू गंध सुटायचा. ओल्या थंडीत आंब्याच्या झाडांची कोवळी पालवी डोकावायची. बाभळीचे काटे काळसर व्हायचे आणि हरवलेली मधमाशी आपलं घर शोधायला परत यायची. फुलपाखरं साखरझोप घेऊन सकाळी डोळे चोळत उडायची. सकाळी सकाळी तांदुळजवळ लालसर पंखांचा पतंग दिसायचा. कोवळ्या उन्हात एखादं बैलजोडी घेऊन जाणारं कुटुंब दिसायचं.

आज शेतीच्या कडेने उभ्या राहिलेल्या सिमेंटच्या भिंती कुटुंबाच्या परिसीमा ठरवत आहेत. कोरड्या झाडाखाली बसलेला मेंढपाळ बासरी वाजवत बसायचा. पक्ष्यांचे आवाज शिथिल व्हायचे, पण हवेत एक मंद सुवास दरवळायचा. आज, पानगळ नुसती गळते. त्यात नाद नाही, गंध नाही आणि झाडांच्या भोवती ना फुलपाखरं ना मधमाश्या. कधी काळी सहा ऋतू म्हणजे सहा ऋषी होते. आपल्याला दिशा देणारे, मार्गदर्शक, संगोपक. पण आज आपण त्यांना विसरलो आहोत. आपलं निसर्गाशी असलेलं नातं माणूस-मातीच्या ऐवजी माणूस-मशीन झालं आहे. आपण काहीपूर्वीच्या व त्यांच्या जीवनाशी आपल्या जीवनाची तुलना केली, तर दिसून येतं की झाडं, फुलं, पक्षी, मधमाश्या, किडे हे सर्व आपले सहचर होते. आज ते निस्तेज झाले आहेत. मानवी जीवन यंत्रवत झालं आहे. गंध हरवले आहेत, गाणी विस्मरणात गेली आहेत, आणि ऋतूंच्या गोष्टी ऐकायला लहान मुलं उरलेली नाहीत.

पान १ वरून

## मस्करीची कुस्करी होऊ देऊ नका!



दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्यापूर्वी भारतासोबतचे संबंध किती महत्त्वाचे आहेत, हे अधोरेखित केले होते. प्रचारात बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणार्या अत्याचारांबद्दलही सहवेदना व्यक्त केली होती. अध्यक्ष झाल्यावर ट्रम्प भेटलेल्या पहिल्या पाच जागतिक नेत्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचाही समावेश होता. एवढ्या सगळ्या जमेच्या बाजू असताना असे काय झाले, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. डोनाल्ड ट्रम्प यांना आणि त्यांच्या समर्थकांना वाटते की, अमेरिकेने त्यांच्या राष्ट्रीय हिताशी प्रतारणा करून मित्रदेशांना अनेक प्रकारच्या सवलती पुरवल्या आहेत. यामध्ये त्यांना सुरक्षा पुरवणे, त्यांच्यासोबतच्या व्यापारात तूट सहन करणे आणि त्यांना अमेरिकेच्या स्पर्धक राष्ट्रांशी व्यापाराला मुभा देणे अशा गोष्टींचा समावेश आहे. गेल्या काही दशकांमध्ये अमेरिकेतील औद्योगिक क्षेत्राला अवकळा आल्यामुळे अमेरिकेतील अनेक लोकांचा रोजगार गेला. त्यामुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला फायदा झाला असला, तरी ज्या श्रमिक लोकांना फटका बसला, ते डेमोक्रॅटिक पक्षाचे मतदार होते. त्यांनी मोठ्या संख्येने ट्रम्प यांना मतदान केल्यामुळे ट्रम्प त्यांच्या हिताविरुद्ध जाऊ शकत नाहीत. परंतु, ट्रम्प आणि त्यांच्या सहकार्यांना हे कळत नाही की, केवळ आयातकर वाढवल्याने हे उद्योग अमेरिकेत येणार नाहीत. त्यासाठी पुरवठा साखळ्या उभाराव्या लागतील. तसेच, मोठ्या संख्येने तरुणांना आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील कौशल्य शिकवावी लागतील. दुसरी गोष्ट म्हणजे, ट्रम्प यांचा अहंकार अनेकदा त्यांच्या धोरणाच्या आड येतो. एकीकडे ते आणि त्यांचे समर्थक अमेरिकेला जागतिक पटलावरून बाजूला सारून अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणाकडे लक्ष द्यायची भाषा करतात. दुसरीकडे ट्रम्प यांना असेही वाटते की, इतर देशांतील युद्धात मध्यस्थी केल्यास आपल्याला 'नोबेल' शांतता पारितोषिक मिळेल. भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामाचे श्रेय घेण्याच्या नादात त्यांनी वस्तुस्थितीशी प्रतारणा तर केलीच. पण, मोदी सरकार आणि समर्थकांनाही दुखावले. २०२४ सालच्या अध्यक्षीय निवडणुकीत भारतीयांनी मोठ्या संख्येने ट्रम्प यांना पाठिंबा दिला. पण, गेल्या तीन महिन्यांत त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली आहे. त्यांना वाटले की, भारत जपान, द. कोरिया, व्हिएतनाम आणि युरोपीय महासंघाप्रमाणे आपल्यासमोर गुडघे टेकेल. पण, त्यांचा हा अंदाज चुकला. तिसरे म्हणजे, ट्रम्प आणि त्यांच्या कुटुंबीयांचे व्यापारी हितसंबंध अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताच्या आड येत आहेत. बांगलादेश आणि पाकिस्तानसारखे देश ट्रम्प कुटुंबीय आणि मित्र परिवाराशी व्यापारी सौदेबाजी करून अमेरिकेच्या प्रशासनाला धोरणात बदल करायला भाग पाडत आहे. भारत आपले स्वतःचे राष्ट्रीय हित, सोव्हिएत रशिया आणि नंतर रशियाशी असलेले संबंध आणि विकसनशील देशांचे नेतृत्व करण्याबाबत असलेली आपली कटिबद्धता यांच्याशी प्रतारणा करू शकत नाही. ट्रम्प यांच्या या गोष्टी जेवढ्या लवकर लक्षात येतील, तेवढे भारत आणि अमेरिका संबंधांचे नुकसान कमी होणार आहे. या गोष्टी अमेरिकेचे परराष्ट्र खाते ट्रम्प यांना अवगत करेल, अशी अपेक्षा.

पान १ वरून

## भारत दक्षिण दिग्विजयाकडे!

दलाई लामांचे भारताशी असलेले नाते पाहता, फिलीपिन्सच्या नागरिकांमध्येही एक वेगळी भावना आहे. या कारणास्तव सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व्यापार, अर्थकारण आणि महत्त्वाचे म्हणजे संरक्षण, अशा सर्वच क्षेत्रांतील आघाड्यांवर भारत फिलीपिन्सच्या सोबत आहे. द. चिनी समुद्र हा जगातील सर्वाधिक समुद्री व्यापारी वाहतुकीचा मार्ग. फिलीपिन्स आणि अन्य देश यांनी उघडलेली चीनविरोधातील आघाडी भारताच्या पथ्थ्यावर पडणारी आहे. भारत त्यांना आपलासा वाटू लागतो. चीनच्या विस्तारवादी मनसुब्यांना चाप लावण्यासाठी उभय देशांसाठी ही रणनीती गरजेचीच. डोकलाम आणि गलवान खोऱ्यातून भारताला चीन वारंवार आव्हान देण्याच्या प्रयत्नात आहे. अशावेळी फिलीपिन्स सोबत असल्यास ड्रॅगनच्या शेपटावर पाय देणे सहज शय आहे. एक मोठा भाऊ म्हणून द. आशियातील या राष्ट्रांचे प्रतिनिधित्व भारत करू इच्छित आहे. यापूर्वी कितीही कडवट भूमिका घेतली, तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मालदीव दौरा करत हे दाखवून दिलेच आहे.

पान १ वरून

## उथळ राहुल गांधींना सर्वोच्च...

२० भारतीय सैनिकांना मारहाण करून त्यांना ठार केले जाते, ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचा मुद्दा खरा भारतीयच मांडू शकतो, असे सांगण्याचा प्रयत्न अभिषेक मनू सिंघवी यांनी केला. त्यावर न्या. दत्ता म्हणाले की, जेव्हा सीमेवर संघर्ष होतो, त्यावेळी दोन्ही बाजूचे सैनिक ठार होत नाहीत का? असे संवेदनशील मुद्दे मांडायला समाजमाध्यमांसारख्या मंचाच्या ऐवजी संसदेसारखे व्यासपीठ आहे. राहुल गांधी यांचे वकील अभिषेक सिंघवी यांनी राहुल गांधी यांच्याविरुद्धचा अब्रुनुकसानीचा खटला निकालात काढावा, अशी विनंती न्यायालयास केली. राहुल गांधी यांना त्रास देण्यासाठी आणि विरोधी पक्षनेता म्हणून राहुल गांधी यांना आपले कर्तव्य बजाविता येऊ नये, म्हणून हा खटला गुदरण्यात आला, असे सिंघवी यांच्याकडून सांगण्यात आले. या तक्रारीची दखल घेण्याआधी आपले म्हणणे मांडण्याची संधी राहुल गांधी यांना देण्यात आली नाही, असा युक्तिवाद सिंघवी यांनी केला. हा मुद्दा लक्षात घेऊन राहुल गांधी यांनी जी विशेष याचिका केली, त्यासंदर्भात संबंधितांना नोटीस पाठविण्याची तयारी न्यायालयाने दर्शविली. तसेच, या खटल्याचे जे कामकाज कनिष्ठ न्यायालयात सुरू होते, त्यास तीन आठवड्यांची स्थगिती दिली. 'सीमा रस्ते संघटने'चे निवृत्त संचालक उदयशंकर श्रीवास्तव यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्याविरुद्ध तक्रार केली होती. मे २०२५ साली अलाहाबाद उच्च न्यायालयाने सदर तक्रार रद्द करण्यात यावी, ही राहुल गांधी यांची विनंती फेटाळून लावली होती.

कथा

डॉ. चंद्रगुप्त वर्णेकर

## मी तुळस तुझ्या अंगणी

डॉ. मिलिंद गंधेंनी शेवटचा पेशंट तपासला तेव्हा समोरच्या भिंतीवरील घड्याळात दीड वाजत होता. ''साध्याशा खरुजेच्या उपचारासाठी काहून इतकं दूर अमरावतीस आले हो बोवाजी?'', असं त्या वयस्कर खेडूत रुग्णाला विचारीत, उत्तराची अपेक्षा न ठेवता, मिलिंदने टेबलच्या ड्रॉवरमधून मलम आणि पोटात घेण्याच्या गोळ्या काढून त्याच्या हातात ठेवल्या. या सरकारी इस्पितळाच्या विभागातून त्याला ही औषधं मिळू शकणार नाहीत व मग पदरचा पैसा खर्चून ती खरेदी केल्यावर बिचारा खेड्यापर्यंत पायपीट करीत जाईल, हे डॉ. गंधेंना आता अनुभवानं कळून चुकलं होतं!

पेशंटला मोठ्या शहरात स्किनस्पेशालिस्टकडे धाडण्यापूर्वी गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टरांनी कसलाही विचार केलेला दिसत नव्हता. तो बोवाजी निघून गेल्यावर मिलिंदने आपली ब्रीफकेस उघडली. दोन महिने खपून तयार केलेल्या त्याच्या रिसर्च-पेपर्सच्या टायपिस्टने आणून ठेवलेल्या ताज्या सुधारित प्रती ब्रीफकेसमध्ये काळजीपूर्वक ठेवताना त्यावर पुन्हा एकदा धावती नजर फिरविली. पेनिसिलीन्सारख्या केमिकलच्या सल्फेटपासून विशिष्ट त्वचारोगांवर औषध तयार करण्याची प्रक्रिया सांगणाऱ्या या शोधनिबंधाचा परिषदेत नक्की गौरव होईल अशी आशा त्याला चाटून गेली! दोन अमेरिकन प्राध्यापकांच्या संशोधनाची ही पुढची पायरी ठरणार होती. या त्वचारोगांचे प्रमाण पाश्चात्त्य देशात जास्त असल्याने इथं भारतात मोजक्याच केसेसवर प्रयोगाची संधी डॉ. मिलिंदला मिळालेली होती. तरी देखील आपलं हे संशोधन बार्सिलोना मध्ये होणाऱ्या डब्ल्यूएचओच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मान्य होईल, असं त्याला वाटत होतं. मग परिषदेसाठी लागणारी इतर कागदपत्रे सुद्धा त्याने काळजीपूर्वक तपासली.



वीस दिवसाची ड्यूटी-लिव्ह, पासपोर्ट, व्हिसा, सहकारी वर्गाकडून टोचून घेतलेल्या रोगप्रतिकारक लसींची प्रमाणपत्रे, भारत सरकार व युनोच्या डब्ल्यूएचओ कार्यालयांतर्फे आलेली पत्रे, मुंबईहून निघतानाच्या विमानाच्या तिकिटाची ९ एप्रिल १९९२ ही तारीख, वगैरे सर्व ठीक असल्याची खात्री पटल्यावर डॉ. गंधेंनी कॉलबेल वाजवून नर्सला बोलावलं. '' सिस्टर! मी तीन आठवडे इथं नसणार, डॉक्टर पवार येत राहतीलच, काही कागदपत्रे आलीत तर ती या वरच्या ड्रॉवरमध्ये ठेवायची...'' वगैरे आदेश देत, बाहेर पडून स्कूटरकडे जाताना मिलिंदला घराची आठवण झाली! मंगेश तान्हा असल्याने मालतीनं या कॉन्फरन्सच्या निमित्तानं युरोप टूरवर आपल्या सोबतीने चलण्याचा मोह निग्रहानं टाळला होता! मग मेडिकल कॉलेजच्या आवाराकडे लक्ष जाताच मिलिंदला मालतीची पहिली भेट आठवली!

फायनल् एमबीबीएस्ला असताना, गॅदरिंगच्या वेळी झालेल्या आंतर- महाविद्यालयीन भावगीत स्पर्धेत, आयुर्वेद महाविद्यालयाची स्पर्धक म्हणून प्रथम-वर्षात शिकणारी मालती वैद्य तेथे आली होती. त्यावेळी सभागृह दाखविण्याच्या निमित्ताने या आवारात तिची सोबत करणारा मिलिंद पुढे तिचा जीवनसाथी बनला. '' पॅंऽऽपॅंऽपॅंऽऽऽ यार! लगता है डॉक्टर गंधे! तुम तो अभीऽसे बार्सिलोना कॉन्फरन्स में पहुँच चुकें हो!'' पाठीमागून आपली मोटारसायकल पुढे दामटीत डॉक्टर पवार उद्‌गारले, ''अरे भै! आगेही नहीं पीछे भी देखा करो! केव्हाचा हॉर्न वाजवीत आवाज देतोय, पण तू तंद्रीत!!'' ''यार पवार! खूप भूक लागली यै, म्हणतात नां, पोटात कावळे कोकलत असले तर कसलाच आवाज ऐकू येत नसतो!'' तंद्रीचं खरं कारण शिताफीनं लपवीत मिलिंदने त्याला, ''आपण घरी जेवतानाच गप्पा करू या, चालेल?'' अशी ऑफर दिली!

'' यार! चालेल काय विचारतोस, अगदी धावेल! सध्या मी पॅटर्निटी लीव वर आहे, विसरलास वाटतं! त्या कँटिनचं खाऊन कंटाळलो बुवा आपण.'' घरी छोट्या मंगेशला पाळण्यात निजवून मालती वाटच बघत होती. सोबतीने डॉ. पवारांना येताना बघून तिनं आईला टेबलवर आणखी एक पान मांडण्यास सांगितले. जेवताना अर्थातच युरोप प्रवास, कॉन्फरन्स हे विषय तोंडी लावायला होतेच. मात्र तिकडे दुर्लक्ष करीत आई तिघांना वाढत होत्या. नेहमी मित्रमंडळातील गप्पांत या आयुर्वेद-ॲलोपेथी जोडप्यातील टिपिकल् प्रेम कलहाच्या पेटंट विषयाला डॉ. पवारांनी हात घातलाच, ''- - ऽऽऽ हंऽ तेच तर म्हणतो मी वहिनी, अहोऽ! असल्या स्कीन डिसीज्‌साठी मिलिंदने सुचवलेल्या या महागड्या नव्या औषधापेक्षा कितीतरी चांगली अन् स्वस्त औषध तुमच्या आयुर्वेदात सांगितलेली आहेत नंऽ -ऽ'', डोळे मिचकावून कढीचा फुरका घेत पवारांनी चाबी फिरवली!

''हो नं!'' मालतीची पीढीजात वैद्यकी बोलू लागली, ''अहो डॉक्टर पवार! आपल्या साध्या तुळशीच्या रसायनांनी कित्येक प्रकारचे त्वचारोग दुरुस्त केले आहेत माझ्या वडिलांनी.''
'' ॲऽ हॅं हॅंऽ! आता तुझी नेहमीची, 'आणा माझ्या माहेरचा वैद्य' वाली रेकॉर्ड सुरू केली वाटतं, अग! रिसर्च नावाची काही चीज आहे की नाही? की येऊन जाऊन आपलं त्या आजीबाईच्या बटव्याला कवटाळायचं?''

''अहो! कसला रिसर्च घेऊन बसलायेत? प्राण्यांचे रोग अन् त्यावरची औषधं ही काय आज नवीन घडणारी गोष्ट आहे? मग त्यात पूर्वजांच्या अनुभवाचा फायदा घेण्यात काय बिघडलं? किती सुंदर छंदोबद्ध गेय संस्कृत-सूत्रातून गुंफलेले आहेत ते अनुभवाचे बोल''असं म्हणत त्वचारोगांवर तुळशीचे उपचाराविषयी काही संस्कृत-रचना मालतीनं म्हणून सुद्धा दाखवल्या!

प्रदीर्घ विमान-प्रवासापाठोपाठ जवळपास दीड तासाच्या कार-रपेटी नंतर डॉ. मिलिंद गंधे युनोच्या कॉन्फरन्सच्या अतिथिगृहात तयार होऊन, आता स्वागत कक्षात इतर प्रतिनिधींसोबत पंजीयनची औपचारिकता पूर्ण करीत होते. विमान प्रवासात जरी त्यांच्या डोक्यात शोधप्रबंधाचा विचार घोळत होता, तरी कारच्या रपेटीत मात्र त्यांनी सभोवर दिसणाऱ्या त्या युरोपियन देशाचं आधाश्यासारखं धावतं दर्शन घेतलं होतं!


देशोदेशींचे सुमारे अडीचशे प्रतिनिधी या परिषदेला आलेले होते. आता अकरा वाजताच्या उद्‌घाटन समारोहापाठोपाठच्या लंच पूर्वीच्या सेशनमध्येच मिलिंदचे सादरीकरण होतं. तो रिसर्च पेपर वाचत असताना, एका विकसनशील देशातील होतकरू तरुण संशोधक म्हणून, तेथे उपस्थित जगातील डॉक्टर मिलिंदकडे कौतुकाने बघत होते. त्याचे वाचनही छान झाले, प्रश्नोत्तरे निर्भयपणे पार पडली, फक्त असल्याच प्रकारचे संशोधन अमेरिकेत पूर्ण झाले असून, औषधाचा प्रायोगिक वापरही सुरू असल्याची टीका ऐकू आली. प्रक्रियेच्या खर्चाबाबतही उलटसुलट चर्चा चालली.

(पान ६ वर)

प्रबंधांची बीजे

श्रीरंग हिर्लेकर

# या नरदेहाचेनि आधारे, नाना साधनाचेनि द्वार



श्रीमद्भगवदगीतेचा दुसरा अध्याय म्हणजे सांख्ययोग. हतबुद्ध आणि संभ्रमित अशा महारथी अर्जुनाला उपदेश करताना, आजच्या भाषेत बोलायचे झाल्यास अर्जुनाचे कौन्सिलिंग करताना, भगवंताने जे उदगार काढलेले आहेत ते युगानुगाचे अक्षर सत्य आहे. या अध्यायाच्या ३३ व ३४ व्या श्लोकात भगवंत म्हणतात-

'**अथ चेत्वमिमं धर्म्य संग्रामं न करिष्यसि। ततः स्वधर्म कीर्तींच हित्वा पापम वाप्स्यसि।।३३-२।। अकीर्ती चापि भूतानि कथयिष्यन्ति तेडव्ययाम। संभावितस्य चा कीर्तिर्मरणादारिच्यते।।३४-२।।**' उपरोक्त दोन्ही श्लोकांवर माउलीने दहा ओव्या सांगितल्या आहेत. त्यातील महत्त्वाच्या अशा-

'**म्हणोनि स्वधर्म हा सांडसील। तरी पापा वरपडा होसील। आणि अपेश तें न वचेल। कल्पांतवरी।। जाणतेनि तंवचि जियावें। जंव अपकीर्ति आंगा न पवे। आणि सांग पां केवी निगावें। एथोनियां।। ऐसेनिही प्राणसंकटे। जरी विपायें पां निघणें घटे। तरी तें जियालेंही वोखटे। मरणाहूनि।।**' 'हे अर्जुना, तू जर हे न्याय्य युद्ध करणार नाहीस तर, तू स्वधर्म आणि कीर्ती यांना मुकशील. तुझ्या पदरात पाप पडेल.

जगाच्या अंतापर्यंत सगळे जण तुझी अपकीर्ती करतील आणि एक गोष्ट लक्षात ठेव, समाजात मान असलेल्या व्यक्तीला अपकीर्ती ही मरणाहूनही दुःखदायक असते.' या वचनात भगवंताने अर्जुनास स्वधर्माचे आचरण करण्यास उद्युक्त केले आहे. संपूर्ण गीतेचा हाच स्थायीभाव आहे. आपण आपल्या धर्माला अनुसरून वागणे, हेच सर्वात इष्ट कर्म असते. धर्म याचा येथे अर्थ म्हणजे आपल्या वाट्याला आलेल्या कर्माचे स्वरूप! एखादी व्यक्ती शिक्षक असेल, तर विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणाने विद्यादान करणे हा तिचा धर्म झाला. आपल्या रुग्णालयात आलेल्या प्रत्येक रुग्णावर योग्य उपचार करून त्याचे आरोग्य उत्तम स्थितीत आणणे हा डॉक्टरचा धर्म झाला. निवडणुकीत निवडून आल्यावर लोकांचा प्रतिनिधी म्हणून, त्यांच्या अडीअडचणींचा परिहार करणे हा विधिमंडळातील सदस्यांचा धर्म झाला. (आता आजकाल आपापसात हाणामारी आणि शिवीगाळ करून राजकारण नासवणे एवढाच एक उद्योग ही मंडळी करतात ते अलाहिदा!) परंतु आजघडीला गंमत अशी आहे की, प्रत्येक जण स्वतःचा धर्म सोडून इतरांच्या धर्मात लुडबुड करतो आणि त्यामुळे कोणतेही काम धड होत नाही. आपला धर्म आपण योग्यरीतीने पाळला तरच त्याला आपण न्याय देऊ शकतो. त्यातच या नरजन्माचे सार्थक आहे, असाच संतांचा उपदेश आहे.

धर्म हा शब्द विश्वात्मक नियमितता निर्देशित करणारा आहे. भौतिक आणि पारमार्थिक दोन्ही जीवनातील धर्म हा काही विशिष्ट अर्थाने बांधलेला असतो. वरील वचनात भगवंताने युद्धाला 'न्याय्य' म्हटलेले आहे. सर्वांना त्या त्या परिस्थितीत त्या त्या वेळी न्याय मिळणे हे अत्यंत गरजेचे असते. ज्याच्यावर अन्याय झाला असतो तो, या न्यायाची तळमळीने वाट बघत असतो. समर्थ म्हणतात... 'न्याय तो देव जाणावा। अन्याय राक्षसी क्रिया। असत्य म्हणजे तेचि पाप। सत्य म्हणजे स्वरूप।।' न्यायाला एकदा देव मानले की, त्याचे मनुष्य जीवनातले अनन्यसाधारण महत्त्व आपोआपच अधोरेखित होते, सिद्ध होते. नैतिक स्वरूपातले परमोच्च अस्तित्व म्हणजेच न्याय आणि सत्य. हाच न्याय आणि हेच सत्य म्हणजे परमेश्वराचे अंतिम स्वरूप आहे. कविवर्य म. म. देशपांडे यांच्या ओळी इथे सहजच आठवतात.

'**सारा अंधारच प्यावा। अशी लागावी तहान एका साध्या सत्यासाठी। देता यावे पंचप्राण।।**' आधुनिक कवींच्या कवितांमधूनही संत साहित्यातील शाश्वत सत्ये कशा पद्धतीने उमटतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे. पारमार्थिक आयुष्यात सर्वात शेवटचे लक्ष्य म्हणजे मुक्ती असते. म्हणूनच समर्थ रामदास या उच्च ध्येयाशी न्यायाची संकल्पनाही जोडतात. '**आपण स्वये तरले। जनासही उपेगा आले। कीर्तिश्रवणें जाहले। अभक्त भावार्थी ।। श्वानसुकरादि नीच जाती। भोगणे घडे विपत्ती। तेथे काही उत्तम गती। पाविजेत नाही ।। बहुत जन्माचे शेवटी। जेणे चुके आटाआटी। तो हा नरदेह भेटी। करी भगवंती ।।**' मनुष्यप्राण्याशिवाय इतर प्राण्यांना मुक्ती ही संकल्पना लागू नसते. आहार, निद्रा, भय आणि मैथुन या चौकटीतच त्यांचे जीवन जाते. परंतु परमेश्वराने मनुष्यप्राण्याला जन्मतःच विचारशीलता आणि बुद्धी यांचे दान दिल्यामुळे 'चिंतन करणे' हा गुणविशेष त्याच्यात येतो. या चिंतनातूनच अनेक गोष्टी स्फुरतात. अनेक जन्मांनंतर प्राप्त झालेल्या नरदेहाचे सार्थक करावयाचे असेल, तर या नरजन्मात प्राप्त झालेल्या चिंतनशीलतेचा उपयोग करून सत्य आणि न्याय याच वाटेने जाण्याची प्रत्येकाची तयारी असली पाहिजे. टी. एच. ग्रीन या पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्याच्या नीतिविषयक ग्रंथामध्ये त्याने स्पष्टपणे सांगितले आहे की, 'प्रत्येक सद्गुण हा व्यक्तीच्या प्रगतीसाठी असतो. ती प्रगतीची कल्पना माणसाच्या उच्चतम ध्येयाशी संबंधित असते. त्याचबरोबर प्रत्येक गुण हा सामाजिकही असतो. व्यक्तीच्या गुणामुळे जोपर्यंत समाजाचे भले होत नाही तोपर्यंत, त्या गुणाला काडीचाही अर्थ नसतो.'

समर्थ रामदासांचा काळ काय किंवा संत ज्ञानेश्वरांचा काळ काय, अत्यंत अवघड परिस्थितीचा होता. अत्याचार आणि अन्याय सहन करीत सामान्य माणसे जीवन जगत होती. या देशाच्या मातीत निर्माण झालेल्या हिंदू धर्मातील रूढी, परंपरा, नियम, श्रद्धास्थाने या कोणत्याही गोष्टींची पत्रास त्याकाळी असलेले राज्यकर्ते बाळगीत नव्हते. इतकेच नाही, तर व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही अशा आधुनिक संकल्पनांचा स्पर्शसुद्धा समाज मनाला झाला नव्हता. अशा काळात या संतांच्या मांदियाळीने त्यांच्यात्यांच्या काळात सामान्यजनांना आधार दिला. त्यांच्या मनात देवभक्तीची आणि देशभक्तीची बीजे रोवली. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले, तर संत ज्ञानेश्वर- संत नामदेव- संत एकनाथ-संत तुकोबाराय- समर्थ रामदास या संत पंचकाने तसेच त्यांच्या प्रभावळीतील मांदियाळी आणि अनुयायांनी महाराष्ट्राच्या मातीचे सांस्कृतिक भरणपोषण केले, त्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. संत ज्ञानेश्वर म्हणजे शांतिब्रह्म योगिराज! त्यांच्याच काळात वारकरी पंथ आणि नाथपंथ एकत्र आले. धर्म आणि त्यातील तत्त्वज्ञान ज्ञानदेवांनी लोकभाषेत सांगून लोकाभिमुख केले. त्या काळात ही बाब अपवादात्मक आणि अभूतपूर्व अशीच होती. ज्ञानदेवांनी मराठी भाषेचा आग्रह धरला. लोकांशी जवळीक साधली. त्यांच्याशी सहज संवाद साधला. समाजातील सर्व माणसे आपली मानली. अधिकाराच्या संबंधात त्यांनी स्त्री-पुरुष असा भेद केला नाही. हे संत मुक्ताबाईचे आर्जव त्यांनी खरे करून दाखविले. संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकोबाराय यांनीही कालानुरूप क्रांतिकारक पाऊले टाकली. समाजाला सत्य कळायला हवे आणि त्याला न्याय मिळायला हवा ही एकच असोशी या माहात्म्यांच्या मनात होती. समर्थ रामदासांनी ऐहिकाचा मान राखत लोकांच्या मनात परमरथचे महत्त्व अधोरेखित केले. हा नरदेह जो आपणास प्राप्त झाला आहे तो, पूर्वजन्मीचे पाप नाही तर जन्मोजन्मीचे पुण्य आहे, असे त्यांनी सांगितले. ग्रंथराज दासबोधात समर्थांनी दहाव्या समासात नरदेहाचे स्तवन आणि निरूपण केलेले आहे. हा नरदेह प्राप्त झाल्यामुळे आपण धन्य आहोत, असे ते गर्जून सांगतात.

'**या नरदेहाचेनि आधारे।
नाना साधनाचेनि द्वारे।
मुख्य सारासार विचारे। बहुत सुटले ।।
म्हणोनि नरदेह श्रेष्ठ। नाना देहामध्ये वरिष्ठ ।
जयाचेनि चुके अरिष्ट। येमयातनेचे।।
नरदेह हा स्वाधेन। सहसा नव्हे पराधेन।
हा परोपकारी झिजवून। कीर्तिरूपे उरावा।।**'

प्राप्त झालेल्या नरदेहाचे कल्याण करायचे असेल, तर या नरदेहाचा आधार घेऊनच समाजाचे भले केले पाहिजे. समाजातील अराजक नष्ट करायचे असेल, संस्कृतीवरील आक्रमण परतवायचे असेल, तर चारही आश्रमांमध्ये सर्वश्रेष्ठ असलेला गृहस्थाश्रम मजबूत आणि संपन्न केला पाहिजे, असे सुभाषितकारही आणि आवर्जून सांगतात. 'आतिथ्यम शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे। साधोःसंगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः।।' गृहस्थाश्रम हा युगधर्म आहे असे सांगताना समर्थ म्हणतात- '**नाना वेष नाना आश्रम। सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम। जेथे पावती विश्राम। त्रैलोक्यवासी।। या करणे गृहस्थाश्रम। सकळांमध्ये उत्तमोत्तम। परंतु पाहिजे स्वधर्म। आणि भूतदया।। प्रपंची जो सावधान। तो परमार्थ करील जाण। प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।**'

सारांश काय तर, समाजात आणि प्रपंचात वावरताना परस्परांबद्दलची आत्मीयता, भूतदया आणि स्वधर्मपालन महत्त्वाचे. नरदेहाचे कल्याण यातच आहे. हे संतांनी वेळोवेळी सांगितलेले आहे.

नोंद

विष्णुगुप्त

# मायक्रोसॉफ्टची अकड मोडित!

मायक्रोसॉफ्टने आपल्या 'नायरा' नावाच्या कंपनीचा सगळा डेटा बंद केला होता, पण आपण एका आठवड्यातच त्यांची ही अकड मोडून काढली. हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल आणि अभिमानही वाटेल. कारण मोदीजी आता कोणत्याही देशाचं आव्हान स्वीकारायला मागे हटत नाहीत. हा जुना भारत नाही. एका आठवड्यात मायक्रोसॉफ्टला त्यांची चूक मान्य करावी लागली आणि कोर्टात त्यांनी कबूल केलं की युरोपियन युनियनच्या सांगण्यावरून त्यांनी हे पाऊल उचललं होतं, पण खरंतर त्यांच्या अधिकारक्षेत्रात ते येत नव्हतं. आपल्या कंपनीनेही त्यांना कोर्टात असं खेचलं की त्यांना सपशेल माघार घ्यावी लागली. पण गोष्ट इथेच संपत नाही. आम्ही मायक्रोसॉफ्टला टक्कर देण्यासाठी एक समांतर प्रणाली तयार करून ती सुरूही केली. याचा अर्थ, त्यांनी आपल्याशी पंगा घेऊन एका झोपलेल्या वाघालाच जागं केलं आहे. आता ते त्याच्या पंजातून सुटू शकत नाहीत. तुम्हाला वाटेल की हे सगळं एका आठवड्यात कसं शक्य झालं? मित्रांनो, या कामाची तयारी गेल्या १० वर्षांपासून सुरू होती. मोदीजींना आणि आपल्या कंपन्यांना अशा संधीचा फायदा कसा घ्यायचा हे चांगलं माहीत आहे. आपल्या कंपनीने नायरा एनर्जीसोबत जे काही झालं, त्याचा बदला मायक्रोसॉफ्टकडून चांगलाच घेतला आहे. ही कोणती कंपनी आहे, कोणतं सॉफ्टवेअर आहे आणि भारतातून आपण मायक्रोसॉफ्टला कसं संपवत आहोत, हे मी तुम्हाला सांगणार आहे.

तुम्हाला माहीत आहे की नायरा एनर्जी प्रकरण खूप महत्त्वाचं आहे. त्यांनी आपल्याशी पंगा का घेतला, यामागचं कारण सांगतो. आपण दररोज ४ लाख बॅरल्स कच्चं तेल रशियाकडून स्वस्त दरात विकत घेऊन, त्यावर प्रक्रिया करून ते युरोपला विकायला सुरुवात केली होती. यामुळे दोन गोष्टी घडल्या. एक तर आपल्याला अब्जावधी डॉलर्सचा फायदा झाला आणि आपली अर्थव्यवस्था स्थिर राहिली. दुसरं, आपल्या देशात महागाई वाढली नाही. आपण रशियाकडून कमी दरात तेल घेत होतो, जे युरोप ९०-१०० मध्ये विकत घेतो, ते आपण ६० मध्ये खरेदी केलं. त्यावर प्रक्रिया करून युरोपला ९० किंवा १०० मध्ये विकलं. यामुळे आपल्या देशाला मोठा फायदा होत होता. पण युरोपला यामुळे नुकसान होत होतं. कारण रशियन तेल कंपन्यांवर आणि रशियावर त्यांना जे निर्बंध लावायचे होते, ते आपल्यामुळे निष्प्रभ ठरले. गेल्या तीन वर्षांपासून रशियाचं तेल चीन, भारत आणि अगदी युरोपही भारताच्या माध्यमातून विकत घेत आहेत. युरोपने रशियावर १८वं निर्बंध पॅकेज जाहीर केलं, पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. त्यामुळे त्यांनी आपली कंपनी नायरा एनर्जीला मध्ये आणलं. हे आहे यामागचं ऐतिहासिक कारण. पण मायक्रोसॉफ्ट या वादात का उतरलं? कारण त्यांनी कोणताही कायदेशीर नोटीस न देता नायरा एनर्जीचे सगळे ईमेल बंद केले आणि पूर्ण डेटा गोठवला. त्यामुळे कंपनीला काम करणं अशक्य झालं. तुम्ही विचार करा, जर तुम्ही एखाद्या कंपनीत काम करत असाल आणि अचानक तुमचे ईमेल बंद झाले तर काय होईल? महत्त्वाचं व्यावसायिक संवाद थांबेल आणि कंपनी बंद पडेल.भारताला याच ठिकाणी लक्ष्य करायचं होतं, कारण भारत युरोपला तेल विकून पैसे कमावत होता आणि आत्मनिर्भर होत होता. त्या लोकांना हे मान्य नव्हतं, कारण त्यांना वाटतं की त्यांनी आपल्यावर राज्य केलं आहे आणि आज आपण त्यांनाच सामान विकून पैसे कमावणार? नायरा कंपनीचं तेल पोर्तुगालच्या बंदरावर होतं. ६०,००० मेट्रिक टन जेट इंधन त्यांनी विकत घेतलं होतं, पण त्यांना ते उतरवू दिलं नाही. इतकी दादागिरी त्यांनी दाखवली. पण भारताने काय केलं? मायक्रोसॉफ्टला आपण जसा दणका दिला, ते पाहून खूप आनंद झाला. फक्त सहा दिवसांत आपण मायक्रोसॉफ्टवर थेट दिल्ली उच्च न्यायालयात (Delhi High Court) खटला दाखल केला. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, दिल्लीच्या न्यायमूर्तींनी मायक्रोसॉफ्टची बाजू न घेता आपल्या कंपनीची बाजू घेतली. मला तर आश्चर्य वाटलं होतं की दिल्ली कोर्ट मायक्रोसॉफ्टकडून पैसे घेऊन भारताच्या विरोधात निकाल देईल, पण उलट घडलं. आपण उच्च न्यायालयात जी याचिका दाखल केली होती, ती एक प्रकारची 'डिजिटल वॉर'ची घोषणाच होती. आम्ही कोर्टात सांगितलं की मायक्रोसॉफ्टने कोणतीही पूर्वसूचना न देता, एकतर्फीपणे आमच्या महत्त्वाच्या सेवा (critical services) बंद केल्या आहेत, ज्यासाठी आम्ही त्यांना पैसे दिले होते. हे मोफत वापरलं जाणारं Gmail नाही, तर आम्ही पैसे देऊन प्रीमियम सेवा घेतली होती.

मायक्रोसॉफ्टची ही धोकादायक पद्धत आहे, असं आपण कोर्टात सांगितलं. आपण असं सांगितल की ते जाणीवपूर्वक आपल्या देशाच्या ऊर्जा क्षेत्राला लक्ष्य करत आहेत आणि त्यांना या सेवा पुन्हा सुरू कराव्याच लागतील. नायराच्या वकिलांनी दिलेले युक्तिवाद खूप जबरदस्त होते. त्यांनी कोर्टात सांगितलं की युरोपियन युनियनने निर्बंध लावले असतील, पण मायक्रोसॉफ्टचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. तुम्ही अमेरिकन कंपनी आहात. युरोपियन युनियनचे निर्बंध पाळणं तुमच्यासाठी बंधनकारक नाही. तुमच्यावर अमेरिकन किंवा भारतीय कायदे लागू आहेत, युरोपियन कायदे नाहीत. याचा अर्थ, तुम्ही स्वतःहून परदेशी निर्बंधांचा स्वीकार केला आणि आमच्या कंपनीला ब्लॉक केलं. हे डिजिटल सार्वभौमत्वाचं स्पष्ट उल्लंघन आहे. कोर्टाने मायक्रोसॉफ्टला विचारलं की आमचा डेटा तुमच्याकडे आहे, पण तो आमचा आहे, तुमचा नाही. आम्ही पैसे देऊन तुमच्याकडून स्पेस घेतली आहे. त्यामुळे तुम्हाला या सेवा पुन्हा सुरू कराव्याच लागतील. दिल्ली उच्च न्यायालयानेही या गोष्टीची गंभीर दखल घेतली आणि सांगितलं की जर आज नायरासोबत असं होत आहे, तर उद्या इतर कोणत्याही भारतीय कंपनीसोबतही असं होऊ शकतं. या परदेशी कंपन्या उद्या आपल्या कंपन्यांना ओलीस ठेवू शकतात. कोर्टाने ३० जुलै रोजी, म्हणजे खटला दाखल केल्याच्या अवघ्या दोन दिवसांतच निकाल दिला. मायक्रोसॉफ्टला माघार घ्यावी लागली आणि त्यांना जाहीर करावं लागलं की ते सेवा पुन्हा सुरू करत आहेत. पण त्यांनी हेही सांगितलं की युरोपियन युनियनच्या भागधारकांशी आम्ही चर्चा करत आहोत आणि त्यांना सेवा पुन्हा सुरू केल्याची माहिती दिली आहे. यामुळे दोन गोष्टी स्पष्ट झाल्या: एक तर भारताच्या कायदेशीर दबावामुळे मायक्रोसॉफ्टला माघार घ्यावी लागली. आणि दुसरं, त्यांना आपल्या युरोपियन मालकांशी चर्चा करावी लागली की तुमच्या सांगण्यावरून आम्ही हे केलं, पण आता आम्हाला सेवा पुन्हा सुरू कराव्या लागत आहेत. भारतीय कोर्टाने अमेरिकन कंपन्यांचा माज मोडून काढला, जे युरोपियन राजकीय दबावाखाली काम करत होते.

## आता बघूया भारत करत काय आहे?

आज भारत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहे. मी आधी म्हटल्याप्रमाणे, आपण रशियाकडून स्वस्त दरात तेल विकत घेऊन ते युरोपला विकून फायदा कमावला. जे युरोपियन स्वतः रशियाकडून कमी दरात घेऊ शकत होते, ते त्यांनी आपल्याकडून जास्त दरात विकत घेतलं. मला वाटतं, त्यांनी खूप परदेशी लोकांना आपल्या देशात येऊ दिलं आहे, त्यामुळे त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. या सगळ्या घटनेनंतर भारताने काय केलं? आधी तर कोर्टात मायक्रोसॉफ्टला कोर्टात उभं करून सांगितलं की तुमचा अजेंडा जगात कुठेही चालत असेल, पण भारतात चालणार नाही. हे आम्ही चालुदेनार नाही. याचं कारण आहे. आपल्या अनेक कंपन्या मायक्रोसॉफ्ट ऑफिस, मायक्रोसॉफ्ट अझ्युर आणि त्यांच्या क्लाऊड सेवा वापरतात. आज मायक्रोसॉफ्टने हे केलं, उद्या मेझॉन किंवा दुसरी कंपनीही असं करू शकते. त्यामुळे त्यांना योग्य धडा शिकवणं आवश्यक होतं. यासोबतच, भारताने आपलं स्वतःचं एक व्यासपीठ उभं केलं, जिथे आपण आपला डेटा स्वतः सुरक्षित ठेवू शकतो. (पान ६ वर)

साधता संवाद

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)

भ्र. ९४०३०२९१७८

# मौनात एकांती । हरिभजे ।।

(भाग-५८)

ईश्वर निष्ठांची मादायाळी व्हावी आणि या भूमंडळात अशी ईश्वरनिष्ठ लोक वारंवार, सतत भेटत राहो असे विश्वात्मक देवाकडे माऊली मागणं मगतात. कारण या जगात दोन प्रकारची माणसं असतात एक- नश्वरनिष्ठ आणि दुसरे- ईश्वरनिष्ठ. नश्वररनिष्ठ लोक हे तुमच्या आमच्या सारखे सामान्य माणसं असतात की जे प्रपंच (संसार) हा नाशवंत आहे, सर्व दुःखाचं मुळ आहे, हे माहित असूनही त्याच्यावरच जीवापाड प्रेम करतो.

जीव गेला तरी हरकत नाही पण संसार सोडणार नाही, किंवा काही केल्या सुटत नाही. म्हणून दुःखापासून आपण मुक्त होऊ शकत नाही. पण ईश्वरनिष्ठ हे संत असतात. ते मात्र संसारत रहून त्याच्या बंधनात न अडकता अविनाशी अशा परब्रह्म परमात्मा असणाऱ्या ईश्वरावरती प्रेम करतात, संसारात ते फारसे रमत नहीत. म्हणून संत सदासर्वकाळ अनंदीच असतात. आणि जगाचं कल्याण करण्यासाठी देवाकडे आपल्यासाठी कशाचीही मागणी न करता सतत जगाचं कल्याण व्हावे हेच मागणं मागत असतात.

जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात की, **जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती परोपकारे।।** म्हणून संतसंगतीत संसारची आसक्ती किंवा ओढ कमी होऊन परमार्थाची गोडी लागते, आणि जन्माचं कल्याण होतं. आयुष्यात काही गोष्टींचं भान ठेऊन वागालं आणि ईश्वराप्रती समर्पित भाव ठेवला तर, परम सुख आपलं घर शोधत येतं हे मात्र खरं आहे. पण त्यासाठी काय करावे



आणि काय टाळावे किंवा काय करू नये याचा थोडा विचार आज आपण मौनात एकांती हरि भजे या अभंग रचनेत पाहु.

**न पुरवी अती । देहाचे डोहाळे ।।**
**होईल वाटोळे । जन्माचे ह्या ।।१।।**

नरजन्मात येऊन आपल्याला मोक्ष प्राप्त करता येतो हे सर्वच संत सांगतात. पण तो संतांना मिळतो मग अम्हालाच का मिळत नाही? असा विचार अनेक वेळा आमच्या मनात येतो. आणि तो यायलाच हवा. कारण कितीही कठीण असला तरी प्रश्न मनात निर्माण झाल्याशिवाय आणि तो समजल्या शिवाय त्याच्या उत्तराचा धांडोळा आम्ही घ्ययचा तरी कसा? आम्हाला मोक्ष न मिळण्याचं मुख्य कारण म्हणजे आमच्यात असलेले षड्विकार आणि मन, बुद्धी व अहंकार होय. मन तर अती चंचल आहेच आणि ते इंद्रियांना का कामाला लावतं. मनावर अतिशय तत्काळ परिणाम करणाऱ्या पंचेंद्रीया पैकी सर्वात पहिला नंबर लागतो तो डोळ्यांचा.

एखादी गोष्ट प्रथम डोळ्याला दिसते. डोळ्यांना दिसलेल्या वस्तूंपासून काय लाभ आहे किंवा काय हानी आहे यची कहीच कल्पना नसते. डोळ्याचं एकच काम आहे, ते म्हणजे दिसलेल्या गोष्टीची, वस्तूची किंवा घटनेची तत्काळ माहिती मनाला देणे. मनालाही चांगल्या-वाईटाची जाण नसते.

मन लागलीच याची महिती बुध्दीला देतं. कारण बुद्धी ही चांगल्या-वाईटाचा विचार करणारी विवेकी असते. मग ती गोष्ट करावी की करू नये याचा योग्य सल्ला मनाला देते. पण मन अतीचंचल आणि लालची असल्याने बुध्दीशी द्वंद्व करतं आणि त्याला जो योग्य वाटेल (चांगला असो की वाईट असो) तो निर्णय घेतो आणि इतर इंद्रियांना कामाला लावतं. ते झलं कर्म. आणि त्याकर्माची फळं मात्र देहासह मनाला भोगावे लागतात. बुद्धीला अनुकूल असा निर्णय मनाने घेतला तर केलेल्या कर्माची फलप्राप्ती चांगली होते आणि बुध्दीच्या प्रतिकुल निर्णय जर मनाने घेतला तर फलप्राप्ती वांगली म्हणजे वाईट होते त्यामुळे पश्चतापाची वेळ येते. या फलप्राप्तीलाच आपल्याकडे पाप-पुण्यची संज्ञा दिली आहे. म्हणून केलेल्या कर्माची माळलेली सात्विक फलप्राप्ती म्हणजे पुण्य(आनंद)आणि वाईट फलप्राप्ती म्हणजे पाप (दुःख) असे मल तरी वाटते. तर असो सांगायचे म्हणजे देह हा वासनेचा भूकेला आहे. त्याची भूक शांत होणं महाकठीण आहे. कारण इथे मन आणि देहाचं फार सख्य असतं. सद्सद्विवेक बुद्धी आपला योग्य तो निर्णय वजा सल्ला वेळोवळी मनाला देते हे जरी खरं असलं तरी प्रत्येक वेळी बुद्धीचं मी धन मानेलच असं नाही. उदा. हिंदित एक शेर आहे की, **मैंफिल में बार बार उनपर नजर गयी, हमने बचायी लाख फीर भी उधर गयी** म्हणजे इथे बुद्धीने कितीही सांगितले तरी मन मात्र अजिबात मानायला तयारच होत नाही. त्यामुळे होणारे परिणामही मनाला किंवा देहाला भोगावेच लागतात. म्हणून...

या अभंग रचनेत सुरूवातीलाच मनाला निक्षुण सांगितलं आहे की, बाबा रे तू आणि देह इंद्रीय सुखाला लालचावलेले आहात. विशेषतः मना तूच! कारण इंद्रीयांना कामाला लवणरा तुच आहेस. म्हणून हे मना तू या देहाचे अती लाड करू नकोस. त्याचे डोहाळे पुरवू नकोस. कारण तू या देहाचे डोहाळे बुद्धीच्या विरूद्ध पुरवीतच गेलास तर तू विकारात गुरफटून जाशील आणि एक दिवस तू वासनांध, विकारी होशील. आणि त्यामुळे जन्माचेच वाटोळे होईल. आणि उगाच नरकाचा वाटेकरी होशील.याचे तू भान ठेव, आणि आणखी एक कर की...

(क्रमशः)

## तुळशीहार



श्रीहरिसी प्रिय दिव्यतुळशी सर्वदा ऐसी सहजचि पुण्याई
जयाच्या दारी वृंदावन राह्ये
श्रीकृष्ण नारायण तया पाह्ये ..
विठ्ठल विठ्ठल सर्वत्र अवघा अनन्य रूप सुंदर कर कटी
सावळी मनोहर विठ्ठलमूर्ती
शंख पंकज दिव्यद्रये हाती...
श्रीपूर वैकुंठाहून आणलीसे रम्यसुगंधीत तुळशीहार शोभे
भक्तपुंडलिकाच्या करिता
श्री विठ्ठल अखंडित उभे...
तुळशी हेमरूपा ती शुद्धिका रत्नरूप मंजिरी जी सुश्रेष्ठ
भवमोक्ष मिळे सत्य सत्य
अर्पिता श्रीतुळस पावन ...
विष्णु सांगती स्व निवास आद्य भक्तांचे हृद्यकमळी
दुजे तुळशीच्या हो जवळी
मुख्यत्वे आवर्जून संतमेळी ...
तुळशी पूजती वंदिती भावे प्रीतीचा भक्त तो माझा
सांगे विष्णु प्रत्यक्ष हेचि
वैकुंठ मार्ग दुजा न साचा ...
तुलसीस प्रार्थना करती बैसती जवळी प्रदक्षिती
ते सुभक्त मत्प्राणसखये
श्री नारायण प्रसन्ने पावती ...
तुळशी वृंदावनीची मृत्तिका जो भक्त तयाचा लावी टिळा
निस्सीम भक्त तो माझा नेक
श्रीकृष्ण म्हणे शब्दी मोकळा ...
तुळशी माळ ज्याच्या गळा जाणा सावळे स्वरूप तेथे
अंगणी दारी तुळशीचा नेम
पुण्यप्राणी सर्वही जाणा ते ते ...
ऐसिया तुळशीहाराच्या गोष्टी
तुम्हा सांगतो ऐका सुजनहो
करा पूजा तुळशीचि आर्ते अर्पण करा तुळशी नित्ये

जयंत एस. कुलकर्णी

# ग्रहसंकेत

## (रविवार, १० ऑगस्ट ते शनिवार, १६ ऑगस्ट २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १० ऑगस्ट-** श्री सिध्दारूढस्वामी पुण्यतिथी, श्री काळभैरव यात्रा नांदणी ता. शिरोळ (जि. कोल्हापूर), आदित्य पूजन ✻ **सोमवार, ११ ऑगस्ट-** श्रावणी सोमवार, शिवपूजन, शिवामूठ मूग, राघवेंद्रस्वामी पुण्यतिथी, मल्लिकार्जुन यात्रा आडी (बेळगाव), श्री महादेव उत्सव (पारनेर), गिरीजा शंकर यात्रा राजाचे कुर्ले (खटाव), गुरुनाथबाबा दंडवते पुण्यतिथी गाणगापूर, अशून्यशयन व्रत समाप्ती ✻ **मंगळवार, १२ ऑगस्ट-** अंगारक संकष्ट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१:१७, अहिल्यानगर-२१:०९, कलबुर्गी-२१:०१, कोल्हापूर-२१:१२, जालना-२१:०४, धाराशिव-२१:०४, नांदेड-२०:५८, पंढरपूर-२१:०७, परभणी-२१:०१, पुणे-२१:१३, बीड-२१:०५, बीदर-२०:५८, लातूर-२१:०२, विजापूर-२१:०५, छत्रपती संभाजीनगर-२१:०७, सातारा-२१:१२, सोलापूर-२१:०४), संत बाळूमामा पुण्यतिथी जागर (आदमापूर), मंगलागौरी पूजन, जागतिक युवक दिन, खाणाईदेवी यात्रा नागाव ✻ **बुधवार, १३ ऑगस्ट-** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यदिन, बुध पूजन, आचार्य अत्रे जयंती, टेंबे स्वामी जयंती, बाबामहाराज पुण्यतिथी पुणे, श्री गोदावरीमाता पुण्यतिथी साकुरी (जि. नगर)✻ **गुरुवार, १४ ऑगस्ट-** श्री ज्ञानेश्वर काटकर महाराज पुण्यतिथी कोल्हापूर, पंचक सकाळी ९.०५ पर्यंत, पतेती, बृहस्पती पूजन ✻ **शुक्रवार, १५ ऑगस्ट-** स्वातंत्र्य दिन, पारशी नूतन वर्ष १३९५ प्रारंभ, श्रीकृष्ण जन्माष्टमी उपवास, चिले महाराज जयंती पैजारवाडी, जरा जिवंतिका पूजन, केळकर महाराज जयंती सांगली ✻ **शनिवार, १६ ऑगस्ट-** कालाष्टमी, गोपाळकाला, जन्माष्टमी व्रत वैष्णव, श्री ज्ञानेश्वर माऊली जन्माष्टमी, महर्षी नवल उत्सव संगमवाडी, अश्वत्थ मारुती पूजन, मन्वादि, मघा रवि (वाहन बेडूक), बंजारा तीज, पंत महाराज बाळेकुंद्री जयंती

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १० (१४ पर्यंत), १४ ऑगस्ट ✻ **डोहाळ जेवण-** १४ ऑगस्ट ✻ **बारसे-** १० (१२ नंतर) ११ (१३ पर्यंत) ऑगस्ट ✻ **जावळ,-** १०, ११ (१३पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** १०, १४ ऑगस्ट

### मेष :- नव्या विचारांना चालना

हेही दिवस सरतील, विश्वास ठेवा. श्रद्धा स्थानावर. मंगळवारची तृत्तीयातील शुक्र- गुरुची युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. शुक्रवारचा बुध- मंगळ लाभयोग ही यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणारा आहे. सरकारी कामे मनासारखी होतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. अनुकूलतेचा लाभ घ्यावा. शुभ ता. १०, १४

### वृषभः- आर्थिक कामे यशस्वी

इतिहास साक्षी आहे की, वेळ आल्यावर रक्ताची नाती नाही तर मैत्रीचा हात सोबत असतो. मंगळवारी धनस्थानी शुक्र- गुरुची युती होत आहे. आर्थिक कामे यशस्वी होतील. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. गायक, वादक यांना चांगले दिवस अनुभवता येतील. कार्यक्षेत्रात सुसंधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघेल. चिंता नको. दगदग टाळावी. शुभ ता. १०, १४

### मिथुनः- नव्या विचारांना चालना

श्रमाच्या घामातून ज्ञानाचा दिवा लागतो. त्यातून एक नवीन जग निर्माण होते. आपल्या राशीतच मंगळवारी शुक्र गुरुची युती होत आहे. त्यामुळे सुख-स्वास्थ्य वाढविणाऱ्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. नव्या कामाला गती मिळेल. अपेक्षित घटना घडतील. फार दगदग करू नका. सरकारी कामे करून घ्यावीत. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ११,१५

### कर्कः- अडचणीतून मार्ग निघेल

जोपर्यंत आपली चांगली वेळ येत नाही. तोपर्यंत शांत राहणे चांगले. राशीतील बुधाचा मंगळाशी होणारा लाभ योग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणारा ठरेल. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रशासन सेवेत अनुकूलता वाढेल. सुसंधी लाभतील. वात विकारापासून त्रास संभवतो. शुभ ता. १४, १५

### सिंहः- आर्थिक काम यशस्वी

चांगले नाते व चांगले मित्र कधी बदलत नसतात. मंगळवारी लाभस्थानी शुक्र गुरुची युती होत आहे. एखादे महत्त्वाचे आर्थिक काम यशस्वी होणार असल्याने समाधान वाटेल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नव्या संधीचे स्वागत करावे. जामीन कोणास राहू नका. शुभ ता. ११, १५

### कन्याः- उत्साह धडाडी वाढेल

आपली वेळ आपली परिस्थिती नेहमी बदलत असते. धीर धरावा. बुध- मंगळाचा शुक्रवारी होणारा लाभ योग अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्रात प्रगती करणारा ठरेल. उत्साह, धडाडी वाढेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रकृतीच्या तक्रारीची दखल घ्यावी. कर्म स्थानातील शुक्र गुरु युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी राहील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. १०, १५

### तुलाः- सरकारी काम होईल

जगातली सर्वात सुंदर भेट म्हणजे खरी मैत्री. भाग्यस्थानी शुक्र- गुरुची युती होत आहे. त्यामुळे भाग्योदयकारक घटना घडतील. एखादे सरकारी काम मनासारखे यशस्वी होईल. यांत्रिक क्षेत्रात सुसंधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जातील. चिंता नको. नोकरीत अधिकार योग आहेत. शुभ ता. ११, १५

### वृश्चिकः- आर्थिक प्रगतीच्या घटना

आपलाच माणूस जेव्हा बदलतो, तेव्हा जास्त दुःख होत असते. अष्टमात शुक्र-गुरुची युती होत आहे. आर्थिक प्रगतीच्या घटना घडतील. बुध- मंगळ लाभयोग भाग्योदयकारी घटना घडविणार आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. नोकरीत अधिकार वाढतील. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. लाभ उठवावा. चिंता कमी होईल. शुभ ता. ११, १५

### धनुः- नव्या विचारांना चालना

जो आपल्या चुका एकांतात सांगतो, तोच आपला हितचिंतक असतो. सप्तमात शुक्र गुरुची युती होत आहे. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. बुध मंगळाचा लाभयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. सप्ताह उत्तरार्धात महत्त्वाच्या कामात यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभणार आहे. अडचणी कमी होतील. शुभ ता. १०, १५

### मकरः- नव्या संधीचे स्वागत करावे

एक प्रामाणिक मित्र, हजारो नातेवाईकांपेक्षा चांगला असतो. सप्तमातील बुधाचा मंगळाशी होणारा लाभयोग उद्योग, व्यवसायात मनासारखी प्रगती घडवेल. नव्या संधीचे स्वागत करावे. महत्त्वाचे काम पूर्वार्धात करून घ्यावे. अडचणीतून मार्ग निघेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या कामाला गती मिळेल. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. शुभ ता. ११, १५

### कुंभः- नव्या कामांना गती

मुर्खाला कधी आपला दोस्त बनवू नका व दोस्ताला कधी मूर्ख बनवू नका. पंचमात शुक्र-गुरुची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक प्रगतीच्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील. नव्या कामांना गती मिळेल. कार्यसिद्धीसाठी पाठपुरावा करावा. अपेक्षित संधी लाभतील. प्रगतीच्या घटना घडतील. रेंगाळलेली कामे यशस्वी होतील. शुभ ता. ११, १५

### मीनः- स्थावर प्रश्न मार्गी लागतील

जे फक्त नावालाच आपल्यासोबत असतात, ते संकट पाहताच आपल्यापासून दूर निघून जातात. सुखस्थानी शुक्र -गुरुची युती होत आहे. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. बुध- मंगळ लाभयोग कारखानदारीत प्रगती करणार आहे. योजलेली कामे मनासारखी होतील. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. अडचणींवर मात कराल. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. १५

!! शुभ भवतु !!

पान ४ वरून

## मी तुळस तुझ्या अंगणी

लंच ब्रेकनंतर जर्मनीचे डॉ. बेकर यांचा, ''युरोपातील त्वचारोगांवर आशियायी वनस्पतीचे उपचार'', हा पेपर होता. आशियात विपुलपणे आढळणाऱ्या वनस्पतीच्या रसापासून बनविलेल्या औषधांनी किती प्रकारचे त्वचारोग दुरुस्त करण्यात आपल्याला यश आले आहे, हे डॉ बेकरनी रंगीत छायाचित्राद्वारे उत्तम प्रकारे सादर केले. या औषधी-वनस्पतीच्या जर्मनीत केलेल्या लागवडीबद्दलही माहिती दिली. प्रश्नोत्तराचे वेळी या वनस्पतीचे इंडियन नाव 'ट्यूलसी' असल्याचे व याबद्दल संशोधनाची प्रेरणा आपल्याला संबंधित संस्कृत-साहित्याच्या एका भाषांतरित माहितीतून मिळाल्याचे जेव्हा डॉ. बेकरनी सांगितले, तेव्हा उपस्थिततातील डॉ. गंधेंसारख्या इंडियन डॉक्टरांनी डोळे वटारले! मूळ संस्कृत-रचना आपल्याला कळत नसल्याचं प्रांजळपणे करीत, सोबत आणलेली स्लाइड मात्र त्यांनी दाखविली. मालतीने आपल्याला पाठ म्हणून दाखविलेले श्लोक त्या स्लाईडवर वाचताना मिलिंदच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही! डॉ. गंधेंनी आपले ठरावीक प्रश्नास्त्र बेकरवर सोडले, ''या सर्व नैसर्गिक रसांच्या औषधी प्रक्रियांचे रासायनिक विश्लेषण सिद्ध करता येतं का?'' परिषदेच्या समारोपप्रसंगी डॉ. बेकर यांच्या शोधनिबंधाला प्रथम पारितोषिक देताना झालेल्या कारणमीमांसेत, ''स्वस्त, बहुगुणी, साईड् इफेक्टरहित वनस्पतिजन्य औषध प्रायोगिक विश्लेषणासह सुचविल्याबद्दल'' त्यांची स्तुती केली गेली! अनायासे इतक्या दूर जातच आहोत म्हणून संमेलनानंतर, इतर प्रतिनिधींसोबत युरोप दर्शनाच्या टूरमध्ये डॉ. गंधे देखील सामील झाले, नव्या ओळखी झाल्या. मुंबई विमानतळावर मालतीचा भाऊ व काही मुंबईचेच डॉक्टर मित्र हारतुरे घेऊन आले होते. औपचारिकता आटोपून, रात्री स्टेशनवर बडनेरापर्यंतचं गाडीचं तिकीट हाती देत, ''हंऽ! मिलिंदराव! ही गाडी रात्री अडीचच्या सुमारास बडनेराला जाते हंऽ. नाहीतर जाल झोपेत थेट नागपूरला मामांकडे!'' अशी फिरकी घेत मालतीच्या भावाने हात हलवीत मिलिंदला निरोप दिला. पण गाडी बडनेराला तब्बल तीन तास उशिराने आली. डॉ. पवारांसोबत दोघं डॉक्टर मित्र कारमध्ये ताटकळत होते. त्यांनी मिलिंदला अमरावतीला घरापाशी आणून सोडलं आणि जागरणाने कातावल्यामुळे, ''अच्छाऽ मिल्या! सावकाश मिलेंगें,बाऽऽय!!'' म्हणत सटकले! पहाटे तीन वाजल्यापासूनच आतुरतेने डॉक्टरांची वाट बघत, अंगणात चकरा मारत कंटाळून मालती, आता सहज विरंगुळा म्हणून वृंदावनातील तुळशीला पाणी देत पाठमोरी उभी होती. त्यामुळे शांतपणे फाटक उघडून अंगणात येत, वृंदावनापाशी हात जोडून, उगवत्या कोवळ्या किरणांसोबत मिलिंद केव्हाचा उभा आहे, हे तिला कळले देखील नाही!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
प्रणाम घ्यावा माझा हा, श्री महाराष्ट्र देशा!

कवी गोविंदाग्रजांनी महाराष्ट्राचे अगदी सार्थक वर्णन वरील शब्दांत केले आहे. सह्याद्री हे महाराष्ट्राला लाभलेले नैसर्गिक वरदान आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेले अनेक बेलाग दुर्ग गिर्यारोहकांना आकर्षित करतात. सह्याद्रीच्या उत्तरेकडून सुरू होणाऱ्या डोंगररांगेला सेलबारी डोलबारी डोंगररांग म्हणतात.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण प्रांतातून या डोंगररांगेची सुरुवात होते. सेलबारी डोंगररांगेत मांगी-तुंगी सुळके, न्हावीगड, तांबोळ्या हे गड विराजमान आहेत तर मुल्हेर, मोरागड, साल्हेर, सालोटा, हरगड हे किल्ले डोलबारी रांगेत आहेत. गुजरातमधील घनदाट जंगल डांगचा प्रदेश व महाराष्ट्रातील बागलाण प्रदेश या सीमेवर हे किल्ले वसले आहेत. सीमेवरील प्रदेश असल्यामुळे या प्रदेशातील संस्कृतीवर गुजरात व महाराष्ट्र असा संमिश्र प्रभाव आहे. सह्याद्रीवर वरुणराजांचा वरदहस्त असल्याने या भागात विपुल प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. पाणी असल्याने इथे बागायती शेती भरपूर प्रमाणात आहे म्हणूनच बागलाण हा सुपीक व संपन्न प्रदेश आहे.

नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यात स्थित मुल्हेर किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव मुल्हेरच आहे. हे गाव पूर्वी किल्ल्यातच वसलेले होते पण कालांतराने किल्ल्याच्या पायथ्याशी वस्ती वाढत गेली.

# मुल्हेर



मुल्हेर गावाचा इतिहास आपल्याला महाभारत काळात घेऊन जातो. मुल्हेर गावाचे महाभारतकालीन नाव रत्नपूर होते. येथे मयूरध्वज नावाचा राजा होऊन गेला त्यामुळे गावाला मयूरपूर नाव पडले. मुल्हेर किल्ल्याला मयूरगड देखील म्हणतात. किल्ल्याची उंची साधारणतः ४२९० फूट आहे. हा किल्ला बागुल राजांनी बांधला म्हणूनच परिसराला बागुलगड व नंतर बागलाण प्रांत असे नाव पडले. बागुल राजे हे मूळ कनोजचे होते. या घराण्यात अकरा राजे झाले, मुल्हेर हा राजधानीचा किल्ला होता. विजयनगरमध्ये हिंदू साम्राज्य प्रस्थापित झाले त्याच्या आधीपासूनच बागलाण प्रांतात हिंदू सत्ता होती. अकबराने जेव्हा खान्देश प्रांत जिंकला तेव्हा प्रतापशहा बहिर्जी हा बागलाण प्रांताचा राजा होता. बहिर्जी ही पदवी बागलाण प्रांताच्या राजघराण्याला मिळाली होती. पुढे प्रतापशहाने मोगलांचे सार्वभौमत्व पत्करले. शहाजहानशी या राजाचे मैत्रीपूर्ण संबंध झाले. जेव्हा औरंगजेब दक्षिणेत आला, त्याने बागलाण प्रांतावर हल्ला केला. औरंगजेबाने मुल्हेर किल्ला जिंकला व किल्ल्याचे नाव बदलून औरंगगड केले पण हे नाव प्रचलित झाले नाही. वैभवशाली हिंदू सत्ता संपुष्टात आली व जाचक मोगल सत्ता आली. मोगलांचा प्रथम किल्लेदार म्हणून मोहम्मद ताहीर याची मुल्हेरवर नियुक्ती झाली. त्याने ताहीर नावाचे गाव वसवले तेच नंतर ताहीराबाद म्हणून प्रसिद्ध झाले. शिवाजी महाराजांनी दुसऱ्या सुरत लुटीनंतर बागलाण मोहीम सुरू केली. १६७१ मध्ये मराठ्यांनी मुल्हेरवर हल्ला केला. मात्र मोगल किल्लेदाराने तो थोपवून धरला व मराठ्यांना माघार घ्यावी लागली. त्यानंतर मराठ्यांनी साल्हेरच्या किल्ल्यावर चढाई केली व तो जिंकला. साल्हेर जिंकल्यावर पुन्हा मुल्हेरकडे मराठ्यांचा मोर्चा वळला. यावेळी मात्र विजय झाला व मुल्हेर स्वराज्यात सामील झाला. मात्र काही दिवसांनी मोगलांनी पुन्हा हल्ला करून गड काबीज केला.

१७५२ मधील भालकीच्या तहात मुल्हेरसकट संपूर्ण खान्देश मराठ्यांच्या हाती आला. या तहानंतर त्रिंबक गोविंद हे मुल्हेर गडावर किल्लेदार म्हणून नियुक्त झाले. १७६५ मध्ये या गडावर गुप्तधन मिळाल्याच्या नोंदी पेशवेदफ्तरी मिळाल्या. त्यानंतर इग्रजांनी हिंदुस्थानात आपले पाय रोवायला सुरुवात केली. शिवशाहीत देखील अनेक स्थित्यंतरे घडून आली. १८१८ मध्ये किल्ला इंग्रजांनी ताब्यात घेतला. महाराष्ट्राच्या अस्मिता रक्षणासाठी सह्याद्रीत निर्माण झालेले भगवे वादळ संपुष्टात येण्यास सुरुवात झाली.

इतिहासाचे स्मरण करत मुल्हेर गावात पोहोचलात की किल्ल्यावर जाण्यासाठी गावातून दोन वाटा जातात. आपण प्रथम गडपायथा गाठायचा. धनगरवाडी येईपर्यंत चालत राहायचे. येथून एक वाट सरळ जाते व दुसरी उजवीकडे वळते. आपण सरळ वाटेने गेलो की मुल्हेर माचीवरील गणेश मंदिराजवळ पोहोचतो. या वाटेने गड चढताना तीन दरवाजे लागतात. पण सगळे ढासळलेल्या अवस्थेत आहेत. ही वाट साधी व सोपी आहे. उजवीकडच्या वाटेने गेलो तर दोन तासांनी आपण मुल्हेर माचीवरील गणेश मंदिरात पोहोचतो. ही वाट जरा दूरची आहे आणि या वाटेनेही तीन दरवाजे पार करावे लागतात. ही वाट हरगड व मुल्हेर किल्ला यांच्या खिंडीतून वर चढते. या खिंडीतून चढल्यास डावीकडे मुल्हेर व उजवीकडे हरगड आहे. मुल्हेर किल्ल्याचे दोन भाग पडतात. एक मुल्हेर माची व मुल्हेर बालेकिल्ला! मुल्हेर माचीवरील गणेश मंदिर अप्रतिम आहे. मंदिरावर सुंदर शिल्पे कोरली आहेत. देवालयाच्या खांबाची रचना व त्यावरील शिलालेख पाहावा, मात्र अस्पष्ट असल्यामुळे नीट वाचता येत नाही. गणेश मंदिरापासून वर चढत गेल्यास सोमेश्वर मंदिर आहे. मंदिरात दर्शन घेऊन डावीकडे असलेली चंदनबाव पाहावी. या विहिरीचे बांधकाम तीन मजली आहे व आत उतरण्याकरिता पायऱ्या आहेत. विहिरीच्या जवळ महादेवाचे मंदिर आहे. पिंडी मात्र तळघरात आहे. थोडे समोर एक पठार आहे. येथून वर जाणारी वाट आपल्याला मोती तलावाजवळ घेऊन जाते. या टाक्यातील पाणी पिण्यास योग्य आहे पण ते फेब्रुवारीपर्यंत उपलब्ध असते. मोती तलावाच्या उजवीकडे वर चढत गेलात की बालेकिल्ल्याचे महाद्वार लागते. इथे डावीकडे गुहा व समोर पाण्याचे टाके आहे. मुल्हेरगडाचा बालेकिल्ला म्हणजे विस्तीर्ण पठार, येथे नऊ ते दहा पाण्याच्या टाक्या आहेत. राजवाड्याचे भग्नावशेष व भडंगनाथाचे मंदिर आहे. राजवाड्याच्या खाली रामलक्ष्मण मंदिर आहे. तसेच भडंगनाथाच्या मंदिराच्या वर असणाऱ्या टेकडीवरून खाली उतरलो की मोरागडाकडे जाणारी वाट दिसते. गडावर मुक्काम करायचा असल्यास बालेकिल्ल्याजवळ असलेल्या गुहेत राहता येते. समोरच मांगी तुंगीची शिखरे, न्हावीगड, तांबोळ्या, हनुमानगड लक्ष वेधून घेतात. मोरागड भौगोलिकदृष्ट्या पाहिले तर मोरागड हा मुल्हेर किल्ल्याचाच एक भाग आहे. मुल्हेरचा दुसरा बालेकिल्ला म्हणून मोरागड विख्यात आहे. मोरागड पाहायचा असल्यास मुल्हेरच्या बालेकिल्ल्यावरून जाणारी वाट तसेच मुल्हेरच्या सोमेश्वर मंदिरापासून वर जाणारी वाट मोरागडकडे जाते. ह्या दोन्ही वाटा पुढे जाऊन एकच होतात. येथून जाताना तीन दरवाजे पार करावे लागतात. मुल्हेर व मोरागड दर्शन झाले की मुल्हेर व हरगडाच्या मधील खिंडीकडे चालत निघायचे. त्याआधी मुल्हेर गडावरील तटालगत असलेली शक्तिप्रसाद तोफ पाहायची. खिंडीतून डाव्या व उजव्या बाजूला दोन वाटा खाली उतरतात. उजवी वाट मुल्हेर गावात व डावी वाट नरकोल गावात उतरते.

आपण सरळ चालत हरगडच्या कड्याकडे निघायचे. समोर घळीतून वाट काढत गडमाथा गाठावा लागतो. वहिवाट नसल्यामुळे वाट अस्पष्ट आहे. शोधावी लागते. स्थानिक व्यक्ती सोबत असली तर जास्त सोयीचे होऊ शकते. हरगड मोरागड व हरगड हे मुल्हेर किल्ल्याचे संरक्षक किल्ले आहेत. हरगडाच्या विस्तीर्ण माथ्यावर दोन पाण्याच्या टाक्या, पडके मंदिर व घरांचे भग्नावशेष दिसतात. हरगडाच्या नैर्ऋत्य बाजूस सुलतान बुरुज आहे. व तटबंदीचे अवशेष आढळतात. ईशान्य बाजूस गडाच्या उंच भागावर हजार बगदी नावाची तोफ आहे. उत्तरेकडील सपाटीवर एका गुहेत कपार भवानीचे मंदिर आहे. गडफेरी लवकर आटोपून खिंडीतून मुल्हेर गावाकडे उतरायचे. मुल्हेर, मोरागड व हरगड हे तिन्ही किल्ले, एक रात्र मुक्काम केल्यास एकत्र फिरता येतात. बागलाण प्रांतातील या तिन्ही किल्ल्यांची एकत्र सफर सह्याद्रीतील भटकंतीत एक वेगळा अनुभव म्हणून अवश्य करायला हवी.

पान ५ वरून

## मायक्रोसॉफ्टची अकड मोडित!

तुम्ही नेहे कंपनीचं नाव ऐकलं असेल. नेहे ही चेन्नईस्थित कंपनी आहे, जी गेल्या २० वर्षांपासून भारताच्या डिजिटल स्वातंत्र्यावर काम करत आहे. त्यांनी सिलिकॉन व्हॅलीच्या कंपन्यांना आव्हान देण्याचं ठरवलं आहे आणि व्यवसायांसाठी सर्वसमावेशक पॅकेज तयार केले आहेत. जेव्हा नायरा एनर्जीचं प्रकरण घडलं, तेव्हा नेहे ने त्यांना सांगितलं की तुम्हाला मायक्रोसॉफ्ट किंवा दुसऱ्या कोणत्याही कंपनीकडे जाण्याची गरज नाही. तुम्ही आमच्या नेहेच्या सेवा वापरा. पण तुम्हाला वाटेल की नेहे वर विश्वास का ठेवावा? मोदीजींना माहीत आहे की विश्वासार्हता कशी निर्माण करायची. भारत सरकारने दोन-तीन वर्षांपूर्वीच, जेव्हा डेटा चोरीच्या घटना वाढल्या होत्या, तेव्हाच एक निर्णय घेतला. तुम्हाला आठवत असेल की एम्सचा डेटा चोरी झाला, फेसबुक आणि गुगलचा डेटा चोरी झाला. हा सगळा डेटा कुठे जातो? हा डेटा 'डीप स्टेट'कडे जातो, जेणेकरून तुमच्या विचारसरणीवर नियंत्रण ठेवता येईल.

भारत सरकारने सप्टेंबर २०२३ मध्येच नेहे ला पहिला खाजगी कंत्राटदार म्हणून निवडलं, जे सरकारी ईमेल सेवा आणि इतर उत्पादकता साधने (productivity tools) प्रदान करणार होते. टाटा, गुगल किंवा इतर कोणालाही हे कंत्राट मिळालं नाही. हा भारतासाठी एक महत्त्वाचा टप्पा होता, जिथे आपल्या सरकारने परदेशी कंपनीवर अवलंबून राहण्याऐवजी एका भारतीय कंपनीला निवडलं. आता लाच घेण्याचं जुनं राजकारण संपलं आहे. तुम्ही किंमतीचा विचार करा. मायक्रोसॉफ्टची विंडोज प्रणाली (Windows) खूप महाग आहे. मला वाटतं की याला 'थळपर्वी' नाव यासाठीच दिलं आहे, कारण त्यात खिडक्या तुटलेल्या असतात आणि कोणीही आत येऊन डेटा चोरी करू शकतो. पण नेहे ही कंपनी तुमच्या डेटा आणि सेवांची किंमत मायक्रोसॉफ्टच्या एक दशांशपेक्षाही कमी ठेवते. भारत सरकारने मूर्खांसारखं काम केलं नाही. त्यांनी नेहे कडून डेटा साठवण आणि इतर सेवा घेतल्या आहेत. नेहे एका महिन्याचे फक्त ६० घेते आणि तुम्हाला सर्व प्रीमियम सेवा मिळतात. मायक्रोसॉफ्टच्या प्रीमियम सेवांसाठी वर्षाला कमीत कमी २०,००० लागतात, तर नेहे मध्ये फक्त ६०० लागतात.

इतका मोठा फरक आहे. म्हणजेच, मोदीजींनी २०२३ मध्येच भारताला डिजिटल गुलामगिरीतून बाहेर काढलं होतं. आणि इतर भारतीय कंपन्यांनाही सांगितलं होतं की तुम्ही नेहे सारख्या कंपन्यांसोबत काम करा, या परदेशी कंपन्यांसोबत जाऊ नका. मी जेव्हा नेहे च्या बिझनेस मॉडेलचा अभ्यास केला, तेव्हा कळलं की त्यांची किंमत कमी का आहे. त्याचं कारण आहे त्यांनी मोठ्या शहरांमध्ये, जसे की मुंबई, दिल्लीमध्ये कार्यालयं उघडली नाहीत. त्यांनी टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये, लहान गावांमध्ये कार्यालये उघडली. तिथे त्यांनी तरुण अभियंत्यांना प्रशिक्षण दिलं आणि हुशार मुलांना आपल्या कंपनीत कामावर ठेवलं. म्हणजेच, त्यांनी रोजगारही निर्माण केला आणि लहान शहरांमध्ये डिजिटल संधीही दिल्या. यामुळे त्यांच्या जमिनीचा, कार्यालयांचा आणि कर्मचाऱ्यांचा खर्च कमी झाला. नेहेने जेव्हा सरकारी ईमेल सेवांसाठी बोली लावली, तेव्हा ते सर्वात स्वस्त होते आणि सरकारने लगेच त्यांची निवड केली. हा होता आपल्या देशाच्या डिजिटल सुरक्षेचा पाया, जो आपण २०२३ मध्येच मजबूत केला. याचा अर्थ, आपला डेटा आता आपल्या ताब्यात आहे, तो पाश्चात्त्य देशांच्या नियंत्रणातून बाहेर आला आहे. तुम्हाला जे वाटतंय ना की ईमेल बंद झाले, डेटा चोरी झाला, हे सगळं यासाठीच घडतंय कारण भारत आत्मनिर्भर होत आहे. गुगल, मायक्रोसॉफ्ट यांसारख्या कंपन्या ज्या नियंत्रण प्रणाली वापरतात, त्यातून मोदीजी आपल्या देशाला बाहेर काढत आहेत. मोदीजींची एक रणनीती आहे की 'डिजिटल इंडिया'मध्ये प्रत्येक डेटा सेंटर भारतीय माध्यमांमध्ये असावी याबद्दल कोणीच बोलत नाही.

### आपण काय केलं पाहिजे?

मित्रांनो, आता आठवतंय की १६ अब्जपेक्षा जास्त लोकांचा डेटा ॲपल, गुगल, फेसबुक यांसारख्या कंपन्यांनी आधीच चोरला आहे. भारताची सायबर सुरक्षा एजन्सी आपल्या कंपन्यांना वारंवार इशारा देत आहे की आपला डेटा परदेशी कंपन्यांच्या क्लाऊडवर ठेवू नका. ते कधीही तुमचा डेटा चोरून तुम्हाला ब्लॅकमेल करू शकतात. त्यामुळेच सरकारने नेहे च्या व्यासपीठाचा वापर सुरू केला. ही बातमी तुमच्यासोबत शेअर करणं महत्त्वाचं होती, कारण नायरासोबत जे झालं, ते उद्या तुमच्यासोबतही होऊ शकतं. हे तंत्रज्ञान खूप गुंतागुंतीचं आहे. मोदीजींना हे माहीत होतं. की विंडोजवर आधारित प्रणाली आपल्यासाठी योग्य नाही, आपल्याला त्यातून बाहेर पडावं लागेल. लिनक्ससारख्या सुरक्षित प्रणालीचा वापर सरकारने सुरू केला आहे.

मित्रांनो, मायक्रोसॉफ्ट आणि युरोपियन युनियनने जे काही केलं, ते खूप महत्त्वाकांक्षी होतं. त्यांचा एकच उद्देश होता, तुम्हाला तुमची ताकद दाखवून देणं की आम्ही तुम्हाला कमकुवत करू शकतो. आज त्यांनी हे केलं, उद्या ते आपल्या अर्थव्यवस्थेसोबतही असं करू शकतात. पण आपण त्यांना सांगितलं हा राहुल गांधींच्या काळातील भारत नाही. इथे आम्ही आमच्या तंत्रज्ञानाचं सार्वभौमत्व राखणार आहोत. तुम्ही जी डिजिटल वसाहत करू इच्छिता, ती आम्ही स्विकारणार नाही.

# काम- अर्थपूर्ण की अर्थशून्य ?

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २७९

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



काम, मग ते नोकरी या स्वरूपातील असो, अथवा पिढीजात धंदा /व्यवसाय असो, मानवाची आणि कामाची निरगाठ प्रदीर्घ कालावधीसाठी असते. नोकरीला सेवानिवृत्तीचे आकर्षण असते, पण व्यवसाय जन्मभरासाठी असतात. ही जोडगोळी कधी कंटाळवाणी (रोज रोज तेच तेच टाईप रुटीनची) असते, कधी आव्हानात्मक असते, कधी कृतार्थता देणारी असते, कधी दमवणारी असते. पण त्यांतून एकाला विलग करता येत नाही. आपण जे काम करतो, त्यांत अर्थ असणं अभिप्रेत असतो आणि तो सापडला नाही तर तो शोधणं क्रमप्राप्त असते. सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व्हिक्टर फ्रँकल मानतो कि अगदी वाईट अवस्थेतही कामामध्ये हेतू शोधण्याची मानवाची प्रवृत्ती जन्मजात असते.

अलीकडचे संशोधनही म्हणते- कामाच्या इतर कोणत्याही घटकांपेक्षा कर्मचाऱ्यांसाठी कामात अर्थ शोधणे अधिक महत्वाचे असते. त्यापुढे पगार, पदोन्नतीच्या संधी, कार्यसंस्कृती आणि मिळणारे पुरस्कारही फिके पडतात. कामातला अर्थ अत्यंत प्रेरणादायी असतो. आपले कर्तृत्व झळाळून टाकणारा असतो, समर्पण साध्य झाल्यावर श्रांत करणारा असतो. हे पटण्याजोगे असले तरीही कामात आनंद कसा शोधायचा आणि त्यांत आपले वरिष्ठ कितपत साहाय्यीभूत होऊ शकतात, या विषयावर फारसे संशोधन झालेले सापडत नाही.

वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये कार्यरत असलेल्या असंख्य मंडळींच्या मुलाखती घेतल्या आणि त्यांना एकच प्रश्न विचारला की त्यांचे काम त्यांना जेव्हा अर्थपूर्ण वाटले असे काही प्रसंग सांगा किंवा उलट त्यांनी स्वतःलाच विचारले असावे- मी काय करतोय इथं? उत्तरांमध्ये फारसे साम्य आढळत नाही कारण आपण जे काम/नोकरी/व्यवसाय करतो त्यांतील अर्थ कामाच्या इतर घटकांमध्ये नसतो. कारण परिस्थिती भिन्न असते, कामाचे स्वरूप भिन्न असते, काम आणि आपण यांच्यातील नाते ठराविक नसते. अर्थपूर्णता बरीचशी व्यक्तिगत असते आणि बरेचदा स्वतःसाठी महत्वाच्या समाजातील देण्यासाठी वेळ व्यतीत करणे माणसांना अधिक अर्थवाही वाटते. आपले विचार, स्मृती यांचे कुटुंबियांशी असलेलं नातं, इतर स्वजनांच्या मदतीला येणं हे कामातील अर्थपूर्णता अधोरेखित करीत असते. कधीकधी हे वाटणं मनोवस्थेशी संलग्न असतं तर बरेचदा अनियोजित, आकस्मित क्षणांमध्ये अर्थ देण्याची शक्ती अधिक असल्याचे आढळून येते.

आपले हातातील काम अधिक अर्थपूर्ण करण्यात आपल्या वरिष्ठांचा, नेतृत्वाचा कितपत सहभाग असतो? दुर्दैवाने विशेष नाही. याउलट अर्थ नष्ट करण्यात मात्र व्यवस्थापन अग्रभागी असते, हे मात्र सर्वश्रुत आहे. आणि हे कसे टाळायचे हे संस्थेतील नेतृत्वासमोर असलेलं प्राधान्यक्रमाचे आव्हान असते. हाती घेतलेल्या कोणत्याही कामात अर्थ सापडणे यासाठी पाच विचार महत्वाचे असतात. अर्थपूर्णता केवळ काही साध्य झालं की मगच गवसते कां, काम मनोरंजक/आवडते असले की मग अर्थपूर्ण होते कां, कामात नवसर्जन (उदाहरणार्थ कलावंत) असायलाच हवे कां आणि आपल्यातील क्षमतांचा पुरेपूर वापर झाला की धन्य वाटते कां असे असंख्य प्रश्न मनात येतात. त्याचबरोबर कौतुक, पुरस्कार किंवा इतरांकडून पाठ थोपटली जाणे इतकेच पुरेसे नसते.

**(१) स्वतःच्या पलीकडे जाऊन जगाचा विचार करणे (स्वतःपेक्षा मोठे काहीतरी असण्यावर विश्वास ठेवणे)-** जेव्हा स्वतःपेक्षा माझं काम इतरांसाठी अधिक उपयुक्त ठरेल असा विचार व्यक्ती करते तेव्हा कार्य अर्थवाही बनतं. मानवी प्रेरणेच्या शिडीवर अब्राहम मॅस्लो ने सुद्धा आत्मकेंद्रित विचार ओलांडण्याचा मार्ग सर्वोच्च असतो असं प्रतिपादन केलं आहे. आपलं काम अर्थगर्भ तेव्हाच होऊ शकतं, जेव्हा त्याचा चांगला प्रभाव किंवा उपयुक्तता इतरांसाठी अधिक असते. उदा. कचरावेचक व्यक्तीला दिवसाखेरी त्याने गोळा केलेला कचरा कसा पुनःप्रक्रियेसाठी जातो आणि त्यामुळे वातावरण कसे स्वच्छ होते हे जाणवते तेव्हा आपल्या कामाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलतो.

आपल्या मर्यादा, परीघ ओलांडून जेव्हा आपल्या अमर्याद चैतन्याला आपण साद घालतो तेव्हा प्रदीर्घ सत्याशी ओळख पटते. स्वतःमध्ये स्थित असलेलं आयुष्य किती मितींचे बनलेलं आहे याची जाणीव सगळ्यांशी जोडण्याला प्रवृत्त करते कारण संपूर्ण मानवता आपल्यात सामावलेली आहे याची विराट जाण त्यावेळी झालेली असते. हे ओलांडणे आपली नवीन ओळख बनते.

**(२) मर्मज्ञ-** कामातील अर्थाचा शोध निव्वळ आनंददायी नसतो तर तो भावस्पर्शी असतो. गोष्टीचा गाभा जाणून घेत व्यक्त होणारी व्यक्ती असहज करणाऱ्या क्षणांशीही तितकीच तद्रूप असते, वेदनादायी विचार, भावना सुखदुःखे समे कृत्वा या न्यायाने स्वीकारत असते. कधीकधी हा शोध इतका उत्कट असतो की अत्यानंदाने डोळ्यांमध्ये अश्रू येतात.

कर्मचाऱ्यांनी सकारात्मक असावे, आनंदी असावे, कामात मश्गुल असावे असाच प्रयत्न अभिप्रेत असतो. कारण कामाचे अर्थवाहित्व अशाच भावनांशी संलग्न असते. दरवेळी कामातील अर्थ सकारात्मकच असायला हवा असे नाही. परिचारिकांसाठी एखाद्या रुग्णाची मृत्यूने सहज सुटका करावी आणि त्यासाठी स्वतःचे कौशल्य पणाला लावता यावे हाही परम अर्थवाही आनंद असतो. रात्रंदिवस अध्ययन करून, वर्षानुवर्षे कोर्टात लढून आपल्या अशिलाची सुटका करणाऱ्या वकिलांना मिळणारा अर्थ फार उच्च दर्जाचा असतो. शास्त्रज्ञ, संशोधक यांना एखादा जिकिरीचा, क्लिष्ट प्रश्न सुटल्यावर मिळणारे समाधान कोणत्याही फुटपट्टीत मावत नाही.

**(३) प्रासंगिक-** सातत्याने अनुभव येण्यापेक्षा कामातील अर्थ घटना किंवा घटनांच्या समूहातून अधिक गवसतो, प्रत्ययाला येतो. रोजचा कंटाळा सर्वपरिचित आहे, पण त्याला कामाचे स्वरूप अधिक जबाबदार मानले जाते. पण हलवून टाकणारे, हादरवून टाकणारे प्रसंग, घटना आपल्या कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन मुळापासून बदलवू शकतात. जॉली एल एल बी चित्रपटातील न्यायाधीश म्हणतो- आज काहीतरी नवं घडलं. एखादा खटला इतका परीक्षा घेणारा खूप दिवसांनी वाट्याला आला. नाहीतर न्यायालयाच्या त्याच कळकट भिंती, परिचित चेहरे आणि माहित असलेल्या समस्यांनी कंटाळून गेलो होतो.

विद्यापीठातील एखाद्या प्राध्यापकाला एखाद्या व्याख्यानानंतर रॉक स्टार सारखा आनंद होऊ शकतो. एखादा कलावंत मान्य करतो- अशाच भूमिकेचे स्वप्न उराशी बाळगून मी या क्षेत्रात आलो होतो. ते खरं झालंय यावर विश्वासच बसत नाहीए. अर्थातच अशा पराकोटीच्या भावना फार दीर्घायुषी नसतात, फारतर एक-दोन दिवस टिकतात. पण यांचा दांडगा परिणाम व्यक्तिगत जीवनावर खूप होतो. त्या स्मरणात राहतात आणि वेळोवेळी अभिमानाने सांगितल्या जातात. हे क्षण कोणी लादलेले नसतात, पण ते इतिहासाचे घटक नक्की बनतात.

युद्धस्थळी रॉकेटचा हल्ला परतवून लावण्यासाठी एखादा सैनिक योग्यवेळी सायरन वाजवतो आणि बेसावध असलेल्या तुकडीचे प्राण वाचवतो. दिसायला हे काम क्षुल्लक असले तरीही त्याचे मोल करता येत नाही आणि तो शिपाई हा प्रसंग विसरू शकत नाही. या क्षणांमध्ये भावनिक गुंतवणूक अधिक असते आणि ते कामातील अर्थपूर्णतेचे प्रतीक बनतात.

**(४) परावर्तन (चिंतन) -** वरील प्रसंगांमध्ये जागरूक जाणीव असल्याशिवाय स्मृती परतून येत नाहीत. भलेही त्या क्षणी आपण काही महत्वाचे, अर्थपूर्ण करीत आहोत याचा विचारही मनात नसतो, पण चिंतनाच्या क्षणी किंवा भूतकाळात डोकावताना कार्यपूर्तीचा आनंद जीवनातील अर्थगर्भाशी जोडता येतो. एखाद्या संशोधकाला सध्याचे हाती घेतलेले काम अर्थहीन वाटूही शकते, पण कालांतराने त्या संशोधनाची स्वीकृती, महत्ता त्याला जाणवू शकते. रोजच्या बोलण्यात अर्थपूर्ण काम वगैरे विषय निघतही नसतात, पण प्रसंगोपात्त त्यांची आठवण जरूर येते.

**(५) व्यक्तिगत-** कामाचे समाधान किंवा कामात गुंतून जाणे हे भावनिक जाणिवांशी, संवेदनांशी जोडलेले असते. अर्थगर्भ काम फक्त कार्यस्थळावर नसते तर ते व्यक्तिगत आयुष्यातील अनुभवांमध्येही परावर्तित होते. वरिष्ठ, संस्था तुलनेने कमी महत्वाच्या ठरतात. डॉ काशिनाथ घाणेकर या चित्रपटातील एका प्रसंगात आपले वडील खास कोकणातून आपले नाटक बघायला आलेत आणि त्यांनी आपलं कौतुक केलं याचंच डॉक्टरांना सार्थक वाटतं. आपल्या उग्र, रागीट वडिलांना ज्या कलेला विरोध केला, त्यांनीच त्या कलाविष्काराचे कौतुक केलं हे कृतकृत्य वाटणारे क्षण असतात. एखाद्या व्यावसायिकाला नवा बिझिनेस सुरु करताना आपल्या आजोबांना आपला अभिमान वाटला पाहिजे असं वाटणं याच धर्तीवरचं ! सेवानिवृत्तीच्या दिवशी कुटुंबीयांसमोर कौतुक होणे आणि त्यांच्या समवेत वरिष्ठांनी भोजनाचा आस्वाद घेणं याचं मोल फक्त त्या व्यक्तीलाच कळू शकते.

आपल्या कामाची कोणी शिफारस करणे हेच मुळात मान उंचावण्यासाठी पुरेसे असते. पंतप्रधान मोदी जेव्हा राम मंदिर निर्माण कार्यात सहभागी असलेल्या सर्वांचे आभार मानतात, त्यांच्यासमवेत फोटो काढतात, तेव्हा कामाचे मोल न सांगता पटते. ही प्रक्रिया अर्थातच अवघड असते आणि सगळ्यांच्या वाट्याला येईलच असे नसते. पण देशसेवेसाठी जान कुर्बान केलेल्या शूराला त्याच्या मरणोपरांत गौरविले जाते तेव्हा त्याच्या कुटुंबियांना आपली झालेली हानी भरून निघाल्यासारखे वाटते. हे वरवरचे समाधान नसते आणि त्याला कोठल्याही गणिती फूटपट्ट्या मोजू शकत नाहीत. आता याउलट अर्थशून्य कामाची काही वैशिष्ट्ये तपासून बघू यात...

**(१) स्वतःच्या नीतिमूल्यांशी फारकत घेत केलेलं काम-** भलेही नीतिमूल्ये दैनंदिन कामकाजात दृश्य स्वरूपात प्रतीत होत नसली तरीही, माणसे स्वतःच्या नीतिमत्तांच्या संकल्पनांविषयी उघड बोलत नसली तरीही काम आणि स्वतःची मूल्ये यांच्यातील फारकत दुखावणारी असतेच. मग ते काम पाट्या टाकण्यासारखे होते आणि निरर्थकतेची भावना वाढीला लागते.

सोप्पं उदाहरण म्हणजे संस्थांचा नफा कमविण्याचा अट्टाहास आणि कर्मचाऱ्याचा गुणवत्तेशी तडजोड न करण्याचा प्रयत्न यातून अर्थहीनता नजरेस पडते. उत्तम शिक्षण देण्याऐवजी आजकाल सगळ्या व्यवस्थापनांचा रोख विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देण्याकडे आणि त्यातून अभ्यासक्रमांना अधिकाधिक नवे प्रवेश असा असतो, जो एखाद्या शिक्षकाला रुचत नाही.

रुग्णाला बरे करण्याऐवजी त्याला खर्चिक उपचार सांगणारे वैद्यकीय क्षेत्रातील माणसे अर्थहीनतेकडे जात असतात. अशा कामातून ना समाधान हाती लागते ना अर्थ गवसतो.

**(२) कर्मचाऱ्यांना गृहीत धरणे -**

आता हा कोठे जाणार, तावडीत सापडलाय, घ्या याला कसेही राबवून- अशी सरंजामशाही मनोवृत्ती असलेल्या संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांच्या मनात कामाविषयी आस्था नसते. विभागप्रमुख आपल्या यशाची नोंद घेत नसतील, निव्वळ कामाची घिसाडघाई वाट्याला येत असेल तर ते काम अर्थशून्य होऊन जाते. आपणहून अधिक काम करायची जबाबदारी डोक्यावर घ्यायची आणि त्याबद्दल साधी आभाराची पोचपावती मिळणार नसेल तर काय उपयोग ? वरून हे तुझं कामच आहे, त्याबद्दल एवढं काय कौतुक? ही घातक, विषारी प्रवृत्ती संस्थांमध्ये सर्रास आढळते. नेमून दिलेल्या कामापेक्षा जास्त काम करण्यास सांगणे, दररोजच्या पाळीच्या वेळेपेक्षा जास्त वेळ संस्थेत थांबणे ही झाली काही उदाहरणे गृहीत धरण्याची. मग कामात मन कसे रमणार?

**(३) निरर्थक कामांमध्ये गुंतवून ठेवणे-** लायकीपेक्षा कमी व्यापाचे काम देऊन आपण कर्मचाऱ्यांचा गैरवापर करतोय, हे बहुधा लक्षातच घेतले जात नाही. आपल्या कामाचे स्वरूप काय असावे, ते वेळेत पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे कोणती संसाधने असावीत याबाबत प्रत्येकाची काही मते असतात. पण हे वाटपच चुकीचे होत असेल तर? फॉर्म भरणे, झेरॉक्स काढणे, फायलिंग करणे ही कामे कोणालाही करायला सांगितली जातात.

नियोजनशून्यतेमुळे कर्मचाऱ्यांच्या पदरी निराशा येते आणि काम करण्यातील उत्साह मारला जातो. आपण काय, साहेब सांगतील ते काम करणार अशी निर्लज्ज किंवा हतबल कबुली देताना कर्मचारी बघितले कि त्रास होतो. मी रोज दोन वेळा कार्ड पंच करायला (हजेरीसाठी) आणि एकदा लंच साठी येतो अशी कबुली देणारी व्यक्ती नजरेसमोर आली तरी वाईट वाटते.

**(४) अन्याय्य, गैरवाजवी वागणूक-** हाताखालच्या सहकाऱ्यांना अन्याय आणि अनुचित वागविणे हा जणू जन्मसिद्ध हक्क असल्यासारखे काही वरिष्ठ वागत असतात. एखाद्याला रजा नाकारणे, दुसऱ्याला सढळ हाताने मंजूर करणे, एखाद्याला कर्ज देणे पण दुसऱ्याचे कारण कितीही न्याय्य असले तरीही त्याची विनंती नाकारणे ही उदाहरणे ठायीठायी आढळतात. वेतन नाकारून किंवा त्यासाठी उशीर करणे ही आजकालची व्यवस्थापनाची आवडती खेळी झालीय.

वारंवार लोकांना खेटे मारायला लावणे आणि मग त्यांच्यावर उपकार केल्यासारखे त्यांचे काम करणे हे सर्रास चालते. विकासाच्या, प्रशिक्षणाच्या, पदोन्नतीच्या संधी नाकारणे यामुळे एखादा चांगला कर्मचारी वैतागून नोकरी सोडून जातो आणि त्यात त्याचे नुकसान नसते- संस्थेचे असते.

**(५) सहकाऱ्यांच्या निर्णयक्षमतेवर विश्वास नसणे -** आपल्या हाती काही नाही, निर्णय घेण्याचे अधिकार नाकारले जातात, सांगितले तेवढे कर (म्हणजेच तुझं डोकं चालवू नकोस), काम चांगलं- कमी वेळेत व्हावं, किंवा कमी खर्चात व्हावं अशासाठी सूचना केल्या तर त्याकडे दुर्लक्ष करणे हे संस्थेसाठी घातक असते. आपले ऐकून घेतले जात नाही, आपल्या मतांना, अनुभवांना किंमत नाही अशी भावना झाली की कर्मचारी कामातून अंग काढून घेतात. त्यांचा कामातील रस उणावतो. फक्त पगाराची वाट बघत ते काम करीत असतात.

**(६) नातेबंध विकसित होऊ न देणे-** माणसांना कामात गुंतवणूक करण्याचे स्वातंत्र्य नाकारल्यास त्यांचे कोणाशीच नाते विकसित होत नाही. एकाकीपणाची भावना वाढीस लागते, आपल्याला टाळले जातेय, विभागात /संस्थेत गटबाजी किंवा राजकारण असले कि कर्मचारी अलिप्त होत जातात. आपले यशापयश सहकाऱ्यांना सांगण्यात मिळणारे आनंद लुटण्यापासून जर परावृत्त केले जात असेल तर पद कितीही मोठे असो वा वेतन कितीही अधिक असो, संस्थेत माणसे एकाकी पडत जातात.

**(७) शारीरिक, मानसिक जोखीमीची कामे सोपविणे-** विनाकारण जोखीम अंगावर घेणे, अपघातांच्या शक्यता असलेल्या जागेवर काम करणे, सुरक्षिततेची हमी नसल्याने काम करताना कायम धोक्याची जाणीव होत राहणे अशा अवस्थेत कामात अर्थ काय उरणार? सैनिकांना पराकोटीच्या वातावरणात आवश्यक ती वस्त्रेही उपलब्ध करून न देणे आणि त्यांना सीमेचे रक्षण करण्यास सांगणे हेच क्रूर वागणुकीचे प्रतीक आहे. ही विघातक कारणे कामाला अर्थहीन ठरविण्यास जबाबदार असतात. अशावेळी काम अर्थपूर्ण, आनंददायी की अर्थशून्य, निरर्थक हे ठरविण्याचा अधिकार तरी संबंधितांना असायलाच हवा, नाही कां?

---

# ओझोनमुळे कोंडला महानगरांचा श्वास

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे



**'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट'च्या माहितीनुसार २०२५ च्या हंगामात प्रमुख महानगरांमध्ये जमिनीजवळील ओझोन प्रदूषण लक्षणीयरीत्या वाढले. कोलकाता, बंगळुरू, मुंबई, हैदराबाद आणि चेन्नईमध्ये सरासरी आठ तासांच्या कालावधीसाठी ओझोन पातळी मानकांपेक्षा जास्त दिवस अधिक नोंदवली. एकाच वेळी अनेक प्रदूषकांच्या आव्हानामुळे लहान मुलांसह नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.**

'एअर क्वालिटी ट्रॅकर' उपक्रमांतर्गत 'सीएसई'च्या अर्बन लॅबने केलेल्या नवीनतम वायू गुणवत्ता विश्लेषणात आढळून आले की, प्राथमिक प्रदूषकांच्या विपरीत ओझोन थेट स्रोतातून उत्सर्जित होत नाही. वाहने, वीज प्रकल्प, कारखाने आणि इतर ज्वलनशीलस्रोतांमधून उत्सर्जित होणारे नायट्रोजन ऑक्साईड (एनओएक्स), अस्थिर सेंद्रिय संयुगे आणि कार्बन मोनो ऑक्साईड यांच्या सूर्यप्रकाशात होणाऱ्या प्रतिक्रियांमधून हा वायू तयार होतो. पृष्ठभागावरील ओझोन शहरी भागातच साचत नाही, तर ते लांब अंतरावर पसरू शकते आणि प्रादेशिक प्रदूषक बनू शकते. त्याचा कृषी उत्पादकतेवरही परिणाम होतो. त्यामुळे अन्नसुरक्षेला धोका निर्माण होतो. 'सीएसई'च्या स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या कार्यकारी संचालक आणि प्रमुख अनुमिता रॉय चौधरी म्हणतात की, नियंत्रण ठेवले नाही, तर हे एक गंभीर सार्वजनिक आरोग्य संकट बनू शकते. कारण ओझोन हा एक अत्यंत प्रतिक्रियाशील वायू आहे आणि अल्पकालीन संपर्कातदेखील मानवासाठी हानिकारक असू शकतो.

ओझोनचे निरीक्षण आणि नियंत्रण विद्यमान धोरणांमध्ये समाविष्ट करणे आणि या वायूच्या अतिरेकी संपर्कापासून लोकांना वाचवण्यासाठी त्वरित पावले उचलणे महत्त्वाचे आहे. उत्तर भारतातील शहरांमध्ये उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे आणि तेजस्वी सूर्यप्रकाशामुळे ओझोनची पातळी वाढते; परंतु उष्ण हवामान असलेल्या शहरांमध्ये, इतर ऋतूंमध्ये हिवाळा आणि वसंत ऋतूमध्येही हा अतिरेक सातत्याने दिसून येतो. ओझोन नियंत्रणासाठी वाहने, उद्योग आणि सर्व प्रकारच्या ज्वलन स्रोतांद्वारे उत्सर्जितहोणाऱ्या अनेक वायूंवर कठोर नियंत्रण आवश्यक आहे.

'सीएसई अर्बन लॅब'मधील उपकार्यक्रम व्यवस्थापक शरणजीत कौर म्हणतात, ''पुरेशा देखरेखीचा अभाव, मर्यादित डेटा आणि अपुऱ्या विश्लेषणात्मक पद्धतींमुळे भारतातील शहरांमध्ये वाढत्या धोक्याची समज कमी होत आहे. केवळ शहरव्यापी सरासरीवर अवलंबून राहणे सहसा हवेच्या गुणवत्तेच्या निर्देशांकाचा (एक्यूआय) अंदाज लावण्यासाठी मानक प्रक्रिया असते. ओझोनचे स्थानिक प्रमाण आणि लोकांच्या थेट संपर्कात येणारी ठिकाणे ओळखणे महत्त्वाचे आहे आणि त्यानुसार नियंत्रण धोरणे तयार करणे आवश्यक आहे.'' 'सीएसई'च्या पुनरावलोकनात असेही आढळून आले की, पृष्ठभागावरील (जमिनीलगत आढळणारे) ओझोन श्वसनमार्गात जळजळ निर्माण करते. यातून संसर्ग होण्याची शक्यता वाढू शकते. त्यामुळे दमा, क्रॉनिक ब्राँकायटिस आणि एम्फिसीमासारखे श्वसन रोग होऊ शकतात. मुले, वृद्ध आणि अविकसित फुफ्फुसे असलेले लोक जास्त असुरक्षित असतात. ओझोनच्या संपर्कात आल्याने वारंवार दम्याचे झटके येतात. ओझोन हा अतिशय जलद प्रतिक्रिया देणारा वायू असल्याने मोजणीसाठी २४ तासांऐवजी ८ तासांची सरासरी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. हे मूल्यांकन २०२२ ते २०२५ दरम्यान करण्यात आले. ते केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) वेबसाईटवर उपलब्ध आहे. वातावरणीय हवा गुणवत्ता देखरेख प्रणाली अंतर्गत मुंबई (३१ स्टेशन्स), कोलकाता- हावडा (१२), बंगळुरू (१४), हैदराबाद (१४) आणि चेन्नई (९) मधील एकूण ८० अधिकृत स्थानकांवरून सतत डेटा संकलित केला गेला.

पृष्ठभागावरील ओझोन प्रदूषण अत्यंत परिवर्तनशील आणि स्थानिक आहे आणि ते ठिकाणानुसार बदलते. ओझोन निर्मिती जटिल रासायनिक प्रक्रिया आणि प्रकाश-रासायनिक अभिक्रियांवर अवलंबून असते. त्यामुळे त्याची पातळी वेळ आणि स्थानानुसार बदलते. सूर्यप्रकाश, उष्ण हवामान आणि स्थिर वारे त्याच्या निर्मितीमध्ये भूमिका बजावतात. या अभ्यासात महानगरातील प्रत्येक स्थानकावर मानक ओलांडले गेलेल्या दिवसांचा मागोवा घेतला गेला. शहरातील एका स्थानकानेदेखील मानक ओलांडले, तर ते त्या शहरासाठी 'मानक उल्लंघन' मानले जाते. एकाच दिवशी अनेक स्थानके मानक ओलांडली तर ते प्रदूषण किती मोठ्या प्रमाणात पसरले आहे आणि किती लोक प्रभावित होत आहेत हे सांगते. या अभ्यासात आंतरराष्ट्रीय मानकांनुसार 'यूएस ईपीए'ची पद्धत स्वीकारण्यात आली आहे. याअंतर्गत दिवसाच्या प्रत्येक आठ तासांच्या सरासरी ओझोन पातळीची गणना केली जाते. त्यापैकी सर्वोच्च मूल्य त्या दिवसाची ओझोन पातळी मानले जाते.

'यूएस ईपीए'नुसार शहर किंवा प्रदेशाचा 'एक्यूआय' त्या दिवशी सर्व स्थानकांवर नोंदविलेल्या सर्वोच्च मूल्याच्या आधारे निश्चित केला जातो. यंदाच्या उन्हाळ्यात १ मार्च ते ३१ मे दरम्यान मुंबईत ९२ पैकी ३२ दिवस ओझोनचे उल्लंघन नोंदविले गेले. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत हे ४२ टक्के घट दर्शवते. २९ मार्च हा सर्वात वाईट दिवस ठरला. या दिवशी शहरातील ३१ पैकी ८ निरीक्षण केंद्रांनी ओझोनची पातळी प्रमाणापेक्षा जास्त नोंदवली. या कालावधीत मुंबईत चकाला येथे प्रादेशिक कमाल पृष्ठभागावरील ओझोन सांद्रता ९० मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतकी होती. तिथे मार्च ते मे दरम्यान २९ दिवस ओझोन मानकांचे उल्लंघन झाले. त्यानंतर भायखळा आणि खेरवाडी येथे जादा उल्लंघन झाले. पृष्ठभागावरील ओझोनचे वितरण सामान्यतः

नायट्रोजन डाय ऑक्साईड (एनओ) सह उलट संबंध दर्शवते. विशेषतः जास्त रहदारी असलेल्या भागात नायट्रोजन ऑक्सिजनची पातळी जास्त असते, तिथे ओझोनची निर्मिती बहुतेकदा कमी असते. कारण ओझोन 'नायट्रिक ऑक्साईड'शी प्रतिक्रिया देतो आणि विरघळतो. शहराच्या वेगवेगळ्या भागात ओझोनची पातळी विविध घटकांमुळे बदलते; जसे की इतर प्रदूषकांचे परिणाम, हवामान आणि उत्सर्जन स्रोत. मे २०२५ ची तुलना मे २०२४ शी केल्यास पृष्ठभागावरील ओझोन सूर्यास्तानंतर जास्त काळ वातावरणात राहतो, असे आढळते. तथापि, २०२५ च्या उन्हाळ्यात सरासरी तासाला कमाल ओझोन सांद्रता मागील वर्षाच्या तुलनेत ३५ टक्के कमी होती, जी वातावरणातील रसायनशास्त्रात बदल किंवा ओझोन तयार करणाऱ्या पूर्वसूचक प्रदूषकांच्या उत्सर्जनात घट दर्शवते.

दैनंदिन ट्रेंड दर्शवतात की सकाळी आणि संध्याकाळी नायट्रोजन ऑक्सिजनची पातळी जास्त असते, तेव्हा ते ओझोनला निष्क्रिय करण्यास आणि विखुरण्यास मदत करते; परंतु नायट्रोजन ऑक्सिजनची पातळी तुलनेने कमी असते तेव्हा दुपारी किंवा कमी गर्दीच्या वेळेत ओझोनची पातळी वाढते. मुंबईत हिवाळ्यात (डिसेंबर ते फेब्रुवारी) पृष्ठभागावरील ओझोन पातळी जास्त असते. २०२४-२५ च्या हिवाळ्यात शहरात ८७ दिवसांसाठी ओझोन पातळी प्रमाणापेक्षा जास्त होती. गेल्या वर्षीच्या हिवाळ्याच्या तुलनेत त्यात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. कोलकातामध्ये ९२ पैकी सुमारे २२ दिवस ओझोन पातळी प्रमाणापेक्षा जास्त होती. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तुलनेत हे ४५ टक्के घट दर्शवते. या उन्हाळ्यात सरासरी तासिक ओझोन कमाल पातळीदेखील २२ टक्क्यांनी कमी झाली. हे एकूण सुधारणा दर्शवते. कोलकातामध्ये हिवाळ्यात (नोव्हेंबर ते फेब्रुवारी) आणि मान्सूनपूर्व हंगामात पृष्ठभागावरील ओझोन सांद्रता सातत्याने जास्त नोंदविली गेली. ही प्रवृत्ती वातावरणीय परिस्थिती, तुलनेने उष्ण हवामान, फोटो-रासायनिक अभिक्रिया आणि उत्सर्जन पातळीमुळे आहे. या वर्षी १ मार्च ते ३१ मे या कालावधीत ९२ पैकी ४५ दिवसांसाठी बंगळुरूमध्ये ओझोनची पातळी हवेच्या गुणवत्तेच्या मानकांपेक्षा जास्त होती.


गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तुलनेत ही २९ टक्के वाढ आहे. मार्च ते मे २०२५ दरम्यान ३१ दिवसांसाठी ओझोनची पातळी मानकांपेक्षा जास्त होती. हैदराबादमधील हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण केंद्रांनी या वर्षी १ मार्च ते ३१ मे दरम्यान सामान्य ओझोन पातळीपेक्षा २० दिवस जास्त नोंदविले. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही ५५ टक्के घट आहे. बोलारम हे हैदराबादमधील सर्वात जास्त प्रभावित क्षेत्र आहे, जिथे मार्च ते मे दरम्यान १७ दिवस सामान्य ओझोन पातळीपेक्षा जास्त होते. १ मार्च ते ३१ मे या काळात चेन्नईमध्ये ९२ पैकी १५ दिवस ओझोनची पातळी मानकांपेक्षा जास्त नोंदविली गेली, असे शहराच्या हवा गुणवत्ता निरीक्षण केंद्रांच्या आकडेवारीवरून दिसून येते.

२०२३ च्या उन्हाळ्यात तीन दिवस आणि २०२२ मध्ये १९ दिवस ओझोनचे उल्लंघन नोंदविले गेले. अलंदूर हे चेन्नईमधील सर्वात जास्त प्रभावित क्षेत्र आहे. मार्च ते मे दरम्यान येथे १५ दिवस मानकांपेक्षा जास्त पातळी नोंदविली गेली. शहरातील इतर स्थानकांवर कोणतेही उल्लंघन नोंदवले गेले नाही. सध्या भारतातील मोठी शहरे प्रदूषणाच्या झळा सोसत आहेत. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक)

समाजभान

संदीप वाकचौरे

# संवाद हाच उपाय...



**विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही देशासमोरची एक मोठीच समस्या आहे. या समस्येचे गांभीर्य फार मोठे आहे. या समस्येच्या निराकरणासाठी विद्यार्थी आत्महत्या का करतात? त्याच्या कारणांचा शोध घेणे आवश्यक ठरते. या समस्येची दखल सर्वोच्च न्यायालयानेही घेऊन काही निर्देश दिले आहेत. त्यामध्ये काही उपाययोजनाही सूचवल्या आहेत. त्याचा घेतलेला आढावा...**

देशभरात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी उंचावते आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या ही त्यांची वैयक्तिक चूक नसून, ही संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी आहे हे लक्षात घेण्याची वेळ आली आहे. वर्तमानात विद्यार्थ्यांची आत्महत्या झाली की, केवळ हळहळ व्यक्त केली जाते. मात्र, आता विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांवर व्यवस्थेनेच मार्ग काढण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन, महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. त्यामध्ये शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष न करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या मनावरचा अभ्यासाबरोबर असलेला इतर प्रकारचा तणावही हलका करणे, त्यांना सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण प्रदान करणे, हेच शिक्षण संस्थांचे मुख्य कार्यक्षमता निर्देशक असले पाहिजे. मुळात अभ्यासक्रम पूर्ण करणे, परीक्षा जाहीर करणे, परीक्षा नियंत्रित करणे, निकाल जाहीर करणे एवढीच शिक्षण संस्थांची जबाबदारी नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास, विद्यार्थ्यांसाठी अधिक निरोगी आणि प्रेरणादायी शैक्षणिक भविष्य घडवता येईल. एक निरोगी समाजाच्या निर्मितीच्या दृष्टीने, या निर्देशांकडे आपण गांभीर्याने पाहायला हवे. या निर्देशांमुळे विद्यार्थ्यांना भावनिक आणि मानसिक स्तरावरही पाठिंबा मिळेल. यामुळे विद्यार्थी जीवनातील आव्हानांना अधिक आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास मदत होणार आहे. या निर्देशांची किती प्रभावी अंमबजावणी होते, त्यावरच आत्महत्येचा आलेख खालावण्याची शक्यता आहे.विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या मुळाशी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक वातावरणाचादेखील परिणाम आहे. या वातावरणातही बदल घडवण्याची जबाबदारी सर्वांची असून, सर्वांनाच ती पेलावी लागणार आहे.

देशातील शिक्षण संस्था, शिकवणी वर्गांसाठी सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण सूचना केल्या असून, त्यांची अंमलबजावणी होण्याची नितांत आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या या आपल्या शिक्षण व्यवस्थेसमोरील सर्वांत मोठे आव्हान बनू पाहते आहे. अशावेळी त्या समस्येवर मात करण्यासाठी आजच उपाययोजना केल्या नाहीत, तर उद्याचे भविष्य अधिक अंधकारमय होण्याची भिती आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमागील कारणांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचा विचार केला, तर ही समस्या संपवण्याच्या दृष्टीचे काही पावलांचा विचार त्यात करण्यात अला आहे. न्यायालय जेव्हा या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहते, तेव्हा सर्वांनीच या प्रश्नांच्या संदर्भाने अधिक खोलवर जाऊन विचार करायला हवा.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशात म्हटले आहे की, आत्महत्या नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने सल्लामसलत केंद्रांच्या उभारणीची गरज आहे. शाळा, महाविद्यालय, शिकवणी संस्थांनी आठवड्याचे सर्व दिवस आणि २४ तास ही सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. यासाठी हेल्पलाईन क्रमांक किंवा चॅट सपोर्ट व्यवस्था उभी असावी, असेही म्हटले आहे. अर्थात ती सेवा उभारणे बंधनकारकच आहे. अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करून दिली, तर विद्यार्थी कोणत्याही वेळी आपली समस्या मांडू शकतील. अशावेळी तत्काळ समुपदेशन व मानसिक आधार मिळाला, तर विद्यार्थी मनावर असलेल्या ताण-तणावातून मुक्त होऊ शकतील. अशावेळी आधार मिळाला, तर विद्यार्थी आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त होऊ शकतील. खरंतर वर्तमानात केवळ विद्यार्थ्यांपुरता हा विचार प्रतिपादित करण्यात आला असला, तरी सर्वच नागरिकांसाठी अशा सार्वजनिक सुविधेच्या उपलब्धतेचा विचार करण्याची गरज आहे. आजवर आपल्या देशात प्रत्येक गावात उत्तम दर्जाचे डॉक्टरही उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. अशावेळी मानसिक विकारावर मात करण्यासाठी अशी उच्चशिक्षित, प्रशिक्षित व्यवस्था उभी करणे कठीण आहे. गेल्या काही वर्षांत समाजातील संवाद हरवला आहे. तसेच तो कुटुंबातीलदेखील हरवला आहे. एकीकडे प्रत्यक्ष संवाद हरवत असताना, दुसरीकडे आभासी संवादात सातत्याने भर पडते आहे. चार माणसं एकत्र आली, तर हातात मोबाईल घेऊन आभासी संवाद करतात आणि समोर बसलेली माणसं संवादाच्या प्रतीक्षेत असतात. माणसं आभासी संवादाच्या मागे का धावत आहेत? याचाही शोध घेण्याची गरज आहे.



आपले जीवन संवादमुक्त होत चालले आहे. संवादमुक्त जीवनामुळे, ताण- तणावात भर पडते आहे. तसेच स्क्रिन टाईमही वाढतो आहे. त्यातूनच मानसिक आरोग्यावरदेखील विपरीत परिणाम होतो. त्यातून विद्यार्थ्यांची विचार प्रवृत्ती अधिकाधिक नकारात्मक होत जाते. त्यामुळेच आत्महत्येची वाट चालणे घडते. मुळात संवाद वाढला, तर मुलांची मने हलकी होण्याची शक्यता आहे. आज वर्तमानात पालक मुलांना हवे ते घेऊन देतात. मात्र, मुलांना 'क्वॉलिटी टाईम' देण्याची आज अधिक गरज आहे. आज पालक पाल्यांवर भौतिक सुखाचा मारा करीत असले, तरी मनाची भूक भागवण्यासाठी संवादाचे महत्त्व फार मोठे आहे. त्याचदृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशातही, संवादाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. खरेतर मुलांच्या मनात अनेक प्रश्न असतात; पण त्यांची उत्तरे मिळण्याची कोणतीच व्यवस्था सध्या उपलब्ध नाही. शाळा, महाविद्यालयात तासापुरताच संवाद होतो, अर्थात तोही अनेकदा एकेरीच.

मुळात त्याला संवाद का म्हणायचे? हाही प्रश्नच आहे. संवाद नसल्यामुळे शिक्षक-विद्यार्थी यांच्या नात्याची वीण घट्ट होताना दिसत नाही. संवादाचीच अधिक गरज असते. तो मनासारखा होण्यासाठी, शाळा-महाविद्यालयांमध्ये सुविधांची अधिक गरज आहे. आज शिक्षणाची मंदिरे नाही, तर दुकाने झाली असल्याने, तेथेही एकमेकाला समजून घेणारी नात्याची वीण फारशी वीणलेली दिसत नाही. त्यामुळे अधिकाधिक संवादाची गरज आहे. गेली अनेक वर्षे मानसशास्त्रज्ञ याबद्दल बोलत आहेत. मात्र, त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामुळे संवादाची भूक भागली जाईल, अशा उपक्रमांचा शोध शाळा-महाविद्यालयीन पातळीवर घेण्याची गरज आहे. अलीकडे वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी, शाळेच्या वेळापत्रकात वाचन तासिकेचा विचार केला जाऊ लागला आहे. त्याप्रमाणे संवाद तासिकेचीदेखील गरज निर्माण झाली आहे. घरात आईबाबा आहेत; पण ते दोघेही नोकरीच्या निमित्ताने घराच्या बाहेर असतात. विद्यार्थीशी शाळा- महाविद्यालय सुटल्यानंतर संवादा साधायला कोणीच नसते. रात्री पालक थकून आल्याने संवाद होत असला, तरी त्यातील आत्मा हरवलेला असतो.

शाळेत शिक्षकांना तासिका पूर्ण करून अभ्यासक्रम पूर्ण करायचा असतो. मुलाला गुण हवे असतात, शाळेला निकाल हवा असतो. पालकांना अपेक्षित प्रतिष्ठित अभ्यासक्रमाच्या पदवीला प्रवेश हवा असतो. त्यामुळे शाळा- महाविद्यालयात शिक्षक एकेरी संवादाची वाहतूक सुरू ठेवणेच पसंत करतात. त्यामुळे हे सर्व गतीने करता येते मात्र, संवादाची एकेरी वाहतूक गेली काही वर्षे सातत्याने वाढते आहे. त्यातून संवादाची वाट अधिकाधिक अरुंद होत चालली आहे. घरी संवाद नाही आणि शाळा-महाविद्यालयातही संवादाच्या वाटा नाही. गुणांच्या वाढत्या स्पर्धेमुळे मित्रांशी संवाद नाही. शाळा-महाविद्यालय, शिकवणी यातच विद्यार्थ्यांचा दिवस संपतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनावर परिणाम करणारे, आनंद मिळून देणाऱ्या संवादाच्या वाटा सर्वच बाजूने, संकुचित होत चालल्या आहेत. या वाटा रुंदावण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचा गंभीरतेने विचार करण्याची आवश्यक आहे. पाल्यांना पैसा, साधने नको आहेत, तर त्यांना फक्त आईबाबांचा सहवास हवा असतो. तो सहवास संवादाची भूक भागवेल यात शंका नाही.

# पाळणा, पैसा आणि प्रतिष्ठा



जीवाचे मोल ते काय, असे म्हटले जाते खरे. पण, चीनमध्ये एका जीवाचे मोल आहे चक्क ३ हजार, ६०० युवान अर्थात ४३ हजार, ९४९ भारतीय रुपये! ऐकून कदाचित धक्काही बसेल, पण चीनमध्ये दाम्पत्यांनी मुलं जन्माला घालावी, म्हणून सरकारने जाहीर केलेली ही वार्षिक सबसिडी. ते मूल तीन वर्षांचे होईपर्यंत, सरकारी तिजोरीतून थेट पालकांच्या खात्यावर ही रक्कम जमा केली जाईल. त्यामुळे कोणे एकेकाळी 'एक अपत्य धोरण' सक्तीने राबविणाऱ्या चीनवर आज मुलं जन्माला घालण्यासाठी नागरिकांना पैशांचे आमिष देण्याची अशी वेळ का ओढवली, हे समजून घ्यावे लागेल.

कम्युनिस्ट विचारांच्या चीनने ७०च्या दशकाअखेरीस एक अब्ज लोकसंख्येचा टप्पा ओलांडला. तो काळ चीनच्या औद्योगिक विकासाचा, राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा असा ऐन भरभराटीचा होता. पण, लोकसंख्यावाढीमुळे औद्योगिक प्रगतीचा वेग मंदावता कामा नये, या बाजारू विचाराने चिनी नेते डेंग झिओपेंग यांनी 'एक अपत्य धोरण' जाहीर केले. चीनला भांडवलशाहीकडे नेण्याचे श्रेय हे झिओपेंग यांनाच दिले जाते. त्यांनी 'एक अपत्य धोरणा'ची अमानुषपणे अंमलबजावणी केली. घरोघरी जाऊन बळजबरी गर्भपातापासून ते नसबंदीपर्यंत, चिनी सरकारने ही मोहीम क्रूरपणे राबविली. या धोरणामुळे चीनला अल्पकालीन अपेक्षित आर्थिक लाभ पदरात पाडता आला असला, तरी कालांतराने त्याचे दुष्परिणामही समोर आले. बिघडलेले लिंगगुणोत्तर, पुरुषांची वाढलेली संख्या, अर्थव्यवस्थेवर ताण निर्माण करणारी वाढलेली ज्येष्ठांची संख्या आणि एक अपत्यामुळे निर्माण होणाऱ्या कौटुंबिक-मानसशास्त्रीय समस्यांनी चीनला पुरते ग्रासले. परंतु, तब्बल ३० वर्षांनंतर म्हणजे २०१६ साली 'एक अपत्य धोरणा'ला अखेरीस जिनपिंग सरकारने तिलांजली देण्याचा निर्णय घेतला. पण, त्यानंतरही चीनमधील जन्मदर अपेक्षेप्रमाणे न वाढल्याने, आता चीन सरकारने यासाठी थेट आर्थिक मदतीचा मार्ग अवलंबलेला दिसतो.

गेल्या वर्षभरात चीनमध्ये ९.५४ दशलक्ष बालकांचा जन्म झाला. हे प्रमाण २०१६ म्हणजे ज्या वर्षी 'एक अपत्य धोरण' रद्द करण्यात आले, त्या वर्षीच्या तुलनेत निम्मे आहे. दुसरीकडे २०२४च्या आकडेवारीनुसार, चीनमध्ये ६० वर्षांवरील ज्येष्ठांची संख्या ही जवळपास ३१० दशलक्ष इतकी आहे. त्यामुळे चीनसाठी साहजिकच ही अनुत्पादक लोकसंख्या केवळ सरकारी तिजोरीवर बोजा वाढवणारी ठरली. इतकेच नाही, तर चीनमधील तरुणांचे लग्नाचे प्रमाणही लक्षणीयरित्या घटलेले दिसते. एकूणच राहणीमानाचा वाढता खर्च, रोजगाराची अनिश्चितता, दीर्घकाळ कामाचे तास यामुळे चिनी तरुण-तरुणी विवाहापासून चार हात लांबच राहणे पसंत करतात.

चीन सरकारकडून २०१६ साली दोन मुलांना जन्म देण्याची परवानगी ही २०२१ साली तीन मुलांपर्यंतही वाढवण्यात आली. पण, त्यानंतरही चीनमध्ये जन्मदर वधारलेला नाही. परिणामी, २०२३ साली चीनलाही मागे टाकत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश ठरला. आज एकटा चीनच नव्हे, तर जपान, द. कोरिया, सिंगापूर यांसारखे देशही वर्षागणिक घटणाऱ्या जन्मदरामुळे चिंताग्रस्त आहेत. या समस्येचा केवळ पैशांच्या तराजूत नाही, तर तेथील सरकारला, धोरणनिर्मात्यांना कौटुंबिक, सामाजिक मूल्य-संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धनाच्या पातळीवरही तितकाच गांभीर्याने आणि दूरगामी विचार करावा लागेल, हे निश्चित!

विजय कुलकर्णी

क्रिडांगण

मधुरा कुलकर्णी

# बुद्धिबळामध्ये मराठमोळी राणी

**भारताचा डी. मुकेश बुद्धिबळामध्ये जगज्जेता झाल्यावर आता दिव्या देशमुखच्या रूपाने पहिल्या भारतीय बुद्धिबळपटू महिलेने जगज्जेती होण्याचा बहुमान मिळवला आहे. जॉर्जिया येथे झालेल्या स्पर्धेत फिडे महिला बुद्धिबळ विश्वकरंडकावर तिने आपले नाव कोरण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडूंविरुद्ध मिळवलेल्या यशाबद्दल तिचे देशभरातून अभिनंदन आणि कौतुक केले जात आहे.**



अखेर चाहते तीन दिवस प्राण डोळ्यात आणून वाट पहात असलेली बातमी आली! दिव्या देशमुखने थेट जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात कोनेरू हम्पीवर आघाडी घेत टायब्रेकरमध्ये सामना जिंकला. त्यानंतर भारतात, विशेषत: महाराष्ट्रात एक मराठमोळी कन्या जगज्जेती बनल्यामुळे जल्लोष सुरू झाला.

२६ जुलै रोजी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात एकमेकींशी भिडणाऱ्या कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख या दोघीही भारतीय असल्यामुळे हा सामना 'ऑल-इंडियन फायनल' झाला. सामन्याच्या पहिल्या डावामध्ये कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख या दोघींनीही बरोबरी साधली होती. या गेममध्ये दडपणाखालीही संयम आणि आक्रमकतेचा मेळ साधत दिव्या देशमुखने पांढऱ्या मोहऱ्यांनी सुरुवात केली आणि चांगली कामगिरी बजावली. पण हम्पीने चांगली लढत दिली आणि दोघींमध्ये बरोबरी झाली.

पुढे त्यांच्यातील दुसरा डाव अतिरिक्त दिवसात गेल्यानंतर संघर्ष आणखी तीव्र झाला. दिव्याने काळ्या मोहऱ्यांसह खेळतानाही हम्पीवर वर्चस्व गाजवण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी तिने केलेल्या निर्णायक चाली अचूक होत्या. आपली प्रतिस्पर्धी काही चूक करते का, याकडे दोघींचे पूर्ण लक्ष होते. पण दोघींनी संयमी खेळ करत अंतिम सामन्यातील दुसरा डावदेखील अनिर्णीत ठेवल्यामुळे सामना निर्णायक टायब्रेकरमध्ये गेला.

२८ जुलै २०२५ रोजी महिला बुद्धिबळ विश्वचषक फायनलच्या तिसऱ्या दिवशी झालेल्या टायब्रेकरमध्ये मात्र दिव्या देशमुखने १.५ - ०.५ असा विजय मिळवून विश्वचषक हस्तगत केला आणि देशभर जोरदार कौतुक सुरू झाले. दिव्याने याआधी २०२४ मध्ये ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान मिळवला होता.

आता एका वर्षातच तिने वरिष्ठ गटात सर्वोच्च शिखर गाठले. तिचा हा विजय केवळ एक महत्त्वपूर्ण टप्पा नव्हे तर, तिचा आत्मविश्वास आणि सामर्थ्यदेखील सिद्ध करतो. महाराष्ट्राची १९ वर्षीय मराठमोळी युवा खेळाडू दिव्या देशमुख आणि आंध्र प्रदेशची कोनेरू हम्पी यांच्यातील बाटुमी (जॉर्जिया) येथे पार पडलेल्या महिला बुद्धिबळ विश्वकरंडक स्पर्धेचा अंतिम सामना अपेक्षेप्रमाणे रंगतदार झाला. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत विश्वविजेतेपद मिळवण्याची ऐतिहासिक संधी दोन्ही महिला खेळाडूंना मिळाली होती, तेव्हाच त्यांच्यातल्या सामन्यानंतर भारताचीच खेळाडू या स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करेल, हे निश्चित झाले होते.

महिलांच्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत २१ जुलै हा दिवस भारतासाठी दुहेरी पराक्रमाचा ठरला. या दिवशी नागपूरची दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांनी बुद्धिबळात भारतीय महिलाही कमी नसल्याचे दाखवून दिले होते. १९ वर्षीय दिव्या आणि ३८ वर्षीय हम्पी यांनी जॉर्जिया येथे सुरू असलेल्या महिलांच्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेची उपांत्य फेरी प्रथमच गाठली होती.

विश्वकरंडक बुद्धिबळाचा अंतिम सामना सलग तीन दिवस चालला. दोन प्रतिस्पर्धीपैकी वयाने निम्मी आणि अनुभवाने कमी असलेल्या मराठमोळ्या दिव्या देशमुखाने या स्पर्धेदरम्यान अव्वल दहापैकी तिघींना पराभूत करण्याची किमया दाखवली होती.

गेल्या दोन वर्षांमध्ये भारतीय बुद्धिबळपटूंनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. भारतातर्फे प्रथमच दोन महिला खेळाडूंनी विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक मारण्याची किमया साधली होती. त्यांच्या या कामगिरीचे संपूर्ण देशभरातून अभिनंदन आणि कौतुक केले गेले.

भारतातील बुद्धिबळप्रेमी आणि पाठीराखे या दोघींच्या नेत्रदीपक यशाने सुखावले. या स्पर्धेच्या विजेतेपदाचे पन्नास हजार डॉलर्सचे पारितोषिक दिव्या देशमुखला तर उपविजेत्याचे ३५ हजार डॉलर्सचे पारितोषिक कोनेरू हम्पीला अशी दोन्ही पारितोषिके भारतीय खेळाडूंनाच मिळाली. महिला विश्वचषक स्पर्धेतील अव्वल तीन खेळाडू (विजेती, उपविजेती, तिसऱ्या क्रमांकावरील) पुढील वर्षी होणाऱ्या कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत. कँडिडेट्स स्पर्धेतील विजेता मग जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीत गतविजेतीशी दोन हात करेल. दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांनी अनुक्रमे विजेते आणि उपविजेतेपद जिंकल्यामुळे कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत.

२०२६ च्या एप्रिलमध्ये ही कँडिडेट्स स्पर्धा होईल. त्यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या काळात महिलांची जागतिक बुद्धिबळ लढत रंगेल. दिव्या ९ डिसेंबर २००५ रोजी नागपूरमध्ये जन्मलेली बुद्धिबळपटू आहे, जिला महिला ग्रॅण्डमास्टर आणि आंतरराष्ट्रीय मास्टर ही पदवी मिळाली आहे. ती सध्या महिला बुद्धिबळपटूंमध्ये जगात अठराव्या क्रमांकावर असून तिचे रेटिंग २४६३ आहे. भारतीय महिला बुद्धिबळपटूंमध्ये ती चौथ्या क्रमांकावर आहे. जुलै २०२५ मध्ये तिने २५०१ चे सर्वोच्च रेटिंग मिळवले.

सर्वोच्च रेटिंगच्या वेळी ती १८ वर्षांची होती. उपांत्य फेरीच्या अटीतटीच्या रोमहर्षक सामन्यात तिने चीनच्या टॅन झोनग्यीवर १०१ चालीनंतर १.५ विरूद्ध ०.५ अशा फरकाने विजय मिळवला होता. टॅन झोनग्यीवरील विजयाच्या निमित्ताने या स्पर्धे दरम्यान दिव्याने दुसऱ्या चिनी खेळाडूवर विजय मिळवला.

या स्पर्धेतील सुरुवातीच्या काही चालींनंतर पराभव होईल असे वाटत असताना, तिने खेळावर आश्चर्यकारक वर्चस्व निर्माण करत उल्लेखनीय खेळाचे प्रदर्शन घडवले. या दोन्ही खेळाडूंकडून संपूर्ण सामन्या दरम्यान ारंवार चुका घडल्या. पण एक वेळ त्यातून सावरत दिव्या खऱ्या अर्थाने मोठ्या 'दिव्या'तून पार झाली होती. या विजयाबरोबर स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्याबरोबरच ती २०२६ मध्ये होणाऱ्या कँडिडेट्स स्पर्धेसाठीही पात्र ठरली होती.

नेत्रदीपक यश म्हणावे लागेल. दिव्या देशमुखची कामगिरी लक्षवेधी आणि अतुलनीय ठरते. वयाने सर्वांत लहान असूनही तिने आपल्यापेक्षा वरचे मानांकन असलेल्या बुद्धिबळपटूंना पराभूत केले. आक्रमक शैलीतला खेळ, उचित निर्णयक्षमता आणि निडरपणा यासारख्या गुणांमुळेच ती जगज्जेतेपदासाठी प्रबळ दावेदार ठरली. अंतिम सामन्यात उपविजेती ठरलेली कोनेरू हम्पी तेलुगू बुद्धिबळ खेळाडू आहे. जानेवारी २०१० मध्ये तिचे फिडे एलो मानांकन २६१४ झाले. त्यावेळी जागतिक क्रमवारीत स्थान मिळवणाऱ्या महिलांमध्ये ज्युडिट पोल्गारनंतर ती दुसऱ्या क्रमांकावर होती. ज्युडिट पोल्गारनंतर २६०० एलो गुणांचा टप्पा ओलांडणारी ती जगातील दुसरी महिला ठरली.

गेल्या काही वर्षांपासून बुद्धिबळात सातत्याने भारताचा तिरंगा फडकवण्यात मोलाची कामगिरी तिने बजावली आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात तिने चीनच्या अव्वल मानांकित लेई टिंगजीएचा ट्रायब्रेकरमध्ये ५-३ असा पराभव केला. त्यापूर्वी दोघींमध्ये झालेले टायब्रेकरचे दोन्ही सामने बरोबरीत सुटले होते. टायब्रेकरमध्ये १५ मिनिटांचे दोन गेम अतिरिक्त वेळेसह खेळले जातात. त्यानंतर पुढील दोन टायब्रेकर गेम प्रत्येकी दहा मिनिटांचे असतात. पहिला डाव हम्पीने तर दुसरा टिंगजीएने जिंकला होता. कोनेरू हम्पी सांगते, सुरुवातीला काळ्या मोहऱ्या घेऊन खेळताना आपल्याकडून खूपच वाईट खेळ झाला, पण त्या दडपणातून वेळीच सावरत आपण पुनरागमन केले.

अव्वल मानांकित खेळाडूविरुद्ध उपांत्य सामना जिंकल्याने अंतिम लढतीसाठी कोनेरू हम्पीला जास्त संधी होती, मात्र दिव्याने आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवत विजेतेपद खेचून आणले. स्पर्धेच्या अंतिम फेरीत ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पीचा पराभव करत दिव्या महिला विश्वचषक विजेती बनली. यासोबतच तिने आपला ग्रॅण्डमास्टर नॉर्म पूर्ण केला असून आता ती भारताची चौथी महिला ग्रॅण्डमास्टर झाली आहे.

वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी दिव्याने हे यश संपादन केले आहे. दिव्याच्या या नेत्रदीपक कामगिरीनंतर जागतिक बुद्धिबळावर असलेले भारताचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, या यशानंतर विविध क्षेत्रांतील चाहत्यांकडून दिव्याचे भरभरून कौतुक केले जात आहे. तिच्या यशाचा झेंडा सतत फडकत राहो.